
# आधुनिक केसरी

रविवार, 09 ऑक्टोबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 65
Title Code : MAHMAR51117

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 09 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-65 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-14 ● PRICE-5


# तुम्हीच करा पापक्षालन!

## मोहन भागवतांच्या 'त्या' विधानावर ब्राह्मण महासंघाचे टीकास्त्र



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : मोहन भागवतांनीच पापक्षालन करण्याची गरज आहे. इथला हिंदू नराधमांच्या हातात देण्याचे पाप तुम्ही करण्याचा विचार करत आहात. तुम्ही पापक्षालन केले पाहिजे. तुम्ही देशात जातीयवाद वाढवत आहात, अशा शब्दांत ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आनंद दवेंनी मोहन भागवतांच्या वक्तव्यावर संताप व्यक्त केला आहे.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलेल्या एका विधानावरून सध्या महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाच चर्चा सुरू झाली आहे. त्यांच्या या विधानावरून संमिश्र प्रतिक्रिया उमटत असून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही नुसते माफी मागून चालणार नाही. आपण व्यवहारामध्ये या सर्व वर्गाबाबत भूमिका कशी घेतो, यावर सगळ्या गोष्टी अवलंबून आहेत, असे म्हणत अप्रत्यक्षपणे मोहन भागवत आणि आरएसएसला विधानावर अंमलबजावणी करण्याचाच सल्ला दिला आहे. या पार्श्वभूमीवर ब्राह्मणांविषयी मोहन भागवतांनी केलेल्या विधानावरून राजकारण तापण्याची शक्यता आहे. आता ब्राह्मण महासंघानंही भागवतांच्या विधानावर टीकास्त्र सोडले आहे.
सरसंघचालक मोहन भागवत यांनी ब्राह्मणांनी पापक्षालन करण्याची गरज असल्याचे विधान नागपूरमध्ये एका कार्यक्रमात बोलताना केले होते. आपल्या धर्मशास्त्राला जातीगत विषमता मुळीच मान्य नाही. ब्राह्मण हा त्याच्या कर्मामुळे, गुणांमुळे होतो हे धर्मशास्त्रात स्पष्ट नमूद आहे. मग ही विषमता आली कुठून? याला इतिहासाची पार्श्वभूमी आहे. जनुकीय शास्त्रानुसार ८० ते ९० पिढ्यांपूर्वी भारतात आंतरजातीय विवाह पद्धती होती. नंतरच्या काळात हळूहळू ती लोप पावली. त्यामुळे वर्णव्यवस्थेची चौकट अधिक घट्ट झाली, असे म्हणत ब्राह्मणांनी पापक्षालन करायला हवे, असे मोहन भागवत म्हणाले. तसेच, देशातून जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था हद्दपार व्हायला हवी, असेही त्यांनी म्हटले आहे.
दरम्यान, मोहन भागवतांच्या या विधानावर ब्राह्मण महासंघाने तीव्र शब्दांत आक्षेप घेतला आहे. त्यांचे वक्तव्य चुकीचे आणि पूर्ण अभ्यासाशिवाय केलेले आहे. त्या काळी काही ब्राह्मणांनी चुका केल्या असतील, तर ब्राह्मण समाजातल्या काही लोकांनी त्यांना विरोधही केला आहे. पण असे न म्हणता सरसकट ब्राह्मणांनी पापक्षालन करण्याचे विधान त्यांनी केले, अशी प्रतिक्रिया ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांनी दिली आहे.
राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना भागवतांच्या विधानावर सहमती दर्शवत त्यांना सल्लाही दिला. मोहन भागवतांचे वक्तव्य माझ्या वाचनात आले आहे, ही गोष्ट समाधानाची आहे. समाजातील एका मोठ्या वर्गाच्या काही पिढ्यांना यातना सहन कराव्या लागल्या. या यातनांची जाणीव त्या घटकाला होत असून, हा योग्य बदल आहे. पण, नुसते माफी मागून चालणार नाही. आपण व्यवहारामध्ये या सर्व वर्गाबाबत भूमिका कशी घेतो, यावर सगळ्या गोष्टी अवलंबून आहेत, असे शरद पवार म्हणाले.

## चर्चेतली बातमी

### राज्यात मध्यावधी नाहीत; अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** राज्यात मध्यावधी निवडणुका होण्याची शक्यता नाही. आमदारांना निवडणुकांचा खर्च परवडणारा नाही, असे मत विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी व्यक्त केले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आई- वडिलांना शिव्या दिल्या तरी चालेल, या आशयाचे केलेले विधान म्हणजे त्यांची 'विनाशकाले विपरीत बुध्दी' असल्याची टीकाही त्यांनी केली. पिंपरीत पत्रकारांशी बोलताना पवार यांनी राज्यात मध्यावधी निवडणुका होणार नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले की, विधानसभेच्या मध्यावधी निवडणुका होण्याची शक्यता नाही. दोन वर्षे करोनामुळे गेली. आता कुठे सुरळीतपणे काम सुरू झाले आहे. निवडणुकांमध्ये किती खर्च करावा लागतो, याची जाणीव आमदारांना आहे. त्यामुळे मध्यावधी निवडणुका कोणालाही परवडणाऱ्या नाहीत. पाच वर्षांचा कालावधी विद्यमान आमदार पूर्ण करतील, असे वाटते. वेळ लावण्याचे काहीच कारण नाही, असेही पवार म्हणाले. मुंबईत अंधेरी विधानसभेची पोटनिवडणूक जाहीर होते. मग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात काय अडचण आहे, असा प्रश्न अजित पवार यांनी उपस्थित केला. शिव्या दिल्याने बेरोजगारी, महागाईसारखे प्रश्न सुटणार आहेत का, पालकमंत्री पदावर असलेल्या व्यक्तीने असे बेताल वक्तव्य करणे चुकीचे आहे. पाटील यांना मनासारखे मंत्रीपद न दिल्यामुळे ते नाराज असावेत. त्यासाठीच ते अशी विधाने करत असावेत, अशी टीका यांनी केली.

# वीर सावरकरांचा अपमान करणाऱ्या राहुल गांधींचा स्वागताला जाणार का?

## देवेंद्र फडणवीस यांचा उद्धव ठाकरेंना प्रश्न

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सातत्याने स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करणाऱ्या राहुल गांधी यांचा निषेध करणार की, त्यांच्या तथाकथित भारत जोडो यात्रेच्या स्वागताला जाणार, असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज उद्धव ठाकरे यांना केला आहे.
राहुल गांधी यांनी आज पुन्हा एकदा स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान केला आहे. वीर सावरकरांना इंग्रजांचे हस्तक, इंग्रजांकडून पैसा घेणारे असे राहुल गांधी संबोधतात. आम्ही राहुल गांधी यांचा तीव्र शब्दात निषेध करतो. स्वातंत्र्यानंतरच्या राजकीय परिस्थितीत जाणीवपूर्वक वीर सावरकरांना अपमानित करण्याचे काम केले गेले. पण, अंदमान कारागृहात काळ्या पाण्याची शिक्षा भोगलेले फार थोडे आहेत. वीर सावरकरांनी अनेकांना क्रांतीची प्रेरणा



दिली. राहुल गांधी यांना काँग्रेसचा इतिहास माहिती नाही, स्वातंत्र्याचा इतिहास माहिती नाही. आता अशा राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेच्या स्वागताला उद्धव ठाकरे नेते पाठविणार की हिंमत दाखवून वीर सावरकरांच्या अपमानाचा निषेध करणार, असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला. रश्मी शुक्ला यांच्यासंदर्भात पत्रकारांनी विचारले असता ते म्हणाले की, कोणताही अहवाल सादर होतो, तेव्हा तो पुराव्यांच्या आधारावर होतो. तत्कालिन पोलिस आयुक्त आणि पोलिस महासंचालक यांना हाताशी धरुन कुंभाड रचण्यात आले. याचे अनेक पुरावे बाहेर आले आणि आणखी पुढच्या काळात येणार आहेत. पोलिस पुराव्यांच्या आधारावर काम करत असते आणि न्यायालय कायद्यानुसार निर्णय घेते. आम्ही कोणत्याही अधिकाऱ्यावर अन्याय करणार नाही किंवा कोणत्याही अधिकाऱ्यावर अकारण अन्याय होऊ देणार नाही. विजय देशमुख यांना धमकीचे पत्र आले आहे. त्यात पीएफआयच्या बंदीचा उल्लेख आहे. इतरही नेत्यांची सुद्धा नावे आहेत. त्यासंदर्भात पोलिसांना चौकशीचे निर्देश देण्यात आले आहेत आणि पोलिस त्याची सखोल चौकशी करीत आहेत, असेही देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांच्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

# माशांच्या आड प्राण्यांची तस्करी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महसूल गुप्तचर संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी मुंबई विमानतळावरुन मलेशियातील कासव, साप, सरडे आणि इगुआनासह ६६५ परदेशी प्राणी जप्त केले आहेत. याप्रकरणी दोन तस्करांनाही अटक करण्यात आली आहे. जप्त केलेली काही जनावरं मृतावस्थेत असल्याचं सांगण्यात येत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डीआरआयने जप्त केलेल्या जनावरांची किंमत २.९८ कोटी असल्याची माहिती आहे.
धारावीचा रहिवासी इमानवेल राजा आणि माझगावचा रहिवासी व्हिक्टर लोबो अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. डीआरआयने दिलेल्या माहितीनुसार, मलेशियातून एक माल बुधवारी रात्री सहार येथील एअर कार्गो कॉम्प्लेक्स मध्ये पोहोचेल,



ज्यामध्ये एक्वेरियम माशांच्या आडून जिवंत परदेशी प्राणी असतील अशी माहिती मिळाली होती. त्यानंतर एजन्सीच्या अधिकाऱ्यांनी विलेपार्ले येथे एसीसीकडून जनावरांची तस्करी करुन घेऊन धारावीकडे जाणारे एक वाहन अडवले.

# हायड्रोजन सिलिंडर वाहनाने घेतला पेट


आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** मनमाड -मालेगाव मार्गावरील कानडगाव फाट्याजवळ आज दुपारच्या सुमारास सर्वांना हादरावणारी घटना घडली. एका गाडीत सुमारे 200 सिलेंडर होती. त्यापैकी पंधरा ते वीस सिलेंडर फुटले. सदर अपघातात चोंडी घाटा जवळील कानडगाव फाट्याजवळ झाला आहे. चालकाने वेळीच प्रसंगावधान दाखवल्याने पुढील मोठा अनर्थ टळला. यात चालक किरकोळ जखमी झाल्याचे समजते. कुणीतरी बॉम्ब फेकते अशा पद्धतीने सिलेंडर हवेत उडत होते. एकूणच सर्व घटना चित्त थरारक होती परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. सदर अपघात हा मनमाड मालेगाव



रोडवरील कानडगाव फाट्याजवळ झाला. सिलिंडरचा स्फोट होऊन हवेत उडाले. सुदैवाने कुठलीही जिवीतहानी झाली नाही. मालेगाव मनमाड माहामार्गावरील वाहतूक इतर मार्गाने वळविली आली होती. मनमाड मालेगाव येथील अग्निशमन दलाने आग विझविण्यासाठी प्रयत्न केला.
सिलिंडर गाडीने अचानक पेट घेतल्याने क्षणात आगीने रुद्र रूप धारण केले. यात सिलिंडर असल्याने आगीने जास्त पेट घेतला व सर्व सिलिंडर हे अक्षरशः हवेत उडत होते. मनमाड व चांदवड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन हा रस्ता ब्लॉक केला. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मनमाड मालेगाव माहामार्गावरील वाहतूक इतरत्र वळवण्यात आली. सुदैवाने यात कुठल्याही प्रकारची जिवीतहानी झाली नसली तरी गाडीचे व सिलिंडर याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या आगीचा फटका परिसरातील शेतकऱ्यांना बसला असून कानडगाव येथील अण्णा राजनोर यांच्या शेतातील कांदा पिकाचे नुकसान झाले आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# चांदणे तुझ्या स्मरणाचे ...

आधुनिक केसरी

शेतावर काम करणारा सालदार असो की मजूर किंवा भांडेधुणी करणारी बाई असो, त्यांच्यापैकी कोणी उपाशी दिसले तर प्रसंगी गरम गरम भाकरी पिठले करून घालण्याची तिची तयारी असायची. गावातील बहुतेक लोक गरीब किंवा साधारण परिस्थितीतील होते. कधी कधी त्यांच्या घरी जेवायलाही काही नसायचे. अशा वेळी कोणी तरी अडली नडलेली बाई येऊन ' पाटलीणबाई, घरात काहीच नाही हो. थोडं धान्य तरी द्या ना...' अशी विनवणी करायची तेव्हा आई शेर दोन शेर धान्य तिच्या झोळीत टाकायची. परतीची अपेक्षा न करता. खऱ्या अर्थाने ती ' माऊली '. तशी आमचीही परिस्थिती साधारणच होती पण आईने दुसऱ्याला देताना कधीच हात आखडता घेतला नाही. तिच्या रूपाने घरात जणू लक्ष्मीचाच वास होता. त्यामुळे आम्हाला कधी कमी पडले नाही. आम्ही खाऊन पिऊन सुखी होतो.

तिचं शिक्षण जरी अगदी बेताचं होतं तरी तिला वाचनाची मात्र आवड होती. त्यावेळी आमच्या गावात वर्तमानपत्रे येत नव्हती. आमच्या गावातील प्राथमिक शाळेची एक छोटी लायब्ररी होती. त्यातील बहुतेक पुस्तके तिची वाचून झाली होती. मेजर साळवी यांचं ' काही स्वाधीन काही दैवाधीन ' हे पुस्तक तिला फार आवडलं होतं. अशा पुस्तकांनी तिचा मूळचाच उदार असलेला दृष्टिकोन आणखी विशाल केला होता. ' काही स्वाधीन, काही दैवाधीन ' हे सूत्र माणसाला एकदा समजले की आयुष्याबद्दल त्याची फारशी तक्रार राहत नाही. आपल्या हातात जेवढे आहे, जेवढे करता येणे आपल्याला शक्य आहे, तेवढे कसोशीने करावे. उरलेले दैवावर सोडून द्यावे हे तिचे सांगणे होते. तिने भगवद्गीता जरी अभ्यासलेली नसली तरी ' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ' हा श्रीकृष्णाने पार्थाला केलेला उपदेश सदैव तिने अमलात आणला. आज माझ्यात जी काही वाचन आणि लेखनाची थोडीफार आवड आहे याचे श्रेय निःसंशय माझ्या आईचे !

आजही मातृछत्र माझ्यावर छाया धरून आहे ही खूप भाग्याची गोष्ट ! पण लहानपणीचा विचार जेव्हा मी करतो, तेव्हा मला तिच्या या साऱ्या गोष्टी आठवतात. तिच्या हळव्या, मंद, गोड बोलांचा माझ्या आयुष्याला स्पर्श झाला आहे एवढेच नाही तर तो बोल माझ्या आयुष्याचे सोने करून गेला आहे असे म्हणावेसे वाटते. बालपण आठवले, आई आठवली की म्हणावेसे वाटते, ' हे सरता संपत नाही चांदणे तुझ्या स्मरणाचे...! '



## आनंदी पहाट

# आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांची गरज

आधुनिक केसरी

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपले अंतर्बाह्य व्यक्तिमत्व कसे असू शकेल, हे ठरते. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण अनुभवताना, त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणे आवश्यक असते. आपली, आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपापल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते.

आपली सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकेच सुंदर सजवायचे, खुलवायचे असते. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारे मन मात्र मोठे असावे लागते. आपल्या छोट्या प्रतीमेतूनच मोठ्या मनाने सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो, त्यातच जीवनातले सार सामावलेले असते.

नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते. आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो.

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-42

# गरज आहे का ?

आधुनिक केसरी

घड्याळ्याच्या काट्याच्या वेगापेक्षाही माणूस आज धावत आहे. स्वतःच्या आरोग्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करून सकाळी उठून फिरायला जाणं, व्यायाम त्या काहीच गोष्टी होत नाही....का? तर वेळच नाही. वेळ भरपूर असतो आपल्याकडे. वेळेचे नियोजन नाही. कुठेही कसाही किती वेळ आपण वाया घालवतो याच्याकडे आपलं लक्षच नसतं. त्यामुळे आपल्याला वेळ कमी पडतो. 24 तास आपल्याकडे असतात. 24 तास तर आपण काम नाही करत ना? खूप धावपळीने शरीर थकते. मग कोणाशी धड बोलणं होत नाही. स्वभाव चिडचिडा होतो. कशासाठी हे सर्व? कोणासाठी इतकं कमवायचा आहे. खरंच त्याची गरज आहे का? का आपल्या सुंदर नाजूक, कोमल देहावर आपण अत्याचार करत असतो. जगण्यासाठी पैसा हवा असतो खरं आहे. पण गरजा कमी ठेवून तो कमवला तर निश्चितच आपल्याला सुख समाधान मिळते. सध्या समाजात उलट चित्र आहे. पैशासाठी लोक जीवन जगत आहे. ज्यांच्याकडे पैसा आहे त्यालाच मानपान देतात. पान म्हणजे जेवणाचे ताट. त्याला पोटभर पंचपक्वान्नाचे जेवण देतात. आणि ज्यांच्याकडे पैसा नाही त्याला मानही नाही आणि पानही नाही. ही कुठली रीत? ज्याला खरी अन्नाची गरज आहे त्याला दूर ढकलतात. ज्यांना मिळतं त्याचे पोट आधीच भरलेले आहे त्याला पुन्हा पुन्हा जेवू घालतात. का? कशासाठी? कोणते पुण्य तुमच्या पदरात पडतं? पुण्यापेक्षा पापच लागत असेल असं वाटतं. कारण "भुकेल्यांना अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या" गाडगे बाबांचा हा संदेश आपण विसरतो. हाच संस्कार आपल्या मुलांवर करायचा आहे. जिथे गरज आहे तेथे धावून जा. ज्यांना जी गरज हवी आहे ती मदत करा. खूप नको जी मदत करता येईल तेवढीच करा. गरजुनाच करा. पण त्यातही आपण कधी कधी फसतो. आपली कोणाला तरी गरज आहे या भावनेतून आपण मदत करू या...

# महर्षी वाल्मिकी

आधुनिक केसरी

रामायणाचा रचयिता म्हणून ओळखले जाणारे वाल्मिक लहानपणी लुटमारीच्या धंदा करत असे. म्हणजेच वाल्मिकींचे आई आणि त्यांचे वडील त्यांना किराता जवळ ठेवून तपश्चर्येला जात असे तेव्हा वाल्मिकी गुपचूप चोरी करत असे. म्हणूनच सर्व लोक त्यांना वाल्या कोळी असे म्हणू लागले. वाल्मीकि एकदा काही ऋषींना घेरले होते. परंतु ते ऋषी हुशार होते त्यांनी त्याला उपदेश केला. त्याच्या जीवावर जगणारे त्याचे कुटुंबीय त्याच्या पापात वाटेकरी होतात काय असे विचारून येण्यास सांगितले. कोणीही जेव्हा काहीच बोलले नाही तेव्हा त्यास पश्चाताप झाला. वाल्मिकी जिथे बसले होते तिथेच राम मंत्राचा जप सुरू केला. जप करता करता त्याच्या अंगाभोवती वल्मीक म्हणजे वारूळ तयार झाले. म्हणूनच त्यांना वाल्मिकी असे नाव मिळाले. वाल्मिकी हे मोठे शिवभक्त होते.. महर्षी वाल्मिकींना तपस्वी मुनिपुंगव , द्विज अशी अनेक विशेषणे रामायणामध्ये वापरली आहेत. रामायणाच्या



उत्तरकांडात वाल्मिकींनी आपली उत्पत्ती सांगितली आहे असे म्हटले जाते,'प्रचेतसोऽहं दशमः पुत्रो राघवनंदन' म्हणजेच आपण प्रचेतसाचा दहा पुत्र आहोत असे त्यांनी म्हटले जाते असे नोंदविण्यात आले आहे. प्रचेता म्हणजे वरून. भृगू आणि वाल्मिक असे दोन पुत्र होते. असा उल्लेख भागवतात आला आहे . रामायणात तमासा तीरावर वाल्मिकीं च्या आश्रमाचे वर्णन केले जाते . वाल्मिकींचे अनेक शिष्य होते .यामध्ये भरद्वाज हा प्रमुख शिष्य होता. रामाने सीतेचा त्याग केल्यावर तिचा व तिच्या पुत्रांचा वाल्मिकी ऋषींनी सांभाळ केला. कुश लव यांना शिक्षण देऊन रामायण शिकवले रामाच्या अश्वमेध यज्ञात शिष्य समवेत उपस्थित होते असा उल्लेख महाभारतात केला आहे.

# "निरूपण"


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं जानासि मे मनोरथम्।**
**त्वया विना न पूर्तिश्च तस्य भवितुमर्हति।। ४२ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझे मनोरथ जाणतेस. तुझ्या विना त्याची पुरती होणे शक्य नाही.
**जगदम्ब नमस्तुभ्यं मनो ममास्तु निर्मलम्।**
**विशुद्धहृदि मे देवि वासोऽस्तु तव सर्वदा।। ४३ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. माझे मन निर्मल असावे. हे देवी, माझ्या विशुद्ध हृदयात तुझा सर्वदा वास असावा.

# ।। दासबोध स्तवन ।।



आधुनिक केसरी

**सर्व प्रथम नवरात्राच्या रोजच्या 10 दिवसातील लेखमालेचे जे सर्वांनी कौतुक केले त्यासाठी मनापासून धन्यवाद ! मातेचा आशिर्वाद व तुमच्या प्रेरणेने लिहायला बळ मिळते. आज आपण परत "दासबोधा"कडे वळूया.**

## "सारशोधन"

आपल्यातल्या मी पणाला शोधणे म्हणजे सारशोधन हा एक अर्थ होतो. पण समर्थांनी 34ओव्यात हा समास गुंफला आहे . त्याचा अभ्यास आपण आता करूया.काही लोक भरभरून संपत्ती गोळा करतात काही थोडीच दाखवतात पण म्हणजे द्रुष्याच्या आंतमध्ये जो खरा मी आहे त्याचा शोध शहाणे लोक घेतात द्रुष्य साठवणे हा स्वार्थ खोटा तर अद्रुष्य मी पहाणे हा खरा अर्थ समजावा. ज्यांना ज्ञानाचे सामर्थ्य असते त्यांना परमार्थ सरोबर ओळखता येतो. भाग्यवान लोक सार सेवन करतात तर अभागी लोक असार सेवन करतात. कित्येक लोक आयुष्यभर काबाडकष्ट करतात तर काहींना कष्ट न करता राजवैभव मिळते. काही स्वानंदविहार करतात तर काही द्रुष्याचे ओझे वाहून वाहून एक दिवस हे जग सोडून जातात. खरा ज्ञानी विश्वाचा अर्थ समजून घेतो सोने व दगडमाती तो वेगळे करतो. कारण सोन्याच्या खाणी गुप्त असतात तर दगडमाती कुठेही पहायला मिळते. बाभळ,निवडूंग शेर यांची झाडे कुठेही पहायला मिळतात पण'कल्पतरू'चे झाड किंवा चंदनाचे झाड शोधावे लागते.तसेच कामधेनु माता फक्त इंद्रापाशीच असते. जगात आपण कितीतरी धन्यवाद व्यापारी लोक पहातो ते स्वतः ला धनवान प्रामाणिक समजतात पण साक्षात धनवान कुबेराच्या वैभवाची मोजणी कुणीचं करू शकत नाही. सार व असार यांच्यातला फरक साधुसंतानाचं कळतो. आपण सर्व सामान्य माणसं आहोत. सर्वत्र असलेला परमात्मा संतसंगतीत राहूनच शोधुया.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपण तर प्रापंचिक माणसं आहोत आपली रोजची रोजीरोटी मिळवण्यासाठी धडपडत असतो त्यात काही एक बदल न करता संताच्या विचारावर चालून परमात्मा शोधायचा आहे त्यासाठी हवा आहे फक्त "सारासार"विचार. संसार सोडावा लागत नाही प्रपंच्यातील विहीतकर्म करत विचारांच्या सामर्थ्याने आत्मज्ञानी होऊन जन्माचे सार्थक करावे. सारासारविवेकाने आत्मज्ञान होते जीव संसाराच्या बंधनातून बाजूला होतो तो जन्ममरणाच्या चक्रातून सुटतो व अगदीच निःसंशय बनतो म्हणून वाचक मित्रांनो याच जन्मात व याचं जमान्यात मनाने संसारातून हळूहळू बाजूला सरकावे, स्वस्वरूपाशी एकाकार होऊन स्थितप्रज्ञ व्हावे मनाला बजावून सांगावे की बाबारे मोह, माया यापासून मी निश्चल होत आहे असा निग्रह करून मोक्ष प्राप्त करून घ्यावा.

इतुके दे मजला दे मजला। मागतसे हरी तुजला।।
संतसमागम जोडी।। माझीमी पण वाट मोडी।। इतुके दे ।।

# रावणाला फक्त राम जाळू शकतो

आधुनिक केसरी

रावण दहन दरवर्षीचेच. एकदा रावणाचे दहन केले, जळाला मग, पुन्हा दहन कशासाठी? कोणाचे? रावणाचे? रावण तर जाळला म्हणे. मागच्याच वर्षी.तर मग, या वर्षी काय जाळले? कोणाला जाळले? असा प्रश्न रावण दहन कराणाऱ्याला का पडत नसेल? मला तर मोठा प्रश्न पडला. दरवर्षी रावणाचे दहन का करतात? का करावे लागते? नक्कीच, रावण जळालाच नसेल. कदाचित जाळलाच नाही. तर मग, जाळले काय? जे जाळले ते काड्या, कांबळ्या, सनकाड्या, फटाकडे. रावण तर जळालाच नाही.

रावण कुठे लपला असेल? रावण जरी रामाच्या हातून मारला गेला, असे रामायणात लिहीले असले तरी रावण अजून जिवंत आहे. रावण अजरामर आहे.जोपर्यंत राम आहे, तोपर्यंत रावण जिवंत आहे.जोपर्यंत रावण जिवंत आहे, तोपर्यंत राम आहे. राम आणि रावण या दोन राजांची नांवे आहेत. त्या विभुती आहेत. त्यांच्या नावाने प्रवृत्ती ओळखली जाते. ज्या लोकांनी दसऱ्याला रावण जाळला त्याच लोकांमधे रावण जिवंत आहे. म्हणून पुन्हा पुन्हा रावण जाळण्याची उपरती येत असावी.

तिच तिच माणसे दरवर्षी रावण जाळतात. मोठा देखावा करतात. गाजावाजा करतात.भोळ्या भाबळ्या वानरांना दाखवतात, बघा, मी रावण जाळला. त्यांना खरे वाटत असेल ही. पण माणसाला मात्र हे खरे वाटत नाही. हे गौडबंगाल आहे. हे थोतांड आहे. ही फसवणूक आहे. कारण रावणाला फक्त राम मारू शकतो. रावणणाला फक्त राम जाळू शकतो. तो ही एकदाच. दरवर्षी नाही. पुन्हा पुन्हा नाही. पण या माणसातच रावण आहे. म्हणून त्याला पुन्हा पुन्हा रावण जाळण्याची उपरती होत असावी. खंत वाटत असावी की, मी दरवर्षी रावण जाळतो तरी माझ्यातील रावण का जळत नाही? कपडे तो रोज बदलता हुं पर तन की बदबू नही जाती. पगले! बदबू कपडोकी नही, तनकी आती है.


शिवराम पाटील
संपर्क क्र. 9279963122

रामायणातील एक चरित्र, एक राजा ज्याने राम राजाची पत्नीचे अपहरण केले, तो म्हणजे रावण. हा मोठा दोष रावणाला दिला जातो. त्या एकाच दोषांमुळे रावणाला जाळण्याची परंपरा पडली. पुन्हा असे कोणी राजाच्या पत्नीचे अपहरण करू नये म्हणून निषेधार्ह रावणदहन केले जाते. काडी, पेटी, कचकडा, सनकाडी, फटाकड्यांचा रावण कितीही वेळा जाळला तरी तन मनातील रावण काही केल्या जळत नाही. रावण जाळतांना लोक खुष होत असले तरी, रावण खदाखदा हसतो. म्हणतो," अरे मुर्खा तू मला मारू शकत नाही. तू मला जाळू शकत नाही. मला फक्त राम मारू शकतो. मला फक्त राम जाळू शकतो. राम पवित्र आहे. राम चरित्र आहे. राम एकवचनी आहे. राम एकपत्नी आहे. मी अनेकांना हरवले, मारले मला कोणीच हरवू शकला नाही. मला कोणीच मारू शकला नाही. देव, दानव, नाग, जटायु, वानर कोणीही नाही. हा अहंकार मला छळत होता. माझे वैर सीतेशी नाही. मला सीता नको आहे. माझे वैर रामाशी नाही. मला राम हवा आहे.रामाच्या हातून मुक्ती हवी आहे. म्हणून सीताहरणचे पाप माझ्या हातून घडले. मी बापाला लाथाडले. मी भावाला ठोकरले. मी पत्नीला झिडकारले, माझा अहंकार होता यावर एकमेव उपाय होता. रामबाण! म्हणून रामाशी युद्ध. रामाच्या हातून मरण. रामाच्या हातून अहंकार हनन. मीच माझे मरण ओढवून घेतले.मी युद्धात मेलो असतो. पण अहंकार मेला नसता. मी वृद्ध होऊन मेलो असतो. पण अहंकार मेला नसता. मरण आजाराने आले असते. पण अहंकार मेला नसता. यावर राम हाच एकमेव उपाय होता. रामबाण हाच उपाय होता.

कितीही वेळा रावणदहन केले तरी रावण जाळू शकले नाहीत. कारण तुम्ही राम नाहीत. तुमच्यात राम नाही. म्हणून तुमच्या हातून रावण जळणार नाही. रावणाला फक्त राम मारू शकतो. रावणाला फक्त राम जाळू शकतो. रावण जाळायचा असेल तर राम व्हा. तेंव्हा हा रावण स्वतः तुमच्याकडे येईल. म्हणेल, हे राम मला तुझ्या हातून मरण हवे आहे, माझ्यातील अहंकार सहित."

# नभ आले दाटून... आकाश गेलं अंधारून....

छायाचित्र : सुधीर कोर्टीकर, औरंगाबाद



## शॉक लागून चौघा भावडांचा करुण अंत

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. अंघोळीसाठी तळ्यात उतरलेल्या चार मुलांची विजेचा शॉक बसून त्यांचा मृत्यू झाला. संगमनेर तालुक्याच्या पठारभागातील खंदरमाळवाडी परिसरातील वांदरकडा येथे ही घटना घडली. अनिकेत अरूण बर्डे, ओंकार अरुण बर्डे, दर्शन अजित बर्डे व विराज अजित बर्डे या चौघा भावंडांचा मृत्यू झाला आहे. वीज वाहक तार तुटून पाण्यात पडली होती. त्यामुळे ही घटना घडल्याचे समजात ग्रामस्थांनी वीज वितरण कंपनीविरूद्ध संताप व्यक्त केला. ग्रामस्थांनी वीज कंपनीच्या कारभारावर संताप व्यक्त केला आहे. या घटनेमुळं गावावर शोककळा पसरली असून ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली आहे. शनिवारी दुपारी ही घटना घडली. बर्डे यांच्या वस्तीजवळच छोटेसे तळे आहे. त्या तळ्याच्या वरून वीज वाहक तारा गेलेल्या आहेत. तारा तुटून तळ्यात पडलेल्या होत्या. मात्र, मुलांच्या ही गोष्ट लक्षात आली नाही. ते सरळ पाण्यात गेल्याने त्यांना विजेचा धक्का बसला आणि त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती समजताच आजूबाजूच्या ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. शिवसेनेचे तालुकाप्रमुख जनार्दन आहेर, अशोक वाघ, रामनाथ कजबे, यांनीही घटनास्थळी धाव घेतली.

वीज कंपनीच्या कर्मचाऱ्यांना पाचारण करण्यात आले. त्यानंतर मुलांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. याची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलीस निरीक्षक सुनिल पाटील यांच्यासह साहयक फौजदार राजू खेडकर, पोलीस नाईक राजेंद्र लांघे, हरिश्चंद्र बांडे, प्रमोद चव्हाण यांनीही घटनास्थळी धाव घेतली. पावसामुळे रस्ता खराब झाला आहे. त्यामुळे रुग्णावाहिका दूरवरच उभी करावी लागली.

तिथपर्यंत झोळी करून मृतदेह न्यावे लागले. चार भावंडांचा दुर्दैवी मृत्यूमुळे ग्रामस्थांमधून हळहळ व्यक्त करण्यात आली. तसेच या घटनेला वीज कंपनीला जबाबदार धरून ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. अचानक घडलेल्या ही घटना पाहून मुलांच्या आई- वडिलांनी हंबरडा फोडला.

## भारतीय हवाई दलासाठी नवीन 'शस्त्र' प्रणाली शाखा; केंद्र सरकारची मंजुरी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने भारतीय हवाई दलासाठी नवीन शस्त्र प्रणाली शाखा स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच भारतीय हवाई दलात नवीन शाखा तयार करण्यात येत आहे. त्यामुळे विमान प्रशिक्षणाच्या खर्चात कपात होईल, अशी माहिती हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल व्ही आर चौधरी यांनी दिली. नवी दिल्लीतील एनसीआर येथे भारतीय वायुसेना दिनानिमित्त परेड आयोजित करण्यात आली होती. तेव्हा एअर चीफ मार्शल व्ही आर चौधरी यांनी ही घोषणा केली. ते म्हणाले की, "स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच देशात नवीन शस्त्र प्रणाली शाखा स्थापन करण्यात येणार आहे. या शाखेमुळे विमान प्रशिक्षणाच्या खर्चात कपात होत, ३,४०० कोटी रुपयांची बचत होणार आहे." या नव्या शाखेच्या माध्यमातून हवाई दलातली सर्व प्रकारची अत्याधुनिक शस्त्रास्त्र प्रणाली हाताळण्यात येणार आहे. दरम्यान, भारतीय लष्कर आणि नौदलानंतर आता महिलांची अग्निवीर म्हणून भारतीय हवाई दलात भरती केली जाणार आहे. "पुढील वर्षीपासून महिला अग्निवीरांची वायुसेनेत भरती करण्यात येईल," अशी माहिती एअर चीफ मार्शल व्ही आर चौधरी यांनी दिली आहे.



## रतन टाटांना 'सेवा रत्न' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** टाटा समुहाचे सर्वेसर्वा रतन टाटा यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न असणाऱ्या 'सेवा भारती' संस्थेकडून 'सेवा रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. समाजसाठी केलेल्या वेगवेगळ्या कामांसाठी टाटा यांना या पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे. रतन टाटा प्रत्यक्षात या कार्यक्रमाला उपस्थित नव्हते.

रतन टाटांबरोबरच चलासनी बाबू राजेंद्र प्रसाद यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. या दोन्ही नामवंत व्यक्तींना 'सामजिक विकासासाठी या व्यक्तींनी वेळोवेळी दिलेला निधी आणि योगदान' यासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे असं संस्थेने जारी केलेल्या पत्रकात म्हटल्याचं वृत्त पीटीआय या वृत्तसंस्थेनं दिलं आहे. एकूण २४ व्यक्ती आणि संस्थांना समाज कार्यासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

हा पुरस्कार उत्तराखंडचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल गुरमीत सिंग (निवृत्त) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला," असंही संस्थेनं म्हटलं आहे. उत्तराखंडच्या राज्यपालांनी सेवा म्हणजे काय याचा अर्थ 'सेवा भारती'कडून शिकता येईल असं म्हणत या संस्थेचं कौतुक केलं. ज्यांना कोणीही त्यांच्यासाठी 'सेवा भारती' आहे, असंही ते म्हणाले.

रतन टाटा यांचा काही दिवसांपूर्वीच पीएम केअर फंडाच्या विश्वस्तांमध्ये समावेश करण्यात आला आहे. रतन टाटा यांच्यासोबतच सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती के टी थॉमस, माजी उपसभापती करिया मुंडा यांच्यासह नामांकित व्यक्तींचीही विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

रतन टाटा यांचा जन्म १९३७ साली मुंबईत झाला. रतन टाटा हे सध्याच्या घडीला देशातील आघाडीच्या उद्योगपतींपैकी एक आहेत. एक यशस्वी उद्योजक आणि संवदेनशील मनाचे व्यक्तीमत्व म्हणून टाटांकडे पाहिलं जातं. त्यांना २००८ साली 'पद्म विभूषण' आणि २००० साली 'पद्म भूषण' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# भारत जोडो अभियान



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**नुकताच आपण स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा केला. आपल्या कारकिर्दीचा, अपेक्षांचा आढावा या निमित्ताने घेतला. राज्यकर्त्यांनी आपापल्या पध्दतीने हा देश पुढे नेण्याचा प्रयत्न केला. जातीय, धार्मिक, पंथीय दृष्टीने अनेक चळवळी झाल्या तसेच सर्वधर्मसमावेशक, पंथनिरपेक्षही आंदोलने झाली. या सर्वांमधून आपण एक भारतीय आहोत, हा धागा अधिकाधिक मजबूत होत गेला. काही चढ उतार निश्चितच आले. आजही त्याचीच पुनरावृत्ती होत असल्याने आणि सत्ताधारी वर्गाच्या धार्मिक आणि विशिष्टहितैषी मनसुब्याला आव्हान म्हणून काँगेसने काढलेले अभियान सामान्यांने समजून घेण्याची गरज आहे.**

भारत जोडो अभियान म्हणजे भारतीयांची मने सांधण्याचा केला जाणारा प्रयत्न आहे. कारण भारत माझा देश आहे असे म्हणत असताना किंवा आम्ही भारताचे लोक असे उच्चारताना सबंध राष्ट्रातील लोकांच्या अनुषंगाने आपण बोलत असतो. यात कसल्याच प्रकारच्या भेदभावला स्थान नाही. सत्तेच्या ठिकाणी कोण आहे, हा भाग गौण आहे. कारण ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे कामे व्हावीत ही माफक अपेक्षा असते. केवळ विशिष्ट गटाचे, जातीचे किंवा धर्माचे हितसंबंध हेच संपूर्ण राष्ट्राचे हितसंबंध असे होत असल्यास जनतेच्या मनात राज्यकर्त्यांबद्दल एकप्रकारची कटुता निर्माण होत जाते. आज विरोधात असणाऱ्यांनी भ्रष्टाचाराचे नवनवीन रेकॉर्ड स्थापित केल्यामुळे त्यांना आपली सत्ता सोडावयास जनतेने भाग पाडले हे खरे असले तरी आजच्या सत्ताधाऱ्याबद्दलही जनता नाखूष आहे, हे विरोधकांच्या भारत जोडो अभियानातून स्पष्ट होत आहे. इथला शेतकरी, कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, लहान व मध्यम व्यापारी, अल्पसंख्य समाज हे सर्व नाराज असण्याची त्यांची स्वतःची विशिष्ट कारणे आहेत. शेतकऱ्यांनी एक वर्षापेक्षा जास्त काळ आंदोलन केले. हे आंदोलन इतके न ताणता अल्पावधीतच जर सत्ताधाऱ्यांनी गोडीगुलाबीने थांबवले असते तर नामुष्की ओढवली नसती. त्याही अगोदर भूमीसुधार बिल मागे घ्यावे लागले. शेतकऱ्यांसाठी आडत बंद केली असली तरी भर सिझनमध्ये आयातीवरील



बंदी उठवून शेतमालाचे भाव पाडण्यास सरकार मदत करत असेल तर शेतकरी कसा खुश राहील? म्हणून आज विरोधकांच्या भारत जोडो अभियानाला शेतकऱ्यांचा देखील मोठा पाठिंबा दिसत आहे. अगदी कन्याकुमारीपासून ते काश्मीरपर्यंत नवी आकांक्षा घेऊन या यात्रेत सामील होताना दिसत आहेत. लोकशाही शासनव्यवस्थेचे तीन घटक महत्त्वाचे असतात. यातील एकालाही सापत्न वागणूक मिळाली तर असंतोष निर्माण होतो. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात कर्मचाऱ्यांना एनपीएस लागू केली. कालांतराने न्याय मंडळातील मंडळींना देखील जुनी पेन्शन योजना लागू झाली; परंतु कार्यकारी मंडळाला अजूनही उपेक्षा सहन करावी लागत आहे. विधिमंडळातील सदस्य आपल्या हिताप्रति अतिशय दक्ष असतात. आपल्या हिताचा निर्णय एकमुखाने संमत करतात, पण कर्मचाऱ्यांना मात्र सापत्न वागणूक देतात. या दुजाभावामुळे काँग्रेसच्या भारत जोडो अभियानाला कर्मचाऱ्यांची देखील सहानुभूती असल्याचे निदर्शनास येते. सहानुभूती असण्याचे दुसरे कारण असे की, काँग्रेसशाषित राज्यांमध्ये तेथील सरकारने कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. एवढेच नाही तर पश्चिम बंगाल, पंजाब या राज्यात देखील ही योजना लागू झाली. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे सत्ताधाऱ्यांच्या विरोधी मत तयार होण्यास सुरुवात झाली आहे. त्याचा फायदा विरोधक उठवणार हे नक्की. सर्वच प्रकारच्या तेलाने शंभरी ओलांडली आणि लोकांच्या हाताला काम नाही. ज्या महागाईचा मुद्दा पुढे करून सत्ताधाऱ्यांनी सत्ता हस्तगत केली, त्यात कमी तर आलीच नाही उलट वाढच झाली. तीन-चारशे रुपयाला मिळणारे गॅस सिलेंडर आज अकराशे रुपयांवर गेले असतानाही महागाईवर कोणी काही बोलत नाही हे आश्चर्य म्हणायला हवे. देश एका दिवसात आणि एका कोण्या व्यक्तीने घडत नसतो. कोटयवधी लोकांच्या परिश्रमाने, त्यागाने आणि आत्माहुतीने आज आपण ही अवस्था प्राप्त केली आहे. नाकारल्या गेलेल्यांचे दुःख आणि त्यांची एकजूट हे भारत जोडो अभियानाचे गमक समजल्यास या यात्रेला गर्दी होणे साहजिक आहे. कारण या ना त्या कारणाने बहुतांश दुखावलेले आहेत. हे दुखणे जास्तीत जास्त राजकीय असले तरी त्याप्रति असणारी सहानुभूती देखील कमी नाही, हेही तेवढेच खरे. दूरचित्रवाणीवरून प्रदर्शित होणाऱ्या जातीय आणि सांप्रदायिक चर्चा किळसवाण्या वाटू लागल्या आहेत. संविधानमूलक आचार आणि विचारधर्मावर आपण घाला तर घालत नाही ना! एवढे साधे भानही संवादकाना नसल्याने भाषेची मर्यादा आणि भारतीय सहिष्णुवादाची मूल्ये कशी पायदळी तुडवली जात आहेत, याकडे दुर्लक्ष होताना दिसते. परिणामी आपण बोलण्यात जिंकल्याचा आनंद मिळत असला तरी आपल्या बोलण्याने केवळ समोरचा व्यक्तीच नव्हे तर तो ज्या गटाचे प्रतिनिधित्व करतो तो संपूर्ण गट आपल्यापासून फारकत घेतो, हे भान आपणास राहत नाही. विरोधी पक्षनेत्यावर दुहेरी हल्ले करत असताना व्यक्तीच्या व्यंगावर बोलणे अतिशय नीच दर्जाचे




असते, हे आपण विसरतो. त्यामुळेच काँग्रेसची भारत जोडो यात्रा म्हणजे त्या सर्वांच्या एकजुटीचा चाललेला प्रयत्न आहे. हा प्रयत्न कितपत यशस्वी होईल किंवा नाही हे काळ ठरवेलच; परंतु यातून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात रान उठवण्यात यशस्वी झाले हे नक्की. विरोधकांना निष्प्रभ करणे सत्ताधारी वर्गासाठी मोठी गोष्ट नसली तरी विरोधकांनीही तेवढ्याच जोशाने आणि त्वेषाने रान उठवणे गरजेचे असते, कारण या घुसळणीतूनच उद्याचा समृद्ध भारत घडणार आहे. आपण सामान्य माणसाने आपला विवेक जागृत ठेऊन यातील चांगल्याची निवड केली पाहिजे. इतिहास आपला लिहिला जात नसला तरी इतिहासाला कलाटणी मात्र आपणच देऊ शकतो, हाही इतिहास आहे.

**( लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# “को ऽ ऽ जागर्ती”



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**नवरात्र उत्सव संपल्यानंतर सगळ्यांना वेध लागतात ते कोजागिरी पौर्णिमेचे. महाराष्ट्रात सर्व दूर कोजागिरी पौर्णिमा मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. कोजागिरी पौर्णिमेचे सांस्कृतिक आणि धार्मिक दोन्ही महत्त्व आहे. आश्विन पौर्णिमा ही कोजागरी पौर्णिमा किंवा शरद पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. हिलाच 'माडी पौर्णिमा' असेही म्हणतात. ही शरद ऋतूतील आश्विन महिन्यात येते. म्हणून अश्विनी करतात .घरातील मोठ्या अपत्याला औक्षण करतात.**

या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. या दिवशी घेतलेले औषध लवकर लागू पडते असा समज आहे. ह्या दिवशी पाळावयाच्या व्रताला ‘कोजागरव्रत’ म्हणतात. दिवसा उपवास करून रात्री लक्ष्मी व ऐरावतारूढ इंद्र यांची पूजा करावी; या पूजेनंतर रात्री चंद्राला आटीव दूधाचा नैवेद्य दाखवायचा असतो. दूध आटवून त्यात केशर, पिस्ते, बदाम, चारोळ्या, वेलदोडे, जायफळ वगैरे गोष्टी घालून,.त्या दुधात मध्यरात्री पूर्ण चंद्राची किरणे पडू देतात आणि ते दूध मग प्राशन केले जाते. उत्तररात्रीपर्यंत जागरण केले जाते. अशी आख्यायिका सांगतात की या दिवशी उत्तररात्री साक्षात लक्ष्मी चंद्रमंडळातून पृथ्वीवर उतरते व लक्ष्मीदेवी येऊन ‘को जागर्ति’,म्हणजे ‘कोण जागत आहे’ असे विचारते, म्हणून या दिवसाला ‘कोजागरी पौर्णिमा’ म्हणतात.

आरोग्यदृष्ट्या ही पौर्णिमा महत्त्वाची मानली जाते किंवा अस्थमा या सारख्या आजारावर औषध दिले जाते. औषध दुधात मिसळून कोजागिरीच्या रात्री चंद्राच्या प्रकाशात ठेवले जाते त्यामुळे त्याचे गुणधर्म दुधात उतरून ते औषध परिणामकारक ठरते असे मानतात. काही भागात कोजागिरी पौर्णिमेला दूध आणि तांदळाची खीर तयार करून ती चंद्राच्या प्रकाशात ठेवतात. शेतकरी वर्गात हा दिवस उत्साहाने ग्रामीण भागात साजरा होतो. नवीन धान्य घरात आलेले असते त्याची पूजा करतात.

या दिवशी कुटुंबातील ज्येष्ठ अपत्याला ओवाळून अश्विनी साजरी करतात, व त्यांच्या भरभराटीसाठी एकमेकांना शुभेच्छा देतात.आशीर्वाद देतात. आज तुमच्याकडे काय आहे ? असे महिला औक्षणानंतर एकमेकांना विचारतात, तेव्हा आमच्या घरी अश्विनी आहे. तेव्हा दुसऱ्या महिला म्हणतात तुमची मुलं सिंहासनी. असा म्हणण्याचा प्रघात आहे.स्त्रिया एकमेकांच्या कडे जाऊन औक्षण करतात.

या दिवशी चंद्र पृथ्वीच्या अगदी जवळ असतो अनेक ठिकाणे लक्ष्मीची उपासना केली जाते. अनेक पौराणिक कथात शरद पौर्णीमा हा लक्ष्मीचा जन्मदिवस मानला जातो.पौराणिक कथांनुसार त्या दिवशी ती समुद्र मंथनातून प्रकट झाली होती. कोजागरी पौर्णिमेच्या रात्री चंद्र आपल्या संपूर्ण १६ कलांमध्ये असतो. चंद्राची किरणं विशेष अमृतमयी गुणांनी युक्त असतात.श्रीकृष्ण १६ कलांचे अवतार मानले जातात. द्वापार युगात वृंदावनमध्ये भगवान श्रीकृष्णाने गोपिकांसोबत रात्री रासक्रीडा, महारासलीला केली होती. वृंदावनात निधिवनात आजही श्रीकृष्ण आणि गोपिका रासलीला रचतात अशी मान्यता आहे.त्या विशेष प्रसंगाची आठवण करुन वैष्णव संप्रदायाचे भक्त रासोत्सव साजरा करतात.श्रीकृष्ण आणि राधाची विशेष उपासना केली जाते.

कोजागरी पौर्णिमेच्या अनेक कथा आहेत, त्यापैकी एक अशी सांगितली जाते की, एकदा एक राजा आपले सगळे वैभव्य आणि संपत्ती गमावून बसतो. त्याची राणी महालक्ष्मीचे व्रत करते आणि लक्ष्मी देवी प्रसन्न होऊन तिला आशीर्वाद देते आणि त्या राजाचे वैभव त्याला परत मिळते. असं म्हणतात की महालक्ष्मी मध्यरात्री या चंद्रमंडलातून उतरून खाली पृथ्वीवर येते. ती चांदण्यांच्या प्रकाशात “अमृतकलश’ घेऊन प्रत्येकालाच विचारते, की “को जागर्ति...? को... जागर्ति...?’ म्हणजे आपल्या कर्तव्याला कोण जागृत आहे का? कुणी जागं आहे का? अन् तिच्या हाकेला साद देण्यासाठी सगळेच जागे राहतात. मग तिची वाट पाहणाऱ्या, साद देणाऱ्या सगळ्यांना ती “अमृत’ म्हणजे लक्ष्मीचं वरदान देते, धनधान्य, सुखसमृद्धी देते.

हा दिवस वेगवेगळ्या राज्यात जसे गुजरात, राजस्थान, हरियाणा, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र,



ओरिसा, आदी ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने दिवस साजरा होतो.अनेक शहरात कोजागिरी पहाट म्हणून गायनाचे, संगीताचे,भक्तिगितांचे कार्यक्रम सादर होत असतात. लक्ष्मीच्या स्वागतार्थ रात्री रस्ते, घरे, मंदिरे, उद्याने, घाट इ. ठिकाणी असंख्य दीप लावतात.रोषणाई करतात.

सनत्कुमार संहितेत ह्या व्रताची कथा दिली आहे. प्राचीन काळी याच दिवशी ‘कौमुदी महोत्सव’ साजरा करीत. ‘कौमुदी पौर्णिमा’ व ‘शरदपौर्णिमा’ अशीही नावे ह्या दिवसाला आहेत.

पावसाळ्यानंतर थंडीची चाहूल लागली असते. वातावरण प्रसन्न असते. शरद ऋतूतील ही पौर्णिमा असल्यामुळेही तिला उत्सवाचे महत्त्व आले असावे.

तांब्याच्या किंवा मातीच्या कलश्यावर वस्त्राने झाकलेली सोन्याची लक्ष्मीची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापित करून पूजा करतात. संध्याकाळी चंद्रोदय झाल्यावर सोने, चांदी किंवा मातीचे तुपाने भरलेले दिवे लावतात. देवीला नैवैद्य दाखविला जातो. तूप घातलेली खीर तयार करून व बऱ्याच पात्रात भरून ती चंद्र किरणांखाली ठेवतात. ती नंतर संपूर्ण खीर लक्ष्मीला अर्पित करून ब्राह्मणांना प्रसाद म्हणून वाढतात. त्याबरोबर मंगल गाणी म्हणून, भजने म्हणत रात्री जागरण करतात.

कोजागरी पौर्णिमेच्या मध्यरात्री देवी महालक्ष्मी आपल्या कर कमलांमध्ये वर आणि अभय घेऊन भाविकतेने आपले व्रत करणाऱ्याला प्रसन्न होत असते. जो मनुष्य जागून माझी पूजा करत असेल त्याला मी अपार अपार धन-धान्य देईन, असे ती म्हणते.

दरवर्षी करण्यात येणारे हे व्रत लक्ष्मीला संतुष्ट करण्यासाठी केले जाते. त्याने लक्ष्मी प्रसन्न होऊन समृद्धी लाभतेच पण मृत्यूनंतर परलोकातही सद्गती मिळते.

भाद्रपद महिन्यात अनंत चतुर्दशीनंतर पौर्णिमेला अनेक ठिकाणी मुली आणि स्त्रिया भुलाबाई आणि भुलोजीची स्थापना करतात. भुलाबाई म्हणजे पार्वती आणि भुलोजी म्हणजे शंकर अशी त्यामागची भावना आहे .महिनाभर रोज संध्याकाळी गाणे म्हणतात. काही ठिकाणी गुलाबाई आणि गुलोजी असेही म्हणतात.

कोजागिरी पौर्णिमेला गाणे म्हणून जागरण करून आणि कोजागिरीची आटवलेले दूध घेऊन याची सांगता करतात व दुसऱ्या दिवशी आरती करून त्यांचे विसर्जन करतात. शहरी भागात कमी पण ग्रामीण भागातच हा गुलाबाई गुलोजीचा सण साजरा करताना दिसतात.

परंतु आजच्या बदलत्या जीवनशैलीत/ काळाचे ओघात अशा बऱ्याचशा गोष्टी बदलत चालल्या आहेत. पूर्वीच्या काळी सर्वजण एकत्र जमून, मग ते कुटुंबातील सदस्य, मित्रमंडळी, महिला मंडळ, असे सर्व एकत्र जमून चांदण्या रात्री चंद्रप्रकाशात आटवलेल्या दुधाचा स्वाद घेत असत.एकवेगळाच आनंद होता. पण आता त्यात खूपच बदल होत चालला आहे.आनंद मिळवण्याचे मार्ग बदलले आहे. काही काही ठिकाणी कुटुंब एकत्र येतात, नाही असे नाही.मंडळ ही आहेत.

पण बऱ्याच ठिकाणी कोजागिरी पौर्णिमेला पार्टीचे स्वरूप आले आहे, हे मात्र काही बरे वाटत नाही. पूर्वापार चालत आलेल्या ह्या चांगल्या परंपरा यांची जपणूक व्हायला हवी.ती आपण सर्वांनीच करायला हवी. कोजागिरी पौर्णिमेच्या सगळ्यांना शुभेच्छा.!!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शिवसेनेत वर्चस्वाचे युद्ध!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील शिवसेनेतील ठाकरे व शिंदे या गटांनी आपली राजकीय ताकद दाखविणारे मेळावे घेतले. शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी झाला होता. यावेळी राजकारणापेक्षा समाजकारणावर भर देणारे विचार मांडले गेले होते. नंतर विजयीदशमीच्या दिवशी मेळाव्यात हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वावरचे विचार ऐकण्यासाठी गर्दी व्हायची. ती परंपरा सुरु झाली, पण आता ती खंडित झाली असे म्हणावे लागेल.**

सेनेच्या दोन गटात मेळाव्यासाठी शिवाजी पार्क मैदानावरून वाद झाला. हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले. मेळावा घेणे ही आमची परंपरा आहे, तेंव्हा मैदान आम्हाला मिळाले पाहिजे, असा आग्रह ठाकरे गटाने धरला. मुंबई महापालिकेने हे मैदान कोणाची संपत्ती नाही, असे म्हंटले होते. तसेच दोन गटातील वादातून कायदा सुव्यवस्था धोक्यात येवू शकते, असे पोलिस यंत्रणे म्हणणे . या कारणावरून दोन्ही गटाला मैदान नाकारण्यात आले. पण न्यायालयाचे हे सर्व कारणे बाजूला ठेवत ठाकरे गटाला मेळाव्यासाठी मैदान देण्याचा निर्णय दिला. तेंव्हा भविष्यात शिवसेना न्यायालयाचा आधार घेत या मैदानाचा आग्रह धरत जाईल. मैदानाचा निर्णय ठाकरे गटाच्या बाजूने लगला, जणू आम्ही मोठी लढाई जिंकली याच आविर्भावात आंनदोत्सव साजरा केला. पण लंका अजून लांब आहे. यासाठी शिंदेना स्थगितीसाठी सर्वोच्च न्यायालयात जाता आले असते. पण मुख्यमंत्री शिंदे यांनीच स्वतः न्यायालयात जाण्याचा विचार सोडला. त्यांनी सुडबुध्दी दाखविली नाही. आता शिवसेना कोणाची? खरे हिंदुत्ववादी कोण ? भ्रष्टाचार कोणी केला? (खोके) या तीन मुद्द्यांवर वर्चस्वाची लढाई सुरु झालेली आहे. ती आता थांबणार नाही, असे दिसतेय! महाराष्ट्रातील सत्ता गेल्यानंतर उध्दव ठाकरे बिथरले आहेत. आपली शिवसेना व आपले घरच फुटते आहे! ती पुन्हा जोडता येईल का! यातून मार्ग काढता येईल, याचा ते मुळीच विचार करत नाहीत. ते मी व माझ्या कुटुंबाची शिवसेना मालकीची आहे, अशी हटवादी भूमिका घेत आहेत. यातून शिवसनेचे नुकसान व उभी फूट पडत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बिनचिपळ्याचे नारद आनंद लुटत आहेत. शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह वादात सापडले आहे. हा वाद निवडणूक आयोगाकडे गेला आहे. काँग्रेस पक्षाचे १९६९ मध्ये विभाजन झाले, तेंव्हा आधी बैलजोडी चिन्ह गोठविले गेले! त्यानंतर पक्षाने गाय वासरू चिन्ह घेतले. १९७५ मध्ये पुन्हा काँग्रेस पक्ष फुटला, हेही चिन्ह पक्षाला गमवावे लागले. त्यानंतर पंजा चिन्ह घेतले आहे. उध्दव ठाकरे यांनी दसरा मेळावा घेतला, तरी पक्षावरील संकट अजून टळलेले नाही. घोडा मैदान आगे है! ठाकरे यांनी मेळाव्यात काय विचार मांडले? त्यांनी शिंदे गटाबाबत डुकर, गद्दार बांडगूळ, आदी शब्दांचा प्रयोग केला. राजकीय भाषणात विरोधी पक्षावर टीका होतच असते, कोपरखळ्या मारल्या जातात. पण टीका करताना तारतम्य पाळले पाहिजे. ठाकरे यांचे भाषण म्हणजे विचाराचे सोने होते काय? ते तर राजकीय शिमगा होता! अशी टीका भाजपा करत आहे. शिवसेनेला नवीन तरूणांना व्देषाच्या राजकारणाचे धडे द्यावयाचे आहेत काय? ठाकरे यांचे भाषण काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारसरणीतील वाटले, असेही म्हंटले जात आहे. शिंदे यांनी खरा गद्दार कोण? हा प्रश्न विचारला आहे ? पण त्यांनी शिव्या दिल्या नाहीत. उलट शिंदे गटाने तीन महिन्यात बाजी मारली, असेच म्हणावे लागले! ठाकरे मेळाव्याला जेमतेम एक लाख तर शिंदे गटाला मेळाव्याला दोन लाखाच्या वर लोक जमले होते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. शिंदे गटाने चार महिन्यात एवढे राजकीय बळ मिळवणे सोपी बाब नाही. शिंदे यांनी मेळाव्यासाठी पैसा कोठून आणला? शिंदे यांनी शिवसेना कार्यकर्त्यांना आणण्यासाठी राज्यातील एस. टी. बसेसचा वापर केला. पण त्यांनी प्रामाणिकपणा दाखविला खरा! त्यांनी दहा कोटी रुपये रोख भरले. एवढी रोख रक्कम कोठून आली? ती कोणी दिली? असे प्रश्न विचारले जात आहेत. शिंदे मेळाव्याच्या खर्चाची माहीती सार्वजनिक करावी. पण ते करणार नाहीत. केंद्राची ईडी याची चौकशी करणार आहे काय? भ्रष्टाचाराची चौकशी एकतर्फी होता कामा नये! ठाकरे गटातर्फे दरवर्षी मेळावा होतो. या मेळाव्यावर खर्च कोण करतो? ठाकरे घरातून थोडाच पैसा खर्च करतात! हा पैसा नेमका कोणाचा? याची माहिती शिवसेनेचे दोन्ही गट देतील काय? तेंव्हा शिवसेना काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी या प्रश्नावर दुसऱ्याची शेपटी उचलण्याचा प्रयत्न करू नये. काँग्रेस पक्षातर्फे राजकीय सोहळ्यासाठी रेल्वे गाड्या मोफत सोडलेल्या आहेत. राजकीय सोहळ्यावर होण्यारा खर्च सार्वजनिक व्हावा, अथवा जिल्हा प्रशासनाला सादर केला गेला पाहिजे. तो खर्च पक्षाच्या फंडातून खर्च झाला असेल तर विषय वेगळा! पण राजकीय सोहळ्यासाठी पैसा इतरांकडून घेतला जात असेल तर त्याबाबचे स्रोत्र सांगणे आवश्यक आहे.

देशातील राष्ट्रीय गुन्हा अन्वेषण विभागाच्या (NCRB) नोंदीनुसार कर्नाटक नव्हे, महाराष्ट्र भ्रष्टाचारात अग्रेसर आहे. २०२० मध्ये महाराष्ट्रात ६१८ गुन्हे दाखल झाले होते. देशात भ्रष्टाचाराबाबत राजकीय पक्षांना चीड नाही. भ्रष्ट हा शब्द चारित्र्यावर मोठा कलंक आहे. याची खंत वाटत नाही. उलट भ्रष्टाचारी व्यक्तीचे पक्षाकडून समर्थन व स्वागत केले जात आहे, हेच दुर्देव आहे. भ्रष्ट नेत्यावर कारवाई झाली की, लगेचच' तुमचा, आमचा भ्रष्टाचार',अशी चर्चा रंगते. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार मधील माजी गृहमंत्र्याला शंभर कोटीच्या खंडणी प्रकरणात जेलमध्ये जावे लागले. हा आरोप विरोधी पक्षाने नव्हे माजी पोलिस आयुक्त परमबीरसिंह यांनी केलेला आहे. अल्पसंख्याक्षक मंत्री नवाब मलिक यांनी आंतरराष्ट्रीय गुन्हेगार दाऊद इब्राहिमची बहिण हसीना पारकर यांची तीनशे कोटीची जमीन ५५ लाखात खरेदी केली. शिवसनेचे नेते व पत्रकार संजय राऊत यांनी पत्राचाळ प्रकरणातील गैरव्यवहारात अटक झाली. राऊत यांनी ९७२ सामान्य मराठी कुटुंबाच्या घराचे स्वप्न उध्वस्त केले, हा गंभीर आरोप आहे. यातून जागा विकून एक हजाराच्या वर रक्कम कमावली गेली. तरी हे नेते निरापराध आहेत! असे छातीठोकपणे राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना नेते कसे सांगू शकतात. यातील देशमुख यांना केवळ जामीन मिळाला तर सत्याचा विजय झाला, अशी प्रतिक्रिया खा. सुप्रिया सुळे यांनी लगेचच दिली. यात सत्य काय? ते त्यांनी सांगावे! लोकशाही व्यवस्थतेत गैरव्यवहार केला की नाही? हे न्यायालयाला अधिकार आहेत, पक्षाला नाहीत. हे माहित असताना राजकीय नेत्यांनी भ्रष्ट व्यक्तीचे समर्थन करु नये. पण राजकारणात नितीमत्ता हा शब्द दुर्मीळ होत चालला आहे. शिवसेना ठाकरे गटाने तर परवा व्यासपीठावर राऊत यांच्या शौर्याच्या स्मरणार्थ खूर्ची रिकामी ठेवली होती. पण त्यांना दसरा जेलमध्ये साजरा करावा लागत आहे. नेत्यांना हा 'महाराष्ट्राचा अपमान' वाटत नाही, याचे आश्चर्य वाटते! १९६० दशकात महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात भरभराट होती. पण सद्या राज्यातील ऐंशी टक्के सहकारी संस्था गैरव्यवहारमुळे अवसायानात निघालेल्या आहेत. यात सेवा सहकारी संस्था, सहकारी बँका, सूत गिरण्या, दुग्ध संस्था, साखर कारखाने आहेत, या संस्था ओस पडल्या आहेत. या सहकारी संस्थाच्या तोट्याची माहिती शासनाच्या आर्थिक अहवालात पहावयास मिळेल. मग हे पाप काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे नाही काय? यातील तोट्यात आलेले साखर कारखाने अधिकतर राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांनी विकत घेतले आहेत. यात अजित पवारांनी एक साखर कारखाना घेतला. पोलिसांनी माजी मंत्री, शिवसेना नेत्याला सन्मानाने अटक करून अलिशान गाडीतून नेले. पण शरद पवारांवर आक्षेपार्ह टिप्पणी केली म्हणून निखिल भामरे या तरूणाला गुन्हेगाराप्रमाणे हातात बेड्या घातल्या गेल्या. तर किरण इनामदार, केतकी चितळे या तरूणीवर हल्ला करून तुरूंगात डांबले गेले.



याबाबत न्यायालयाने कानउघाडणी केल्यानंतर त्यांची सुटका झाली आहे. अजित पवार म्हणाले, शिंदे सरकारला सत्तेचा माज आलाय! मग राज्यात पहिले महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर काय घडले! सत्ता येताच पालघरमध्ये साधूंची हत्या, दोन पत्रकारांना अटक, तरूणांना तरूंगात डांबल गेल! मुंबईच्या पोलिस आयुक्तालयात कट व्यापाऱ्याचा खून, उद्योगपतीच्या घरोसमोर पोलिसच स्फोटके ठेवणे, गृहमंत्र्याकडून शंभर कोटीची मागणी, एका मंत्र्याकडून आंतरराज्य गुन्हेगारांच्या कुटुंबाबरोबर आर्थिक व्यवहार, मराठी माणसांची घरांचे स्वप्न बेचिराख करणे, हा अंधाधूंद कारभार महाविकास आघाडी सरकारमधला आहे.भ्रष्टाचारी नेते हे छाती वर काढून हात उंचावत आहेत! ! तर बेशरमपणाचा कळस आहे ! 'नाक कापले तर छिद्र आहे', असे म्हणतात! महाराष्ट्रात आता भ्रष्टाचारांच्या निर्लज्जपणाची परंपरा आता सुरु झाली आहे.राज्यात २१ नेत्यांच्या राजकीय विरोधात चौकशी चालू आहे.यात अजित पवार, प्रताप सरनाईक,यशवंत जाधव,एकनाथ खडसे,अनिल परब,भावना गवळी, यशवंत जाधव,आशोक चव्हाण, गिरीश महाजन,प्रविण दरेकर, हसन मुश्रीम,आणि किरीट सोमय्या आदी नेते यांचा समावेश आहे. शिंदे सेनेचे यांचे सरकार सामान्यांचे आहे म्हंटले जाते,पण तेही टक्केवारीचे सरकार आहे.धर्मवीर चित्रपटातील एक दृश्य आहे,सेनेचे नगरसेवक झाला की,फोरव्हिलर घेतो! तेच चित्र नांदेडमध्ये पहावयाला मिळेल! शिंदे गटाचे पूर्वी नगरसेवक होते तेंव्हा स्कूटरवर फिरत असत.आमदार झाल्यानंतर अलिशान गाडीत फिरत आहे!या बदल पहावयाला मिळतो.

अश्या नेत्यांना सामान्यांच्या दुःखाची पर्वा आहे. भाजपा ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचे हवाला प्रकरणी जैन डायरीत नाव पुढे केले गेले,तेंव्हा नैतिकता म्हणून त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला होता. आम आदमी पार्टीचा जन्म समाजसेवक अण्णा हजारेंच्या आंदोलनातून झाला. केजरीवाल यांनी देशात आमचा पक्ष इतरापेक्षा वेगळा असेल, असे सांगितले,शेवटी खूर्चीवर माणूस बसला की भ्रष्ट होतो.या पक्षाचे आरोग्य मंत्री सत्येंद्र जैन हे जेलमध्ये आहेत.या आप सरकारने मंत्र्याला पदावरून काढलेले नाही. चौकशी दरम्यान मंत्र्यांची स्मरणशक्ती गेली होती म्हणे!पश्मिम बंगालमधील मुख्यमंत्री सी.बी.आय व ईडीचा गैरवापर होतो,अशी ओरड मुख्यमंत्री ममता बॅनर्जी करत होत्या.पण सरकारमधील शिक्षणमंत्री पार्थ चटर्जीकडे करोडो रूपायांचे घबाड सापडले.हे पैसे मोजण्यासाठी मशिनी आणाव्या लागल्या होत्या.जेंव्हा ही यंत्रणा छापा टाकते तेंव्हा नोटांचे ढीग कसे काय सापडतात?प्रशासनातील भ्रष्टाचार सी,बी.आय उघडकीय आणतात.मग राजकीय लोकांवर भ्रष्टाचाराची कारवाई का नको!भारतातीय घटनेते व कायद्यात राजकीय नेत्यावर कारवाई करावीच नाही,अशी तरतूद आहे काय? जे नेते स्वच्छ असतील ते न्यायालयात न्याय मागू शकतात!पण चोर !चोर! मौसेरे भाई, या सर्व यंत्रणेचा विरोध केला जातोय.'सत्तेपासून सत्ता' हे समीकरण काँग्रेस सत्तेत असताना सुरूवात झाली. तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचेवर न्यायालयाने सत्तेचा गैरवापर केल्याचा ठपका ठेवला होता. दूरसंचार विभागाचे माजी मंत्री सुखराम यांना जेलमध्ये जावे लागले. बिहार राजदचे नेते लालू प्रसाद यांना चारा घोटाळाच शिक्षा झाली. तेव्हा भ्रष्टाचाराबाबत'आपला तो बाबा, दुसऱ्याचं ते कारटं' अशी दुटप्पी भूमिका हा प्रश्न संपणारा नाही.

# आकाशाच्या गर्भात



बबलू कराळे
संपर्क क्र.: 7218029838

आधुनिक केसरी

**आकाशाच्या गर्भात चंद्राचे अन् चांदण्यांचे चाललेले हे सौंदर्याचे मनमोहक अभेदक रुपाचे रुपवंत सर्वांना भारावून सोडत व्होते... चंद्र आपल्या सखीला आपल्या सोबत त्या रात्रीच्या प्रहरामध्ये सोबत घेत संपूर्ण प्रवास करत आहे असेच प्रत्येक्ष दुष्य सर्वत्र मनाला भुरळ पाडत व्होते... कदाचित याचा भास त्यांना तर झाला नसेल म्हणून चंद्र आणि त्याची सखी दुरवर जाण्यास त्या स्वर्गीय जागेवरुन दुर जाण्यास सुरवात करतात... कदाचित त्यांना वाटत असेल की आपल्याला कोणी पाहू नये... मग् आकाशामधून त्यांची चालण्याची गती वाढलेली दिसते...**

सूर्याने आपला परतीचा प्रवास आरंभलेला, आकाशाच्या कुशीत शांत विसावा घ्यावा तसे त्याने आकाशाच्या काळीजकप्प्यामध्ये विसावा घेतलेला त्याचे दिवसभराचे कार्य जणू संपलेले, असे त्याच्या दिवसभऱ्याच्या शेवटच्या सौंदर्यांनी उधळलेल्या सोनेरी छटांच्या वास्तव्यावरुन जाणवलेले त्याच्या विसाव्यावरुनच शेतावर राबणारे अन् आपल्या घरट्यापासून दुरवर गेलेले प्राणी, पक्षी यांनी आपल्या घरट्याकडे कुच केलेली, आजचा दिवस काही वेगळा भासलेला. आज आकाशामध्ये चंद्राचे पुर्ण प्रतिबिंब दिसलेले त्याच्या त्या दुधरंगी प्रकाशाने सर्वांना आपल्याकडे आकर्षित केलेले. मग हळूहळू झुजूमुंजू व्हायला सुरुवात झालेली, आकाशामध्ये पक्षी आपल्या थव्यांनी आपल्या घरट्याकडे आलेले ते आपल्या घरट्यामध्ये जाऊन आपल्या पिल्लांसोबत रमलेले, मग हळूहळू दिवेलागणेची वेळ समिप आलेली गावाचे निरिक्षण केले तर सर्वत्र दिव्यांचे स्वराज्यं सर्वकडे चटकपणे दिसलेले त्यांच्या प्रकाशाने येणाऱ्या अंधारावर त्यांनी आधीच मात करण्यासाठी ते अगदी सज्य झालेले पडणाऱ्या अंधारावर त्यांचे चमकणारे प्रतिबिंब आणखीनच सौंदर्य पूर्ण खुलून दिसलेले . आकाशामध्ये तेवढयात आनखीनच चटक प्रकाशमय चंद्राने आपले पूर्ण मनाला भारावून सोडणारे प्रतिबिंब त्याचे अवतरले, आज आकाशामध्ये पुर्ण चंद्र विराजमान झालेला. कारण आज पोर्णिमा होती. पोर्णिमा म्हणजे जणू आज आकाशामध्ये प्रकाशाचा उत्सवचं व्होता मग ज्याची त्याची धावपड सुरु झाली त्या चंद्राच्या शितल प्रकाशामध्ये दुध घोटण्याकरीता जो तो सरसावला अन् सुरु झाले एक आकाशाच्या त्या मंतरलेल्या प्रकाशात दुधघोटन चंद्राचे प्रतिबिंब त्या दुधाच्या भांडयामध्ये अवतरल्या पर्यंत हा दुधी प्रकाशाचा कार्यक्रम चालायचा या आकाशाच्या क्षता खालीआकाशामध्ये आज प्रत्येक चांदणी चमचम करत व्होती तिला मिळालेल्या प्रकाशाचे अमृत तिने आज संपूर्ण आकाशामध्ये धुंद होऊन प्रकाशित केले होते या दुधी




आकाशाच्या गर्भातील भारावलेल्या प्रकाशामुळे या धरतीवर रात्र सुध्दा दिवसासमान वाटायला लागली व्होती. चंद्राचे आणि आकाशामध्ये चमकणाऱ्या चांदण्याचा शितल प्रकाश चांदीच्या सुक्ष्म ताराप्रमाणे पडणारे किरणे हे आता त्या दुधाच्या भांडयामध्ये पडत व्होते ते दुध आता एक मंथरलेले औषधच झाले व्होते ते या मानव जातीला अत्यंत लाभकारक व्होते या चंद्राच्या प्रतिबिंबित प्रकाशाने अमृत झालेले हे दुध प्राशन करण्यास मग हा मानव प्राणी सरसावतो हे त्याला दिलेले अमृतमय दानच ना हे दान घेण्यास आणि ज्याच्या नशिबात असते ते त्यालाच मिळते यात शंकाच नाही. आकाशाच्या गर्भात चंद्राचे अन् चांदण्यांचे चाललेले हे सौंदर्याचे मनमोहक अभेदक रुपाचे रुपवंत सर्वांना भारावून सोडत व्होते. चंद्र आपल्या सखीला आपल्या सोबत त्या रात्रीच्या प्रहरामध्ये सोबत घेत संपूर्ण प्रवास करत आहे असेच प्रत्येक्ष दुष्य सर्वत्र मनाला भुरळ पाडत व्होते. कदाचित याचा भास त्यांना तर झाला नसेल म्हणून चंद्र आणि त्याची सखी दुरवर जाण्यास त्या स्वर्गीय जागेवरुन दुर जाण्यास सुरवात करतात. कदाचित त्यांना वाटत असेल की आपल्याला कोणी पाहू नये मग् आकाशामधून त्यांची चालण्याची गती वाढलेली दिसते.

आकाशाच्या गर्भात हे रात्रभर चादुई मोरपिस फिरवल्यागत चाललेले लावण्याचे भावपूर्ण नैसर्गिक दुष्य मनाला भारावून सोडते या घटनेचा साक्षिदार जो तो होण्यास उत्सुक असतोच, हे दुश्य पाहिल्यावर पक्षी, प्राणी पासून मानव जातीपर्यंत त्यांच्या मनामध्ये निर्माण होतात प्रेमाचे तरंग अन् ते ही आपल्या ह्दयाच्या अगदी जवळ असणाऱ्या आपल्या जीवनसंगीनीला एकमेकांकडे आकर्षित करतात त्यांच्या मनातील प्रेमतरंग त्यांच्या जीवनात हया आठवणी नेहमी करीता घर करुन जातात अन् आठवणीत राहतात आयुष्यभरासाठी त्यांच्या आयुष्यात नेहमी करिता आनंद निर्माण करणारी ही घटना त्यांच्या जीवनसौंदर्याला उजळून टाकते आणि या आपल्या आयुष्यातील आठवणी घेऊन जगतात ते शेवटपर्यंत.

आकाशाच्या गर्भात चाललेले हे रात्रीचे पांढऱ्या शुभ्र प्रकाश किरणांचे पर्व अखेर संपुष्ठात येते कारण आता हळूहळू दिवसाच्या छटा क्षितीजावर ऊमटू लागलेल्या असतात रात्रभर केलेली हया चांदण्यांणी आपल्या सौंदर्याची चंद्रावर केलेली उधळण या दिवस उजाळण्यांच्या खुणांनी हळूहळू लुप्त होत जाते हे सौंदर्याची गुफलेली माळ अखेर ह्दयाच्या कप्प्यामध्ये खोलवर रुजवून जातेअन् सतत दस्तक देत राहते या आकाशाच्या गर्भातील पांढऱ्याशुभ्र नैसर्गिक जादुई प्रकाशाची पण हे पर्व संपलेले नसते कारण ते पुन्हा येणार याची चाहूल ठेऊन जाते. आकाशातील गर्भात चाललेले हे प्रकाश पर्व म्हणजे निसर्गानेच निर्माण केलेले नैसर्गिक प्रेमसुतच.

तुकारामनीती
भाग 29

# अधिकार तैसा दावियेला मार्ग ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जगद्गुरू संत तुकोबाराय! मराठी वाङमयाला सुवर्णालंकारीत करणारा महापुरुष! तुकोबांची अनुभूती आणि त्याद्वारे झालेले जीवनाचे प्रकटीकरण याचे आजीवन चिंतन केले तरी आणखी काहीतरी शिल्लक राहिलंय याची कुणकुण लागेल असं कालातीत लेखन! तुकोबा बोलून बोलत नाहीत, लिहून लिहित नाहीत. काळाने सहजच त्यांना स्थितप्रज्ञ अवस्थेला नेवून ठेवले आहे! त्यामुळेच त्यांचे अनेक अभंग द्वंद्व वाटत असले तरी त्यांना थंड-गरम याचे काही उरले नाही. म्हणूनच ते 'बोलों अबोलणें मरोनियां जिणें । असोनि नसणें जनि आम्हां ॥' असे अभंग लिहू शकतात. हा अभंग वाचला तरी अंगावर काटा उभा राहतो. कोणतीही भावानुभूती अभिव्यक्त होतांना लेखक-कवी त्या त्या अवस्थेला जाऊनच आपली निर्मिती जगांसमोर ठेवत असतो. सृजनाकडून जगाला नेहमी हीच अपेक्षा असते! कोणतीही निर्मिती एकदम, सहजासहजी होत नसते. तुम्ही-आम्ही आज ज्या वयाचे आहोत, तिथपर्यंतचा प्रवास आठवून बघा? आपला जन्म आणि त्यावेळची आपल्या आईची अवस्था? हे प्रश्न कधीतरी आपल्या आईला विचारून पहा. या सर्वच प्रश्नांची उत्तर ही निर्मिती प्रक्रियेची उत्तर असतील.**

निर्मितीची वेदना आणि त्यानंतर होणारे अलौकिक सुख म्हणजे ते दुःखातील सुख आहे! गुणवत्ता यादीत प्रथम क्रमाक आलेला किंवा धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांत पटकावलेल्या विजेत्याला ८-१० किमी पळून जिंकल्यानंतरची त्याची अवस्था पहा! तो विजेता असतो, परंतु त्यामागे त्याचे अथक प्रयत्न-परिश्रम असतात. जशी ही अनुभूती आहे, तशाच प्रकारची अनुभूती संत तुकोबांची त्यांच्या वेगवेगळ्या अभंगातून प्रकट होतांना दिसते. त्यामुळेच तुकोबा 'तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा' असे स्वतःच जाहीर करून टाकतात. हे मोठं मजेशीर आहे. सोबत राहून सोबत रहायचे नाही, भोगांचा सर्वच अर्थाने त्याग करून अगदी कमलदलासारखे पाण्यात राहून अलिप्त रहायचे! ही अवस्था म्हणजेच तुकोबा!

तुकोबांचे सर्वच अभंग सांसारिक माणसांच्या जागृतीसाठी असून आज आपण कोणत्या काळात जगत आहोत? या काळाच्या सर्वच प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडे आहेत. बोलतांना तुकोबा तोलून मगच बोलतात. त्यामुळे त्याचं लेखन वाचतांना सहजतेने पाठांतर होऊन जाते. आज चिंतनासाठी निवडलेला

अधिकार तैसा दावियेले मार्ग । चालतां हें मग कळों येतें ॥१॥
जाळूं नये नाव पावलेनि पार । मागील आधार बहुतांचा ॥२॥
तुका म्हणे रोग वैदाचे अंगीं । नाहीं करी जगीं उपकार ॥३॥
(शा.अ.गाथा अ.क्र.538)

हा अभंग जवळपास सर्वांच्याच पाठातील आहे. पाठातील असला तरी या आणि तुकोबांच्या अनेक अभंगांची वैशिष्ठ्ये म्हणजे ते केवळ वाचायला, लिहायला आणि त्यावर बोलायला एकदम छान वाटते, मात्र हे सर्वच अभंग आजकालच्या संसारिक आणि तथाकथित पारमार्थिक माणसांना तोलायला मोठे जड जाताहेत. आज उपदेश करणारांचे, व्याख्यात्यांचे, कीर्तन-प्रवचनकारांचे अक्षरशः पेव फुटले आहे! संत एकनाथांचा 'गुळ खाणे सोडण्याचा दृष्टांत' सर्वश्रुत आहे. हा संकेत खूपच बोलका असून या अनुषंगाने सातत्याने काम होणे अपेक्षित आहे! आजमितीला अधिकार असणारी माणसं मोठमोठ्या पदांवर बसून जगाला उपदेश करतांना दिसत आहेत, मात्र आपण बोललेल्या वचनाचा आणि त्यांतरच्या वर्तनाचा अर्थार्थी कसलाही संबंध येत नसल्यामुळे उपदेश किंवा मार्गदर्शन कुचकामी ठरते आहे. एका कीर्तनकाराने

तुका म्हणे ज्याची संपदा एवढी । सांगाते कवडी गेली नाही ॥

या तुकोबांच्या अभंगातील लंकापती रावणाची श्रीमंती आणि त्यानंतर तो रिकाम्या हाताने हे जग सोडून गेला, सिकंदर खाली हाताने गेला, असे एक ना अनेक सरस दृष्टांत आणि त्या अनुषंगाने भोळ्या-भाबड्या लोकांना विविध सिद्धांत पटवून दिले. लोक हसले, तर कधी रडले. कीर्तन एकदम उत्तम झाले, परंतु गावातून बाहेर जातांना महाराजांना नारळ आणि बिदागी द्यायची वेळ आली, तेंव्हा ठरलेल्या रकमेपेक्षा पाचशे रुपये कमी असल्याकारणाने महाराजाने संयोजक मंडळींसोबत भांडण काढले. महाराज आकांडतांडव करू लागले, जोरजोरात ओरडू-बोलू लागले! लगेच आजूबाजूच्या तरुणांनी महाराजांचे विश्लेषण करायला सुरुवात केली. हा महाराज केवळ बोलका पोपट आहे! असे महाराज पुन्हा बोलावू नका, यांची तारीख घेऊ नका! हे लोक बोलतात एक आणि वागतात एक! सामान्य लोकांमध्ये ही गोष्ट लगेच प्रसारित झाली आणि संपूर्ण कीर्तन परंपराच बदनाम झाली. सांगायचे तात्पर्य, आज अधिकारवाणीने बोलणारी आणि तोलणारी माणसं दुर्मिळ झाली आहेत!

अधिकारी व्यक्ती ही मोठीच असते! ती जबाबदार असते! त्या व्यक्तीची भूमिका आई-वडिलांची असते! शेवटच्या माणसाची सुरक्षा आणि त्याचे संगोपन हा दृष्टीकोन त्या व्यक्तीकडे असावा लागतो. त्याच धरतीवर, जे लोक नावेतून पैलतीरी गेले आहेत त्यांनी ती नाव लगेच जाळून न टाकता आपल्या मागून आणखी भरपूर लोक येणार असून ही नाव पुन्हा अनेकांना पैलतीरी नेणार आहे याचे भान ठेवावे! आज केवळ स्वार्थ समोर ठेवून ज्ञानोबा-तुकोबांच्या अभंगांचे लाखात व्यवहार चालू आहेत! ही त्यांच्या विचारांशी केलेली घोर, भयंकर प्रतारणा आहे! या व्यवहारांनी वारकरी सांप्रदाय बदनाम, कलाकिंत होत आहे! भजन-कीर्तन-प्रवचन याकडे व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून पहिले जात आहे. तशी शिकवण देऊन, तयारी करून घेतली जात आहे! भजन-कीर्तन-प्रवचन ही माणसांची अंतर्बाह्य शुद्धीची अलौकिक साधने असतांना त्यांना व्यवहाराचा स्पर्श झाल्यामुळे ही साधने कलुषित होत आहेत. ही जरी कला असली; तरी ती शांती, संयम,भक्ती, शुद्धी यासंबंधाने सर्वश्रेष्ठ कला असून त्यातून उच्च कोटीचा सज्जन माणूस निर्माण होऊन तो जगाला मार्गदाता होणे अपेक्षित आहे. यासाठी आपल्याला आद्य संत कवयित्री जनाबाई, संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत तुकाराम आणि आदि संतांचा



मोठा दैदिप्यमान इतिहास आहे. हाच आपल्या सर्वांचा आधार असतांना आपणच जर अशा अनेक प्रलोभनाला बळी पडलोतर येणाऱ्या पिढ्या आपल्याला क्षमा करतील का? तेंव्हा, अधिकार प्राप्त व्यक्तीने आपल्या अधिकारांचा विनियोग करतांना साधक-बाधक बाबींचा विचार करून मगच पुढचे पाउल टाकावे, तेच पाऊल सर्वांना मार्गदर्शक असेल याचा सखोल विचार व्हावा.

या अभंगात शेवटी तुकोबाराय, वैद्य आणि त्याचे उपचार या दृष्टीने मोलाचे वचन लिहून जातात. एखादा वैद्य किंवा शल्यचिकित्सक लोकांवर उपचार करतो, याचा अर्थ त्याला कोणतेच रोग होत नाहीत का? तर असं काहीच नाही. डॉक्टर लोकांवर उपचार करतांना त्याला सुधा रोग विळखा घालत असतात. उलट डॉक्टरांना संसर्ग होणाची दाट शक्यता असत. आत्ताच कोरोना लाटेत पीपीई कित घालून कोरोना वार्डात काम करणारे डॉक्टर्स कोरोना बाधित झाली आणि त्यांना आपले प्राण गमवावे लागले. शिवसेनाप्रमुख स्व.बालासाहेब ठाकरे यांच्या हृदयाची यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना जीवदान देणारे जगातील सुप्रसिद्ध हृदयाचे डॉक्टर नीतू मांडके यांचा मृत्यु हृदय विकाराच्या झटक्यानेच झाला हे विसरून कसे चालेल! असे एक ना अनंत उदाहरणे देता येतील, जेणेकरून वैद्य किंवा डॉक्टरांना सुद्धा लोकांवर उप्कॆह्न करत करत स्वतःची काळजी घावी लागेल! अगदी तसेच अधिकार प्राप्त, मोठ्या लोकांना आपल्या अधिकाराचे भान ठेवून वर्तन करावे लागेल! असे झाल्यासच खऱ्या अर्थाने त्या व्यक्तींच्या विचाराचे सार्थक होणार आहे.

तुकोबांच्या अभंगांचे एक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांचे दृष्टांत आणि सिद्धांत हातात हात घालू चालतात. उपदेश करतांना तुकोबा आणि त्यांचे अभंग कुणाचाही मुलाहिजा ठेवत नाहीत. आजचा अभंग अधिकार प्राप्त म्हणजेच अधिकारी व्यक्तीने कसे वर्तन करून (?) सामान्य आणि इतरांना मार्गदर्शक व्हावे याचे मार्गदर्शन करणारा आहे. अधिकारी व्यक्ती हा सैन्याच्या कॅप्टन सारखा असला पाहिजे! कॅप्टन पराभूत झाला की संपूर्ण सैन्य सैरभैर होत असते हे लक्षात असावे. हे अधिकारी व्यक्ती म्हणजे घरातील मोठी-जबाबदार माणसं, ऑफिस किंवा देश चालवणारी मोठ्या पदावरील माणसांनी योग्य मार्गाने चालून मागील लोकांचा विचार होणे अपेक्षित आहे. आपण योग्य मार्गावरून चालायला लागलो की आपल्याला फॉलो करणारे लोक पथभ्रष्ट होत नाहीत. हाच अधिकार मोहरक्या किंवा अधिकारी व्यक्तीने आपल्या मनात, अंगी बाळगून शांत-संयम ठेवून स्वच्छ-प्रांजळ वर्तन करून मार्गदर्शक वर्तन करावे!

वाचक मित्रहो, मी लिहितोय त्यात आपण काही सुधारणा सुचवणे अपेक्षित आहे. या लिखनाला आपल्या सर्वांचे मार्गदर्शन किंवा योग्य-अयोग्य कोणत्या का असेना, पण प्रतिक्रिया याव्यात! असा माझा अट्टहास-आग्रह मुळीच नाही, परंतु जर एखादी सुचना आली, तर त्यानुसार आणखी चिंतन होऊन अपेक्षित बदलाच्या द्वारे नव्याने चिंतन मांडता येईल. तेंव्हा चला तर मग, आपण तुकोबांचे हे अनमोल-कालातीत शब्दधन जतन करून याच आधारे जीवनाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न करूयात! असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने तुकाराम नीतीचे सार्थक होणे आहे! जय तुकोबाराय!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# उत्तुंग मनाचा 'अभिषेक'



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

**आपण कुणाला भेटलो की,असे वाटते... आपला आणि त्यांचा याअगोदरचा काहीतरी संबंध आहे,त्यांच्यासोबत काहीतरी नाते आहे.हे ऋणानुबंध फार वेगळे असतात,ते शब्दांमध्ये व्यक्त करणे कठीण गोष्ट आहे.काही माणसे आयुष्यात येतात आणि आपल्या जीवनाचा एक नकळत एक भाग बनून जातात.खरंतर मैत्रीला ना वयाचे बंधन असते ना जातीचे..निखळ व नितळ मैत्री ही कुठल्याही वयोगटात होऊ शकते. असाच एक दिलखुलास मित्र बरोबर एक वर्षांपूर्वी माझ्या आयुष्यात आला...म्हणजे माझ्या कार्यालयातील सहकारी ते म्हणजे अभिषेक कांबळे.**

नोकरी म्हंटली की धावपळ आली.आणि त्यात मुंबईची फास्ट लाईफ सगळ्यांना माहीत आहे.पोस्टल असिस्टंट म्हणून माझे प्रमोशन झाल्यानंतर साकिनाका पोस्ट ऑफिसमध्ये माझा पहिला दिवस. १० ते ११ वर्षांचा अनुभव पाठीशी पण तरिही नवे ऑफिस म्हटले की पोटात गोळा असतोच.जेव्हा ऑफिस जॉईन केले,त्यावेळी लॉकडाऊन मुळे रोस्टर ड्युटी सुरू होती.मी त्यांच्या कार्यालयात बदली होऊन येणार हे माझे नवे मित्र जाणत होते आणि त्यांनी माझे उत्तमरीत्या स्वागत देखील केले.कडकडून मिठी मारली.खरंतर आमची अगोदरची काहीच ओळख नाही.पण पहिल्या भेटीतच आमचे स्नेहभाव इतके जुळले आणि हे नात्यांचे बंध आणखी वाढतच गेले.हे दिलखुलास टायगर व्यक्तिमत्व म्हणजे अभिषेक कांबळे...

ते मूळचे दौंड गावचे.म्हणजे पुणे जिल्ह्यातील.माझा भाऊ देखील नोकरीनिमित्त दौंडला असल्याने दोघांचे घर देखील आणखी जवळ आले. गावाकडची आपली भाषा आणि सुस्वभावी व्यक्तिमत्व यांचा ताळेबंद आखत अभिषेक यांनी मुंबईत अनेक नवे मित्र जोडले. त्यांच्या या मित्रांच्या यादीत रविकिरण घाडी, प्रवीण पवार,अतुल कुगणे,प्रभाकर बिट्टेवार,वाजीद हमदुले, सूर्यकांत देसाई,कैश शेख,पांडुरंग बैलकर,सुनील डोंबे,नंदकिशोर उतेकर,आशुतोष देशपांडे,वैभव भवारे व गजानन नागरे बरोबर माझे देखील नाव जोडले गेले याचा मला सार्थ अभिमान आहे.

नोकरी निमीत्ताने तसेच एकाच कॉलनीत आम्ही राहायला असल्याने रोजचे जाणे-येणे सोबत...त्यांच्या बाईकची मागची सीट ही माझ्यासाठी रिकामी होती...असे वाटले...आमचा बाईकवरचा रोजचा प्रवास...यातून भेटी- चर्चा-सोबत ड्युटी...घर देखील जवळ...यामुळे स्नेहबंध अधिक जुळले.

एकाच कार्यालयात असल्यामुळे कामाबरोबरच एकत्र चहा पिणे,जेवण करणे आणि सोबत जाणे-येणे हे नित्याचे होऊ लागले.त्यामुळे हा स्नेहसंबंध आणखी वाढू लागला.घरी जाणे- येणे सुरू झाले.एकत्र सिनेमा बघणे,कुठे कुटूंबासोबत फिरायला जाणे ही देखील गोष्ट घडू लागली.अभिषेक यांच्या आई रमाबाई यादेखील मायाळू स्वभावाच्या... जणू त्यांनी मला मुलगा आणि माझी पत्नी सौ.किरण हिला सून मानले...त्यांचे नाते इतके दृढ झाले की आता त्या दोघी कुठे जायचे ते ठरवतात,आम्ही निमित्त मात्र असतो.आई रमाबाई यांचा स्वभाव मस्त आहे.त्या आम्हा सहकाऱ्यांना जेवणासाठी खास भाजी करून डब्यात पाठवतात किंवा जेवायला घरी खास आमंत्रण देतात.




अभिषेक यांनी त्यांच्या आजवरच्या जीवनातील अनेक आठवणी माझ्यासोबत शेअर केल्या आहेत. हा माणूस खूप सच्चा आहे.दिलखुलास आहे.काही चुकले तर लगेच स्वतःहून माफी मागतो. काही सांगायचे विसरला तर ती गोष्ट लक्षात आल्यावर लगेच सॉरी म्हणतो. कुणालाच स्वतःहून दुखावत नाहीत. पण कुणाचे चुकले तर सोडत नाही.. मैत्रीसाठी जीव देणारा,मित्रत्व जपणारा हा संवेदशील मनाचा मित्र आहे. साकिनाका कार्यालयातील त्यांचा वावर,काम करण्याची पद्धत एकदम चोख. कुठल्याही कामात त्यांची नकारघंटा नसे.जे मनात आहे तेच लगेच ते बोलून दाखवायचे,मग राग आला तरी चालेल. म्हणूनच ते सगळ्यांचे चाहते बनले होते.सर्व काम ते उत्तमरीत्या करायचे म्हणूनच कामाच्या बाबतीत त्यांनी ऑफिसमधील सर्व सहकारी "टायगर" संबोधतात.सगळ्यांना हसत-खेळत बोलणारे,आपुलकीचे नाते निर्माण करणारे आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे कधीही भेदभाव न करणारा अभिषेक एक माणूस म्हणून मला प्रचंड भावतो.त्यांची 'माणुसकी' देखील वाखाणण्याजोगी आहे. नोकरी म्हंटलं की,बदली हा विषय खूप महत्त्वाचा असतो.त्यात अभिषेक भाऊ आता पुणे म्हणजे त्यांच्या होम टाऊनला बदली होऊन जाणार आहेत...त्यामुळे त्यांच्या या आठवणी नकळत आठवल्या म्हणून हा लेखप्रपंच...आता ते दुसऱ्या कार्यालयात जॉईन होतील.पण ते आम्हाला व आम्ही त्यांना कधीच विसरू शकणार नाही. आमचे नाते जिव्हाळ्याचे म्हणजे अगदी भावासारखे आहे....'

आभारी आहे', 'थँक यू', हे आपल्या जीवनात नेहमी वापरले जाणारे शब्द. अगदी सकाळी घरातून बाहेर जाताना रिक्षावाल्याने १०० रूपये सुट्टे दिले तरी त्याचे आपण आभार मानतो. ट्रेनमधील मित्र, ऑफिसमधील मित्र रस्त्यावर जाता-येता आपल्याला मदत करणारी व्यक्ती अशा सर्वांचे आपण आभार मानतो.

पण कोणीतरी आपल्या मार्गावर मित्र म्हणून सतत सावली बनून आपल्याला हात देत जगण्याचा मार्ग सुकर आणि आनंददायी करत असते. अशा व्यक्तीचे मला आभार मानायचे आहेत.आता त्यांची बदली झाली तरी आमच्या मनातील त्यांचे स्थान मोठे आहे आणि ते कायम राहील.अभिषेक साहेब तुम्ही व आई यांना पुढील सर्वच गोष्टींसाठी मनापासून आभाळभर शुभेच्छा.. तुमची सर्व स्वप्ने पूर्ण होवोत हीच बाप्पाला प्रार्थना. आता तुमचे लग्न देखील ठरले आहे. तुम्हाला व वहिनींना खूप साऱ्या शुभेच्छा.. तुमच्या या मोठया मित्र-परिवारात सामील करून घेतल्याबद्दल मनापासून थँक यु...

## बोजा



आयुष्याची चोळी बांगडी
करता करता कर्जाचा घडा भरला

आयुष्यभर तरफडा केला
तेच कर्ज फेडायला
घर बांधायच काढ कर्ज,
वाहन घ्यायच काढ कर्ज
शेती करायची काढ कर्ज,
शेती घ्यायची काढ कर्ज

लग्न करायच काढ कर्ज,
संसार चालवायचा काढ कर्ज
पोरं पाहिजे काढ कर्ज, पोरांना
शिकवायच काढ कर्ज

धंदा करायचा काढ कर्ज,
धंद्याला लावायच काढ कर्ज
वाढदिवस करायचा काढ कर्ज,
मयत करायची काढ कर्ज

म्हसनात जावस्तोर काढ कर्ज,
जिथून मिळेल तिथून बोचक कर्ज
चार चारदा हाकल्ल तरी,
म्हणायचं दे ना साहेब कर्ज

कर्ज कुणी देईना म्हणून,
लय आपट झटपट झाली
शेवटी बायकोच्या दागिन्यावर
नजर गेली शेवटी सोनं गहान ठेवून
कर्जाची खाज खाजवली

हाप चड्डीपासून लाली पावडरपर्यंत
सगळाच खर्च कर्जावर पेलला
कर्जा पायी शेवटी, बोजा उतरता
उतरता राहिला

बेबाकी कधी घेतलीच नाही
नुस्ता टॉप अप मारत राहीला
शेवटी बोजा उतरता उतरता राहिला

बऱ्याचदा हप्ता थकल्यावर
दर महिन्याला नातेवाईक मारला
मरमर मरला, बऱ्याचदा हप्त्यांसाठी
वसुलीवाल्याना नडला

थकबाकी ला वसुलीपथक आलं की
बऱ्याचदा दादांचा भाऊचा वशिला
लावला, दर महिन्याला त्याची तीच
बोमाबोम म्हणून वशिला वाल्यांनी
त्याला टाळला

उचाक्या पाचाक्या करुन,
हप्ता शेवटचा भरला
आणखी काहीतरी करायचं म्हणून
पुन्हा कर्जाचा अर्ज भरला

तिर्डीचा सांगाडा ही घरच्यांनी
कर्जावरच घेतला
कर्जा पायी शेवटी बोजा उतरता
उतरता राहिला
बेबाकी कधी घेतलीच नाही
नुस्ता टॉप अप मारत राहीला
शेवटी बोजा उतरता उतरता राहिला

लक्ष्मण वाल्डे, कन्नड
मो. 8888606068




## लेक बापाची साऊली



लेक लाडकी बाहुली
लेक बापाची साऊली
लेक गुणवान भारी
तिचं जगाची माऊली

लेक असे स्वाभिमान
लेक आईचा अभिमान
लेकीठाई चारधाम
लेक भावाची बहीण

लेक लाडकी सर्वांची
गुणवान, कीर्तिवंत
लेकी अमुच्या जगात
ज्ञायवंत,बुद्धिवंत

लेक मायेचा ओलावा
लेक प्रेमाचे भांडार
लेक आयुष्याचा सार
जगण्याचा ती आधार

लेक देवाची समई
शोभा घराची वाढते
सखी आईची शोभते
श्वास पित्याचा असते

लेक लाडकी बाहुली
लेक बापाची साऊली

-संदिप वाकडे पाटिल
कस्तूरबा इंग्लिश स्कूल चापानेर,
ता. कन्नड, जि. औरंगाबाद
9766992776

## वात्सल्याचा ठेवा

वास्त्यल्याचा ठेवा, जरा जपूनी
ठेवा...
माझ्या मराठीचा गर्व, अभिमानाने
फुलवा...
धन्य माझी माय माऊली,
जिने मला पोसिले...
गौरव माझ्या मराठीचा, साऱ्या
महाराष्ट्राने जाणिले...
मानतो माय माऊली, अशी माझ्या
मराठीची बोली...
रसभरी, मधुभरी वाणी, माझी माय
मराठी गायली...
सदैव राहील प्रेम आमुचे, माझींया
माऊलीवरती...
सर्वोच्च शिखर गाठील, माझी माय
मराठी एकेदिवशी...
गौरवाने गातो गीत माझ्या मराठीचे...
मधूर वाणी लाभली आम्हांस भाग्य
माझ्या मानव जातीचे...
जन्मापासूनी नाळ जोडली, माझी
माझ्या या मातीशी...
घेऊन जाईल तुझं शिखरावर आज
देतो मी वचन तुला...
तुझ्याचं गर्भात रचिला मी माझ्या
आयुष्याचा ठेवा...
माझ्या मराठीचा गर्व, अभिमानाने
फुलवा...
माझ्या मराठीचा वारसा देतो
तान्हुल्या भातुकलीच्या हाता...
जोपासा माझ्या माऊलीला जिने
गौरविल्या, घडविल्या लाख लाख
पिढ्या...
ज्या कुशीत विसावला साऱ्या
मानवतेचा ठेवा... वास्त्यल्याचा
ठेवा, जरा जपूनी ठेवा...
माझ्या मराठीचा गर्व, अभिमानाने
फुलवा...
माझ्या मराठीचा गर्व, अभिमानाने
फुलवा, अभिमानाने फुलवा....
- कोमल जगताप

## आपले जगणे..!

आयुष्यभर सोबत असून,
एकत्र कधीही बसत नाही.
एकाच घरात राहून कोणीही,
एकमेकास दिसत नाही.

हरवला तो आपापसातला ,
जिव्हाळ्याचा संवाद.
एकमेकास दोष देऊन,
नित्य चाले वाद - विवाद.

धाव - धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही.
ऱ्हदयाचे पाऊल कधीही,
ऱ्हदयाकडे वळत नाही.

इतके जगून झाले पण,
जगायलाच वेळ नाही.
जगतो आहे कशासाठी,
काहीच कसला मेळ नाही.

एक क्षण असा येईल,
घेऊन जाईल हा श्वास.
अध्यावरच थांबलेला,
असेल हा जीवन प्रवास.

अजूनही वेळ आहे,
थोडे तरी जगून घ्यावे.
सुंदर अशा जगण्याला,
डोळे भरून बघून घ्यावे...!


- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, जि. औरंगाबाद.
मो. ९७६४३५०३७४.



## पहिला पाऊस



पण मला अजूनही आठवतोय तो
पहिला पाऊस
माझ्या कौलारू घरातून आत
थप-थप गळणारा
सतरा घराच्या फटीतून आत
झिर-झिर झिरपणारा
जिथं गळायचं तिथं भांडं असायचं
तरीही घर ओल करणारा
पहिला पाऊस
पोरं रस्त्यावर फिरायची पावसात
आम्ही मात्र भिजायचो घरच्या
घरात
तुडुंब शेत, पाणी भरायचं नदी-
नाल्यात
आमचे टोप भरायचे-भरायची
पिठाची परात
छत्री कुठली गोणपाटाचं खोलडं
कपडे भिजायचे काहीच नसायचं
कोरडं
चीक चीक मातीत पाय
फटीतून बोटांच्या चिखल यायचा
वरती तरीही धुंद सारे आम्ही
हिरवीगार दिसायची धरती
फुलपाखरू मनसोक्त बागडती
रानात कोकिळा मंजुळ गाणी गती
मोर पिसारा फुलवती
पाऊस धारा बरसती भु वरती
या सरीवर सरी
तापलेल्या मातीला आणि मनाला
गारवा देणारा पहिला पाऊस
सुकलेल्या झाडांना सृष्टीला
हिरवा करणारा पहिला पाऊस
आम्हा मुलांना आणि साऱ्यांनाच
चिंब भिजवणारा पहिला पाऊस
-निखिल अनंत भडेकर




## धर्माची शाल



धर्माची शाल पांघरून
मतांचा जोगवा मागणाऱ्या
भडव्यांच्या बाजारात
लोकशाही नागडी झालीय
चौकात
बेरोजगारांच्या स्वप्नांवर
बलात्कार होतायत
आणि राजकारणात मात्र
चमत्कार घडतायत
वशिल्याचा बाप हुडकत
फायली दारात उभ्या होतात
आणि आश्वासनाचा मुका
घेऊन माघारी फिरतायत
तरीही विकास काही फळत
नाही पदर ढळत नाही म्हणून
काय झालं..?
पण आमचाच विनयभंग होतोय
हेच आम्हाला कळत नाही
फोर जीच्या नेटवर्कमध्ये
पांगळे झालेले तरुण
विनोदी व्हिडीओ बनवत
बसलेत
जिंदगीला घोडा लागला तरी
हे म्हणतयं साहेब आम्ही तुमच्या
सोबत आहोत
काल तिरडीवर बाप गेला
आज आईला ठेवलं तरीही
गाबडी अंगठा फिरवत बिझी
आहेत फोनवर
त्याच स्क्रिनवर शिवराय दिसले
की याचं रक्त सळसळून येतं
पण तेवढ्याच पुरतं..
अजूनही वेळ गेली नाही
उठा या देशातील हाडांचे सापळे
मुकी जनावरं पाखरं
इथं झालेल्या आत्महत्या
आणि देशासाठी शहीद झालेले
जवान, हे सगळे वाट पाहतायत
आपली कारण तिरंग्याची लाज
आताआपल्यालाच वाचवायची
आहे...
-दंगलकार नितीन चंदनशिवे
सांगली, 7020909521

## सांग कुठाय देश माझा



माझ्या टोपल्यातली भाकरी
चोरीला गेल्याची तक्रार
मी करायला गेलो तर
ते म्हणाले शांत राहा धर्म
धोक्यात आहे
मी म्हणलं माझी भाकरी द्या
धर्म आपोआप सेफ होईल
तर त्यांनी त्यांची दाढी कुरवाळत
म्हणलंअरे हा तर नक्षलवादी

डुंगणावर काठ्या फुटल्या
गल्ली गल्लीतून पळत राहिलो
तेव्हा, प्रत्येक चौकात उभ्या
असलेल्या महापुरुषासमोर
ठो ठो बोंबललो

केसरी रंगाचं राशन कार्ड
घेऊन माझी आई
स्वस्त धान्याच्या दुकानासमोर
उभी होती पण स्वातंत्र्य
दिनानिमित्त आज दुकान बंद होतं
आईचा हात धरून मी
आईला ही पळ म्हणलं
तिला पळता येईना

तेवढ्यात रस्त्यावरून
तिरंगा हातात घेऊन शाळेची पोरं
एका रांगेत निघालेली
आणि त्यांच्या तोंडात घोषणा
होती भारत माता की.. जय.

लोकशाही जिवंत असल्याचा
पुरावा गावभर शोधत
मी आणि आई घरी आलो तेव्हा,

थंडगार पडलेल्या चुलीत
गोरगरिबांच्या कल्याणासाठी
आलेल्या योजनांची राख
झालेली होती

मी तरुणांकडे खूप आशेनं
बघितलं तर पोरं
एका हातात फोन घेऊन
दुसरा हात खाली पॅन्ट मध्ये
घालून हलवत होती

आणि यांच्या व्हाट्स अप च्या
dp वर मात्र आज तिरंगा सकाळी
सकाळी फडकत होता
-दंगलकार नितीन चंदनशिवे
कवठेमहांकाळ, जि. सांगली
मो. 7020909521

# आत्मसन्मानाची प्रेरणादायी कहाणी



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा असल्या तरी या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी पैसा हा घटक महत्वाचा आहे. समाजातील प्रत्येक तळागाळातील घटक मेहनत करतो, कष्ट करतो तो पैसे कमावण्यासाठी. जो तो आपापल्या परीने प्रयत्न करत असतो. समाजातील कष्टकरी वर्ग दिवसरात्र राबत असतो. आपल्या कुटुंबाला एक चांगले , सुखी आयुष्य जगता यावे, आपल्या कुटुंबाला सगळ्या सोयी - सुविधा मिळाव्यात यासाठी पैसे कमवायला हवे, या उद्देशाने प्रत्येक जण झटताना दिसतो. एकूणच पैसा हा किती महत्वाचा घटक आहे, हे आपण रोज अनुभवतो. सगळ्या घडामोडी या पैशांसाठी आणि पैशांमुळे घडत असतात. समाजात गरीब - श्रीमंत हा भेद प्रकर्षाने जाणवतो. प्रत्येकाला आपण श्रीमंत व्हावे असे वाटत असते. आपल्याकडेही बंगला, गाडी, सर्व सोयी- सुविधा असाव्यात, असे वाटते. त्यासाठी मेहनतीशिवाय पर्याय नाही. मी लखपती, करोड़पती झाले तर या विषयावर निबंध लिहिताना आपण आपल्या कल्पना, इच्छा शब्दात उतरवल्या असतील.**


पैसा, संपत्ती असणे मानाचे समजले जाते. ज्याच्याकडे पैसा आहे त्याला समाजात मान - सन्मान मिळतो. आर्थिक बाजू भक्कम असणे ही बाब माणसाला आयुष्यभर समाधान लाभू देत नाही. ज्याच्याकडे नोकरी नाही, पैसा नाही त्याला हीन दर्जाची वागणूक दिली जाते, अपमान केला जातो, हे वास्तव आहे. जी सगळी उठाठेव चालली आहे, ती पैशांसाठी. पण हाच पैसा आपल्याला अहंकारी, व्यसनी , दुराचारी बनवू शकतो, अधोगतीला नेऊ शकतो. कोणत्याही गोष्टीला दोन बाजू असतातच.पैसा कमावणं चूक नाही, पण त्याचा सदुपयोग करणं गरजेचे आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो.

लेखक सुनील पांडे लिखित 'लॉटरी' ही कादंबरी समाजातील अर्थव्यवस्थेचे महत्त्व विशद तर करतेच सोबतच पैशांमुळे हरवत चाललेले नात्यांतील महत्त्व, समाजातील गरीब- श्रीमंत ही वाढत चाललेली दरी, परिस्थितीमुळे मिळणारी वागणूक, माणसापेक्षा पैशांला असलेले महत्त्व ह्या सर्व बाबी अधोरेखित करणारी आहे. साधी- सरळ लेखनशैली, ओघवती रचना, प्रथमपुरुषी निवेदनशैली आणि संवादाच्या माध्यमातून ही कादंबरी उलगड़त जाते.

चंदू हा 'लॉटरी' कादंबरीचा नायक. बी. ए. चे शिक्षण घेऊनही नोकरी नसलेला , साधा - सरळ, कोणालाही न दुखावणारा, परिस्थितीमुळे सतत अपमान सहन करणारा हा चंदू .

सुशिक्षित बेकार असल्याची खंत त्याला बोचत राहते. चार पैसे कमावण्यासाठी तो पडेल ते काम करतो. घरोघरी जाऊन पेपर टाकणे, होटेलात कपबश्या धुणे इत्यादि कामे तो न लाजता करतो.घरात वयस्कर आई, दोन भाऊ , अशोक आणि विलास , त्यांच्या बायका - मंजुळा वहिनी, शांता वहिनी, राजू ( भाचा ) इत्यादी राहतात. या कामातून मिळणारा पूर्ण पगार चंदू घरात देतो. स्वतःसाठी तो काहीच खरेदी करत नाही. चंदूला चांगली नोकरी नाही, म्हणून त्याला त्याच्या वहिनींकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक, आपल्या आईकडे दुर्लक्ष करणारे भाऊ याचे चंदुला फार वाईट वाटत असे. परिस्थितीमुळे हतबल झालेला चंदू सर्व निमूटपणे सहन करत जगत राहतो.

पावलोपावली चंदुचा होणारा अपमान, त्याची अवहेलना कादंबरीत सतत वेगवेगळ्या प्रसंगात दिसून येते. आपल्या माणसाकडून असलेली मायेची, प्रेमाची अपेक्षा पैशात तोलली जाते. आपलेपणाच्या अपेक्षेने सतत प्रयत्न करणाऱ्या चंदूची ही कहाणी मनाला विषण्ण करते. ह्या वागणूकीमुळे चंदुच्या आत्मसन्माला लागलेली ठेच लेखकाने नेमकेपणाने अधोरेखित केली आहे. लग्न, मैत्री,प्रेम या भावनांमध्येही पैसा हा भाग कसा हस्तक्षेप करतो, याचे चित्रण यात लेखकाने केलेले आहे. चंदुची बहीण ज्योती हिला तिचा पती पैशांसाठी माहेरी पाठवतो, या प्रसंगामुळे लक्षात येते, नात्यांमध्ये व्यवहार किती महत्वाचा ठरतो आहे. माया, प्रेम, आपुलकी, माणुसकी, विनम्रता, प्रामाणिकपणा, भूतदया ही मूल्ये हरवत चालली आहेत, असे चित्र आहे. भ्रष्टाचार वाढला आहे. बी. ए. असूनही शिपायाच्या नोकरीसाठी अर्ज करणारा चंदू, आणि पैसे भरून नोकरीला लागलेल्या इतरांमुळे चंदुला नाकारलेली नोकरी, यातून स्पष्ट होते, 'पैसा फेक तमाशा देख'...पैशाने सगळ्यांना कसे संमोहित केले आहे, याचे वास्तव चित्रण या कादंबरीत केले आहे. आपल्या अशा निरस, अपमानाने भरलेल्या आयुष्याला कंटाळून आत्महत्या करायला निघालेला चंदू या नकारात्मक विचारांपासून कसा परावृत्त होतो आणि जिद्दीने उभा राहतो, ही प्रेरणा या कादंबरीतून मिळते.सुख - समृद्धी आणि समाधानाने




भरलेलं आयुष्य जगण्यासाठी चंदुची सुरु असलेली धडपड, आत्मसन्मानासाठी त्याचा स्वतःशी सुरु असलेला संघर्ष मनाला चेतवते. या कादंबरीतून जी पात्रे आपणास भेटतात, जे पात्रचित्रण लेखकाने केले आहे, त्यातून मानवी स्वभावातील विसंगती आणि समाजातील आर्थिक, सामाजिक परिस्थितीचे, विचारांचे एक खूप मोठे जाळे पसरलेले दिसून येते.

अनपेक्षितपणे चंदुला लागलेली पंचवीस कोटीची लॉटरी. या लॉटरीच्या पैशांचा तो कसा सदुपयोग करतो, इतरांना कशी मदत करतो आणि पैसे मिळाले तरी तो कसा सदसद्विवेकबुद्धिने वागतो, हे खरेच वाचले पाहिजे.त्यानंतर चंदुचं आयुष्य कसे बदलते, कोणते बदल होतात आणि त्याच्या आयुष्याला कशी कलाटणी मिळते, हे जाणून घेण्यासाठी ही कादंबरी प्रत्येकाने वाचायला हवी. नकारात्मक विचारांच्या आहारी न जाता त्यापासून परावृत्त होऊन पुढे मार्गक्रमण करण्याची आणि सकारात्मकतेने आयुष्य जगण्याची प्रेरणा देणारी ही कादंबरी आहे. कितीही पैसा कमावला तरी पाय नेहमी जमिनीवर असायला हवेत. या पैशांनी आपण सोयी - सुविधा विकत घेऊ शकतो, सुख - समाधान नाही. आपण अन्न विकत घेऊ शकतो, भूक नाही, मऊ गादी घेऊ शकतो, झोप नाही. सुख - समाधान हे विकत मिळत नाही. त्यासाठी मनःशांति आवश्यक असते. प्रेम , माया, आपुलकी, नाती ह्या भावना अनमोल आहेत, त्यांचे मोल होऊ शकत नाही. माणसाने आपल्यातील मानवी मूल्ये जपली पाहिजेत, ही शिकवण देणारी ही विचारांची लॉटरी प्रत्येकाला लागो !

कादंबरीचे समर्पक मुखपृष्ठ संतोष धोंगडे यांनी साकारले आहे तसेच डॉ. स्नेहल तावरे यांनी कादंबरीची पाठराखण केली आहे. लेखकाला पुढील लेखनासाठी शुभेच्छा !

( लॉटरी - कादंबरी / लेखक सुनील पांडे / प्रकाशक : स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे / मूल्य : १५० रुपये )

# जिभेला हाड असते तर?

जीभ दोन अक्षरं असलेला शब्द पण तो अवघ्या ब्रम्हांडाला नाचवतो...
जीभ ही कधीच बाहेर दिसत नाही...
पण आत जबड्यात राहुन सुद्धा ती आपले कार्य मात्र चोख पार पडत असते,
जीभ नसेल तर तो मनुष्य कसा बोलत असेल?थोडी कल्पना करा, आणि देवाने आपल्याला सर्व काही अवयव व्यवस्थित दिलेत पण त्याचा उपयोग मात्र योग्य केला जात नाही.....
दोन भांडखोर शेजारणींची भांडणे ऐकली असतीलच,
जीभ अशी सैल सोडतात,
विचारूच नका......
अगदी एकमेकांच्या अगदी खानदानापर्यंत जातात,
खानदानाची माहिती कोणाला नसे ना का?..पण तुझं असं तुझं तसं, कितीतरी. घाणेरडे शब्दही ही जीभ बोलत असते,
कधी कधी असेही शब्द आपण ऐकतो
अग तूझ्या जीभेला काही हाड बीड आहे की नाही?.....
खरंच जीभेला हाड असतं तर! तरी ती थांबली असती बोलायची?नाही ना?
देवाने तो तर हक्काचा अवयव दिलाय मानवाला, पण त्याचा वापर कसा करावा हे मात्र मानवाला अद्याप समजलेले दिसत नाही, ज्या मुखातून चांगले विचार ,आचार बाहेर पडायला हवेत ,त्याच मुखातून,वाईट शब्द, शिव्याशाप बाहेर पडताना दिसतात, थोडा विचार करा, जीभ हा अवयवच आपल्याला देव देण्यास विसरला.
तर काय होईल? अहो नुसता विचार केला तरी अंगावर काटा येतोय!
मुकेपणा काय असतो! हे त्या जीभ नसलेल्या व्यक्तीलाच कळणार हो, दुसऱ्या ला चांगले म्हणता येत नसेल तर किमान वाईट तरी म्हणू नका.
दुसऱ्याच्या शब्दाला किंमत द्या, एखाद्याचे सुख बघवत नसेल तर तिकडे पाठ फिरवा,पण कोणाला शिव्याशाप देऊ नका, एकदा का तोंडातून एखादा वाईट शब्द गेला,...तर तो फिरुन माघारी येत नाही, जसा हातातून एकदा सुटलेला बाण परत घेता येत नाही तसा, म्हणूनच बोलताना देखील विचार करुनच बोला, तसे मुखाने गोड बोलून समोरच्या व्यक्तीचं मन जिंकता येते, गोड बोलून तर पहा,शत्रु सुद्धा मित्र होऊ शकतो...
मुखाने भजन, किर्तन, देवाचे नामस्मरण करा, काहीतरी पुण्य पदरात पडेल,चांगले बोलाल तर चांगलेच पदरात पडेल.....
वाईट बोलाल,तर वाईटच माघारी मिळेल
देवाने दिलेल्या जीभेचा उपयोग मुखाने चांगले बोलण्यासाठीच करा.. जीभेवर ताबा ठेवा..उचलली जीभ लावली*
टाळ्यालाअसे करु. नका....जन्म हा एकदाच असतो...
माणसे तोडू नका तर माणसे जोडा.....
दिलास मला देवा हा अमुल्य ठेवा
मुखात गोडवा आयुष्य भर ठेवा.....

**-सीमा मंगरूळे तवटे,**
**वडूज सातारा**
**९०७५०७४९९४**

# खाकी वर्दीला सलाम

आधुनिक केसरी

**दोन दिवसांपूर्वी विजयादशमीला मी संध्याकाळी ६ वाजता परभणी येथील विसावा कार्नंर, जिंतूर रोड येथे सीमोल्लंघनाला गेलो होतो. त्यावेळी वातावरणात पावसाळी वातावरण असल्यामुळे सुखद गारवा होता.**

सर्व बांधव आपल्या कुटुंबातील सदस्यासोबत उत्साहाने आनंदाने सीमोल्लंघन करण्यासाठी जात होते. शमी वृक्षाची पूजा झाल्यावर वैदिक गुरुजींचे आशिर्वाद घेऊन सर्व जण आपट्यांची पाने विकत घेऊ लागले. लहान मुले बाबांना व आजोबांना खेळणी , फुगे घेण्याचा हट्ट करीत होते.

सर्व बांधव आनंदाने दसरा सण साजरा करताना विसावा कानर येथून पाथरीकडे जाणारी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस वाहनाच्या गर्दीत अडकली.

माझै सहज लक्ष बसमधील वाहक व चालकाकडे गेले.

ते दोघेही दसरा सण साजरा करणाऱ्या लोकांकडे पाहत होते. माझ्या मनात विचार आला आज दसरा सण असतानाही हे बसचे चालक व वाहक आपल्या कुटुंबासोबत सण साजरा न करता प्रवाशांना त्यांच्या इच्छित स्थळी सुखरुप घेऊन जात आहेत.

खर विचार केला तर ही एकप्रकारची सेवा आहे.

यांना दसरा - दिवाळीची सुट्टी नसते.

आता कोणी म्हणेल ते पोटासाठी करतात परंतु घरात कितीही अडीअडचणी असल्या, दसरा दिवाळी हे मोठे सण असले तरी प्रवाशांच्या सेवेसाठी २४ तास सेवा देणारे हे चालक व वाहक मला देवदूतच वाटतात.

हे खूप मोठा त्याग करतात. म.रा. प. म. वाहक व चालक यांच्या दररोजच्या दिनक्रमात खूप संघर्ष असतो.

सणावारी गोडधोड न खाता ते प्रवाशांना सेवा देतात.

बसचे चालक व वाहक यांच्याप्रमाणे पोलिस, पोस्टमन, लाईनमन, रेल्वेचे कर्मचारी, हेसुद्धा अखंड सुट्टी न घेता २४ तास लोकांना सेवा देतात.

अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचारी वर्गाला खाकी पोषाख असतो.

हे सर्व कर्मचारी हसतमुखाने आपल्याला सेवा देतात त्यांचे नवल करावे तेवढे थोडेच आहे.

आपण प्रवास करताना संवाद साधून त्यांना शुभेच्छा देऊ शकतोत.

या सर्व खाकी पोषाखातील कर्मचारी वर्गाला विजयादशमी व आगामी दिवाळी सणाच्या हार्दिक शुभेच्छा व त्यांच्या कार्याला मानाचा मुजरा.

विशेष बाब :- महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसचा प्रवास हा सुरक्षित असतो.

महत्वाची बाब :- अत्यावश्यक सेवा देणाऱ्या या कर्मचारी बांधवांना राज्य सरकार कमी वेतन देते ही खेदाची बाब आहे.

तसेच मुक्कामी बस ज्या डेपोत असते त्या बस स्थानकातील त्यांच्या निवा-माची जागेत अस्वच्छता, पलंगावर ढेकणाचे माहेरघर असते. तसेच बाथरुमची तर दुरावस्थाच असते.

एवढया हाल -अपेष्टा सहन करूनही हे कर्मचारी प्रवाशांना हसतमुख सेवा देतात ही गौरवास्पद बाब आहे.

**शब्दांकन :**
**-रामकृष्ण बळीरामपंत जोशी**
**नानल पेठ , परभणी**
**भ्र.नं.९५२७४५४१८२.**









# अधुरी एक कहाणी मुंबईची

आधुनिक केसरी

**भारताची आर्थिक राजधानी म्हणजे मुंबई. अरबी समुद्राची राणी म्हणजे मुंबई. चाकरमान्यांची स्ट्रगलर लाईफ म्हणजे मुंबई. भिकारी, गरीब, मध्यमवर्गीय व श्रीमंत, गर्भश्रीमंत लोकांच शहर म्हणजे मुंबई. लोकल, मेट्रो, मोनो, बेस्ट, टॅक्सी, ओला, ऊबेरनं धावनारं शहर म्हणजे मुंबई. धावणार, पळणार, न थांबणार, जागणार, जागोणार आणि जगवणार शहर म्हणजे मुंबई.**

आज कमलाकर पहाटे पाचला ऊठला. डोळ्यातील चिपळासारखा आळस झटकत अगदी शुन्य मिनिटात त्याने अंथरूण सोडले. नेहमीप्रमाणे प्रातःविधी आटोपला.
" ये आई माझा डबा झाला का गं?"
कमलाकरनं आईला हाका मारल्या.
" हो राजा झाला. आज तुझ्या आवडीची भाजी केली. खाशील. मित्रांना जास्त वाटत बसू नको. लोकांना तुपाशी आणि स्वतः ऊपाशी. अगदी तुकारामचं आहेस तू. "
" अग आई तुझ्या हातची भाजी माझ्या कलीगला आवडते. म्हणून ते आवडीने डबा ओढुन खातात. "
" बरं तु लग्नाबद्दल काय विचार केला आहेस. की, आयुष्यभर मीच ह्या किचनमधे मरायचे काय? " " अग आई ऐवढी कसली घाई तुला. आता तर मी तीस वर्षेचा झालो. " मग म्हातारा झाल्यावर कर लग्न. नेहमीप्रमाणे आईची कटकट ऐकत कमलाकर घराबाहेर पडला. दाट लोकवस्ती कुर्ला मधे तो वडिलांशिवाय आई सोबत रहायचा. आर. के. ची रूम. साधारणपणे दिडशेचा एरिआ. असल्फा पार करत तो कुर्ला ऊपनगरीय स्टेशनला पोहचला. तेथून वडाळा आणि वडाळा वरून अंधेरीला त्याला जायचे होते. लोकल धडाडत आठ नंबरच्या हार्बर लाईनवर आली. कमलाकर बसला. लगेच पाच ते सात सेकंदात लोकलने स्पीड जागेवरून पकडली. चुनाभट्टीत दोन किन्नर साडी, ब्लाऊज घातलेले. तोंडावर अवाजवी किळसवाणा मेकअप चढवलेला चढले. अतिशय घाणेरड्या पुरूषी आवाजात टाळी वाजवत त्याने म्हटले... " ऐ चिकने , ऐ शायने चल दे ना बिस की पत्ती." कमलाकरची किन्नराच्या आवाजाने झोप उडाली होती आणि त्या आवाजाने काळजाची धडधड होत घाबरगुंडी ऊडाली होती. खिशात मोजकेच पैसे असल्याने कमलाकरनं नजर डब्यातून खिडकीत वळवत न ऐकल्या व न पाहिल्यासारखे केले. अशी कमलाकरची कृती किन्नराला खटकली. त्याने हात कमलाकरच्या डोक्यावरून पाठीवरून फिरवला. कमलाकरला अंत्यत किळसवाण फिलिंग्स होत अंग थरथरलं. हात झटकत कमलाकर बोलला... सबेरे सबेरे दिमाख का दही मत कर. चल सटक यहॉ से. किन्नर बोटं मोडत काही तरी पुटपुटला आणि तेथून निघून त्याचा मोर्चा दुस-या व्यक्तीकडे वळला. आज आपला दिवस वाईट जाईल या विवंचनेत कमलाकर होता. कारण किन्नरांचा पहाटे आशिर्वाद घ्यायचा असतो पण् आज त्याने पैसे न देता किन्नरला अपशब्द बोलला होता. जी. टी. बी. नगर पार करत वडाळा स्टेशन आले होते. वडाळ्याला माणसांची



जत्रा पाहूनं कमलाकर शहारला. एक्सलेटरवरूनं वर दाद-यावर चढूनं एक नंबर प्लॅटफॉर्मवर ऊतरला. पनवेल गाडी तद्नंतर बेलापूर लोकल गेली. गोरेगाव इंडिकेटवर लागलं होतं. सीएसटी कडूनं येणारी लोकलं थोडी खाली होती पण् भरपूर गर्दी फलाटावर असल्याने एकच झुंबड ऊठली. कमलाकर गर्दी पार करत कसातरी लोकलं मधे चढला. लोकलच्या दांड्याला धरून तो कसातरी ऊभा झाला. आतुन बाहेर प्रेशर येत होता. कमलाकर जीव मुठीत धरून कसातरी ऊभा होता. कुठल्याही क्षणी मृत्यू कवेत घेईल अशी अनामिक भीती कमलाकरला वाटत होती. लोकलने जाग्यावरूनं झू ऽऽऽ झू ऽऽऽ करत स्पीड पकडला होता. लोकल हेलकावे खातं पुढे धावत होती. पुढील स्टेशन किंग्स् सर्कल, माहिम, बांदरा, खार रोड, सांताक्रुझ , विर्लेपार्ले, अंधेरी, जोगेश्वरी, राम मंदिर आणि शेवटचे स्टेशन गोरेगाव आले. कमलाकरचा हात खांबाला पकडल्याने लाल झाला होता. कमलाकरने निश्वास टाकत सुटलो एकदाचा असा विचार करत ऑफीसच्या दिशेने मोठमोठे पाऊले टाकत निघाला. आईने पहाटे काढलेला विषय आता सत्यात ऊतरवला पाहिजे या विचाराने थोडेसे न दिसणारे स्मित करत तो आज ऑफीसच्या दिशेने चालला होता. ऑफीसच्या गेट जवळ पोहचला. लिफ्टने दहाव्या माळ्यावर आला. ऑफिसमध्ये आधीच सर्व कर्मचारी वर्ग आला होता.

मुस्कान आपल्या ठरलेल्या खुर्चीत बसून फाईलीत डोक खुपसूनं होती. तिचे फक्त केस दिसत होते. कमलाकर खाखरत आपल्या खुर्चीत येवूनं बसला. मुस्कानने थोडे फाईलीतूनं डोके ऊचलूनं मान वळवूनं कमलाकरकडे पाहिजे. हलकेसे स्मीत देऊनं ती फाईलीत पुन्हा गुंग झाली. आज प्रपोज डे असल्याने आपण मुस्कान ला प्रपोज करू असा विचार कमलाकर करत होता. लग्नानंतर खंडाळा किंवा लोणावळाला हनिमूनला जावू. दोनंच मुले होऊ देऊ. आईची नेहमीची कटकट बंद होईल. लोन घेऊन एन बिच के घेऊ. घरात फ्रिज, वॉशिंग मशीन, ए.सी. , कलर एलसीडी टिव्ही, सोफा, बेड हे सर्व हळूहळू घेऊ असा विचार कमलाकर करत होता. कमलाकरला बॉसचे बोलावणे शिपाया मार्फत आले होते. कमलाकर सर आपणास जोशी सरांनी कॅबीनमधे अर्जंट बोलावले आहे. 'शिपाई गावकर बोलला. " ओ.के. मामा येतो. लगेच. "कमलाकर बोलला. महत्त्वाच्या कामाविषयी कमलाकर आणि जोशी यांचे संभाषण झाले. कमलाकर कॅबीनच्या बाहेरं आला.
मुस्कान ला कसे बोलू या विवंचनेत कमलाकर पडला होता....
....काही क्षणातच असंख्य सवाल कमलाकरचा मनात तरंगासम ऊठले. आपला धर्म कोणता! तीचा धर्म कुठला. आई स्विकार करेल काय? तीचे कुटुंबीय मान्य करतील काय? लोकं काय म्हणणार. ....पण् सर्व प्रथम ती होकार देईल काय?

हा मोठाच कमलाकर करीता यक्ष प्रश्न होता. आज आपण मनातले मुस्कानला सर्व सांगू या विचाराने कमलाकर थोड्याच वेळात जागेवरून ऊठला. ऊठला पण् काही क्षणातच परत जागेवर बसला. लंच टाईम मधे बोलू असा त्याने विचार केला. थोड्याच वेळात गौतम तीच्याकडे जातांना कमलाकरला दिसला. मुस्कानला गुलाबपुष्प देऊनं आय लव्ह यू. यू विल बी मॅरी मी. अस म्हणाला. मुस्कान गालात हसली . कमलाकरला सर्व ऐकू आले. तीने गुलाबपुष्प हातात घेतला. मानेने होकार दिला. गौतम खुप खुश झाला होता. हे कमलाकर ने पाहिले. कमलाकर गपगार झाला होता. काही क्षण मेल्यागत त्याला वाटत होते. संपूर्ण शरीरात वात भरल्या सारखं त्याला वाटले. श्वासात अगतिकता वाढली होती. काळजाचे ठोके वाढत होते. छाती फुटूनं काळीज बाहेर येते की; काय असे कमलाकरला वाटत होते. स्वप्नांचा चकनाचूर झाल्यासारखे वाटत होते. काही काम न करता कमलाकर तसाच एकटक संगणकाकडे पाहत होता. तितक्यात शिपाई आला. " साहेब चहा आणू काय? " मानेने नकार देत कमलाकर म्हणाला. नको. गौतम दिसायला गोरा, ऊंचपुरा, जिमची रेखीव शरीरयष्टी, मॉल मधले महागडे कपडे घालायला. त्यामुळे मुस्कान त्याच्याकडे आकर्षित झाली होती. त्यामानाने कमलाकर जेमतेम पाच फूट तीनं इंच, साधे स्ट्रिटवरील कपडे, दिसायला साऊथ इंडियन सारखा सावळा. लंच टाईम झाला. सर्व कलिगनी आपापले डबे खोलले. कमलाकर खुर्चीत बसलेला व टेबलावर मान टाकूनं निजलेला. सर्वांनी कमलाकरला हाका मारल्या पण तो जागचा ऊठत नव्हता. शेवटी कंटाळून गौतम जवळ आला. " अरे भाई निंद हुई होगी तो लंच को आ टिफीन लेकर. " अस म्हणत कमलाकरला हलवले तर कमलाकर खुर्चीतून खाली पडला. सर्वजण धावत आले काय झाले म्हणून . कमलाकर पूर्णपणे थंडगार झाला होता. श्वास घेणे बंद झाले होते. बहुतेक कमलाकर ऑफ झाला अशी शंका सर्वांना येऊनं गेली. बॉसने तात्काळ ॲबूलन्स बोलावली. इस्पितळात दाखल केलं. डॉक्टरांनी चेक केले. ओपीडी बाहेर सर्व कर्मचारी रडत होते. डॉक्टर चेक अप रूम मधून बाहेर आले.
" सॉरी. ही ईज नो मोअर. " असे बोलले.
सर्व कर्मचारी जोरजोरात रडायला लागले.
कमलाकरच्या बॉसने डॉक्टरकडे विचारणा केली.
" डॉक्टर हे कश्यामुळे झाले असे."
" बिग हार्ट स्ट्रोक. हार्ट अटॅक."

**- सु. पुं. अढाऊकर, अकोला.**
**मो. ९७६९२०२५९७**




# श्रद्धा-सुमने- आजोळचा माणूस

आधुनिक केसरी

**गेल्या आठवड्यात नांदेड येथे वास्तव्यास असलेला माझा आजोळचा एक माणूस " सुभाष वसेकर "सर्वांना सोडून दूरच्या प्रवासाला निघून गेला". विगोगाचे दुःख अफाट असते ,या अटळ दुःखाला सहन करण्याची शक्ती देव देत असतो . वसा ता-जिंतूर-जिल्हा- परभणी" हा कागदोपत्री-पोस्टल अड्रेस" असला तरी, यातील "वसा "हे गाव माझे -आजोळआहे आणि सगळे वसेकर "माझ्या आजोळची माणसं आहेत".**

चित्रमहर्षी म्हणून प्रसिद्ध असलेले आदरणीय -ती. त्र्यंबकराव वसेकर यांनी मराठवाड्यात चित्रकला रुजवली , अभिनव चित्रशाळा -नांदेड " हे त्यांच्या तळमळीचे, कार्याचे मूर्त स्वरूप.
त्यांचे हेच कार्य ध्यासपूर्वक पुढे नेण्याचे कार्य चित्रकार असलेल्या "सुभाषने या संस्थेचे प्राचार्यपद जबाबदरीने सांभाळून चालू ठेवले.
माझ्या मातोश्री ती- रुक्मिणीबाई विठ्ठलराव देशपांडे लोहगावकर- यांची माहेरघरची ओळख - माझी आई - तिचे नाव द्वारकाबाई- ही वकील पांडुरंगराव वसेकर यांची बहीण आणि सुभाषचे वडील - त्र्यंबकराव वसेकर- हे नात्याने माझ्या मातोश्रींचे मावसभाऊ. नांदेड-जिंतूर, परभणी परिसरात या सगळ्यांच्या भेटी होत असत. त्र्यंबकराव वसेकरांचे दोन्ही चिरंजीव- म्हणजे माझे मामे-भाऊ असलेले - मोठे शरद वसेकर, धाकटे- सुभाष वसेकर या दोघांशी माझा खूप छान संपर्क होता.
प्राचार्य आणि चित्रकार -सुभाष वसेकर, माझ्यासाठी एक उत्तम बालसाहित्यिक म्हणून अधिक जवळचा आहे. ९०च्या च्या दशकात अंबाजोगाई येथे मराठवाडा बालकुमार साहित्य संमेलन झाले- या संमेलनाच्या अध्यक्षपदी- सुभाष वसेकर" हा माझा आजोळचा माणूस होता.
या संमेलनात सकाळच्या "ग्रंथ-दिंडी पासून ते योगेश्वरी मंदिराच्या परिसराल्या विद्या मंदिरात जिथे हे साहित्य संमेलन झाले , त्यात" सुभाष वसेकर सोबत बालसाहित्तिक म्हणून मी देखील सहभागी झालो होतो. या सम्मेलन निमित्ताने अंबाजोगाईच्या राखे फॅमिलील्या ती. भिकाभाऊ राखे यांच्या घरात त्या दिवशी "वसेकर- स्नेह सम्मेलन झाले होते.या राखे परिवारातील जेष्ठ अरविंद राखे सर, अजूनही संपर्कात आहेत. 2000 तेच2006 या दरम्यान प्राचार्य सुभाष वसेकर यांचा पुतण्या आणि मोठे बंधू शरद वसेकर यांचे चिरंजीव -हेमंत वसेकर परभणी जि. प अधिकारी म्हणून कार्यरत होता, त्याच्या या मुक्कामात वसेकर मंडळींच्या भेटी अनेक वेळा झाल्या.
2007-2008 मध्ये माझे बालसाहित्य समीक्षेचे पुस्तक "बालसाहित्य मराठवाड्याचे-नवे स्वरूप नव्या वाटा "प्रकाशित झाले- यात बालसाहित्यिक



-प्राचार्य सुभाष वसेकर बद्दल लिहिलेला हा मजकूर -"जेष्ठ कवी- सुभाष वसेकर यांचा पहिला संग्रह "पऱ्यांची शाळा" प्रशांसापात्र ठरला. महाराष्ट्र राज्य पुरस्कार तर मिळाला.
या संदर्भातील एक विशेष उल्लेख-
पुणे येथील मराठी बालकुमार साहित्य संमेलन या संस्थेने सुरू केलेल्या बालसाहित्य पुरस्काराचे ते पहिले मानकरी होते. आणि कविता संग्रहाचे नाव आहे - पऱ्यांची शाळा ", या पुस्तकातील काव्य-चित्र स्वतः चित्रकार असलेल्या कवी-सुभाष वसेकर यांची होती.

**त्यांची ईतर पुस्तके-**
१."मोगऱ्याची फुले -कविता संग्रह - १९८८ ,
२ .समुद्रातील राज्यात राजू -कथा संग्रह-१९९७,
३ .परीचे अश्रू - कथा संग्रह -१९९७,
४. गाण्यांचे गाव- कविता संग्रह -२००५

बालसाहित्यिक म्हणून सुभाष वसेकर यांची प्रभावी अशी लेखन कामगिरी आहे.
बालसाहित्य मराठवाड्याचे नवे स्वरूप - नव्या वाटा या माझ्या प्रकाशित पुस्तकास राज्य शासनाचा बाल साहित्य समीक्षेचा २००८-०९ चा राज्य पुरस्कार "मिळाला तेव्हा सुभाषने दोन-तीन वेळेस फोन करून अभिनंदन करून मला मोलाचे मार्गदर्शन केले,
त्याच्या छापील हस्ताक्षरातले पत्र" माझ्या संग्रही अनेक वर्ष होते.
नांदेड-औरंगाबाद प्रवासात एक वेळा मी परभणीपासून त्याला सोबत केली, त्या प्रवासात पारिवारिक आठवणी आणि साहित्यिक आठवणीत तीन-चार कसे गेले कळाले नाही.
योगायोगाने - पुण्यातील बावधन भागात माझे वास्तव्य आहे, याच भागात शरद वसेकर यांचे चिरंजीव हेमंत राहतात, पुन्हा नव्याने भेटी होऊन जुन्या आठवणी झाल्या.
हेमांतच्या ती.मातोश्री - या माझ्यासाठी सरितावहिनी आहेत. " ,बावधनच्या सदाबहार जे.ना.संघात त्या आहेत, मी देखील या संघाचा मेम्बर आहे.
सरितावाहिनी फोनवरून आस्थेने विचारपूस करतात,
आजोळचा माणसांचा मायेचा ओलावा जपून ठेवणे, सुभाष वसेकर" हे असेच सांगत असायचा.
त्याच्या आठवणींची " मोगऱ्याची फुले सदैव टवटवीत राहतील" .

**लेख- आजोळचा माणूस**
**ले- अरुण वि.देशपांडे-पुणे**
**9850177342**

# कोजागरी पौर्णिमा : महत्त्व आणि पूजाविधी

आधुनिक केसरी

**कोजागरी पौर्णिमा (शरद पौर्णिमा) कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वाधिक जवळ असतो. या दिवशी रात्री लक्ष्मी आणि इंद्र यांची पूजा केली जाते. मध्यरात्री लक्ष्मी पृथ्वीतलावर येऊन जो जागा आहे, त्याला धनधान्य आणि समृद्धी प्रदान करते, अशी कथा आहे. या दिवसाचे महत्त्व आणि पूजाविधी सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून समजून घेऊया.**

1. तिथी

कोजागरी पौर्णिमा हा उत्सव आश्विन पौर्णिमा या तिथीला साजरा करतात.

2. इतिहास

या दिवशी भगवान श्रीकृष्णाने व्रजमंडळात रासोत्सव साजरा केला, असे श्रीमद्‌भागवतात म्हटले आहे.

3. महत्त्व

अ. वर्षातील या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ असतो आणि त्यामुळे तो मोठा दिसतो. मूळ चंद्रतत्त्वाचे म्हणजे 'चंद्रमा'चे प्रतिनिधित्व करणारा आणि आपल्याला दिसणारा चंद्र 'चंद्रमा'प्रमाणेच शीतल आणि आल्हाददायक आहे. साधकांना चंद्रासारखी शीतलता ईश्वराच्या अवतारांपासून अनुभवता येते, म्हणूनच रामचंद्र, कृष्णचंद्र अशीही नावे राम-कृष्णांना दिली गेली. चंद्राच्या या गुणांमुळेच 'नक्षत्राणामहं शशी' म्हणजे 'नक्षत्रांमध्ये मी चंद्र आहे', असे भगवान श्रीकृष्णाने श्रीमद्‌भगवद्‌गीतेत (10:21) सांगितले आहे.



आ. मध्यरात्री श्री लक्ष्मी चंद्रमंडलातून भूतलावर येऊन 'को जागर्ति' म्हणजे 'कोण जागे आहे ?', असे विचारून जो जागा असेल, त्याला धनधान्याने संतुष्ट करते.

इ. या दिवशी ब्रह्मांडात आदिशक्तीरूपी धारणेतील श्री लक्ष्मीरूपी इच्छाशक्तीची स्पंदने कार्यरत असतात. या दिवशी धनसंचयाविषयी असलेल्या सकाम विचारधारणा पूर्णत्वाला जातात. या धारणेच्या स्पर्शाने स्थूलदेह, तसेच मनोदेह यांची शुद्धी होण्यास साहाय्य होऊन मनाला प्रसन्नधारणा प्राप्त होते. या दिवशी कार्याला विशेष असे धनसंचयात्मक कार्यकारी बल प्राप्त होते.

ई. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ, म्हणजे कोजागरी पर्वतालगत आलेला असतो. त्यामुळे या पौर्णिमेला 'कोजागरी पौर्णिमा' म्हटले जाते.

4. उत्सव साजरा करण्याची पद्धत

'या दिवशी नवान्न (नवीन पिकवलेल्या धान्याने) जेवण करतात. श्री लक्ष्मी आणि ऐरावतावर बसलेला इंद्र यांची रात्री पूजा करतात. पूजा झाल्यावर पोहे आणि नारळाचे पाणी देव आणि पितर यांना समर्पून नंतर नैवेद्य म्हणून ग्रहण करतात आणि मग आपल्याकडे आलेल्या सर्वांना देतात. शरद ऋतूतल्या पौर्णिमेच्या स्वच्छ चांदण्यात दूध आटवून चंद्राला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवतात आणि नंतर नैवेद्य म्हणून ते दूध ग्रहण करतात. चंद्राच्या प्रकाशात एकप्रकारची आयुर्वेदिक शक्ती आहे. त्यामुळे हे दूध आरोग्यदायी आहे. या रात्री जागरण करतात. करमणुकीसाठी निरनिराळे बैठे खेळ खेळतात. दुसऱ्या दिवशी सकाळी पूजेचे पारणे करतात.

5. कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी लक्ष्मी आणि इंद्र यांचे पूजन करण्याची कारणे

अ. या दोन देवतांना पृथ्वीवर तत्त्वरूपाने अवतरण्यासाठी चंद्र आग्रहात्मक आवाहन करतो.

आ. लक्ष्मी ही आल्हाददायक आणि इंद्र ही शीतलतादायक देवता आहे. यादिवशी वातावरणात या दोन देवता तत्त्वरूपाने येत असल्याने आणि त्यांचे तत्त्व अधिक प्रमाणात कार्यरत असल्याने त्यांची पूजा केली जाते

6. लक्ष्मी आणि इंद्र यांचा पूजाविधी

अ. लक्ष्मी आणि इंद्र यांच्या पूजेत पोहे आणि नारळाचे पाणी वापरतात. पोहे हे आनंद देणारे, तर नारळाचे पाणी हे शीतलता प्रदान करणारे आहे. त्यामुळे हे दोन घटक वापरून जीव स्वतःकडे आनंद आणि शीतलता यांच्या लहरी आकर्षित करत असतो.

आ. चंद्राला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवतात; कारण या दिवशी दुधात चंद्राचे प्रतिबिंब पाहिल्याने त्यातून प्रक्षेपित होणारे चंद्रतत्त्व आपल्याला मिळते. या दुधात स्थूल आणि सूक्ष्म रूपांतून चंद्राचे रूप अन् तत्त्व आकर्षित झालेले असते.

इ. जागरण : मध्यरात्री लक्ष्मी चंद्रमंडलातून भूतलावर येते आणि जो जागा असेल, त्याच्यावर संतुष्ट होऊन त्याला कृपाशीर्वाद देऊन जाते. त्यामुळे कोजागरीच्या रात्री जागरण केले जाते.

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था
संपर्क- 9284027180

# मानवतेला काळीमा फासणारी थायलंडची घटना

आधुनिक केसरी

**जगात क्रूरतेचे प्रणाम दिवसेंदिवस वाढत आहे. हीबाब थायलंड येथील नान्बुआ लम्फु शहरातील घटनेवरून दिसून येते.आतंकवाद्यांचे हल्ले क्रूरतेचे असतात. यांना दया-माया नावाची वस्तूंच समजत नाही.शाळकरी विद्यार्थ्यांवर हल्ला करने वृध्दांवर हल्ला करने म्हणजे यांच्यातील माणुसकी पुर्णपणे संपुष्टात आल्याचे दिसून येते.यावरून स्पष्ट होते की हल्लेखोरांचा मुख्य उद्देश निष्पाप व निरागस लोकांचा बळी घेणे. हाच प्रकार थायलंडचा हल्लेखोर माजी पोलीस अधिकारी पान्या कामराप यानी थायलंड मधील नान्बुआ लम्फु शहरात गुरूवार दिनांक 6 आक्टोबरला दुपारी साडेबाराच्या दरम्यान बेछूट गोळीबार करून 24 निष्पाप मुलांसह 37 नागरिकांची क्रूरहत्या केली, तर 12 जण अजूनही गंभीर आहेत.यातही त्याच्या आत्म्याला शांती मिळाली नाही.**

हे मृत्यूचे तांडव झाल्यानंतर घरी जाऊन आपल्या पत्नीची व मुलाची हत्या केली.यानंतर स्वतः आत्महत्या करून या हत्याकांडावर पडदा टाकला, अशी भयावह घटना पहाता अंगावर शहारे येतात. अशा भयावह घटनांवर आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा करणे अत्यंत गरजेचे आहे.कारण ज्याठिकाणी मुलांचे संगोपन केले जाते व लहाण्याचा मोठा होतो आणि ज्यांना आपण देवाघरची फुल म्हणतो अशा बाल संगोपन केंद्राला माथेफिरू हल्लेखोर पान्या कामरापने मोहरा बनवुन रक्ताच्या लाथोळ्यात टाकून रक्तबंबाळ केले व संपूर्ण जगात काळोख पसरविला आहे आणि संपूर्ण मानवजातीला स्तब्ध केले.अशाच प्रकारच्या अनेक घटना जगात दिवसेंदिवस वाढत आहे ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.याच पाठोपाठ दक्षिण मैक्सिकोतील ग्युरेरो राज्यात 20 लोकांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली.अमेरिकेतील कैलिफोर्नियामध्ये शिख परिवाराच्या चार सदस्यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली.24 मे 2022 ला अमेरिकेतील टेक्सास शहरातील रॉब एलिमेंटरी स्कूलमध्ये एका 18 वर्षीय युवकाने शाळेच्या गेट पासूनच अंधाधुंद गोळीबारी केला.यात 18 मुलांचा व अन्य 3 जनांचा मृत्यू झाला.2012 मध्ये अमेरिकेतील न्यू टाऊन मधील सैंडी हुक स्कूलमध्ये अंधाधुंद गोळीबारी करून यात 20 विद्यार्थी व 6 शिक्षकांचा मृत्यू झाला होता.2018 मध्ये टेक्सास शहरातील सैंट फे स्कूलमध्ये एका 17 वर्षीय युवकाने विद्यार्थांसहीत 10 लोकांचा बळी घेतला. अशा भयावह घटना सुपर पॉवर अमेरिकेत वारंवार घडत असतात ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब म्हणावी लागेल.कारण तीथे बंदूक बाळगण्यास खुली सुट आहे.परंतु थायलंडची घटना महाभयानक क्रूरतेचे प्रतीक म्हणावे लागेल.अशा अनेक घटना जगात कुठे -ना-कुठे सुरूच आहे.यावरून असं वाटतं आहे की माणूस इतका क्रूर कसा काय झाला ?जगातील ज्या-ज्या देशात हतीयार(बंदुक) बाळगण्याची खुली सवलत आहे.अशा देशात आपल्याला खुनी तांडव मोठ्या प्रमाणात दिसून येते. अमेरिका, पाकिस्तानसह अनेक देश असे आहे की तीथे स्वतःच्या रक्षणासाठी बंदुकीची पुर्ण सवलत आहे.परंतु याचा दुरूपयोग होतांना आपण नेहमी पाहतो.ह्याच बंदुकी लहान मुलांच्या हाती लागतात व त्यांच्या हातुन कळत -नकळत हत्या होते व या हत्या भयावह असतात.कारण यात अनेकांचा परिवार उजाडतो.अशा हतीयाराच्या खुल्या सवलतीमुळे रक्ताची होळी आपल्याला अमेरिकेसह अनेक देशांत पहायला मिळत आहे.यावर प्रत्येक देशांनी अंकुश लावायला हवा.ज्या-ज्या देशात खुंखार गुन्हेगार आहे.त्या-त्या देशांनी मानवतेच्या रक्षणासाठी त्यांना ताबडतोब यमलोक पोहचवीले पाहिजे.मानवाधिकार आयोग व संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक पातळीवर निष्पाप निरागस लोकांच्या हत्या रोखण्यासाठी कठोर पाऊल उचलने गरजेचे आहे.अन्याथा जगात रक्ताच्या नद्या वहायला वेळ लागणार नाही.कारण दिवसेंदिवस अत्याधुनिक हतीयार लोक बाळगू शकतात याला नाकारता येत नाही.जी लहान मुले आपण त्याला देवाघरची फुल म्हणतो ती आपल्या पुढील आयुष्यासाठी मार्ग पहात असतात अशा वेळी जर कोणी माथेफिरू त्यांचे आयुष्यच संपवित असेल तर कीती भयावह घटना म्हणावी लागेल.या पृथ्वीतलावर मानवाचा जन्म जनकल्याणासाठीच झाला आहे ही बाब आपण चांगल्या प्रकारे जानतो, तरी आज मानवाचा तोल डगमगत आहे व यातुन पान्या कामराप सारखे क्रूर हल्लेखोर जन्माला आल्याचे दिसून येते.आज जनावरांमध्ये एवढी क्रूरता नसेल तेवढी क्रूरता आज थायलंडचा माथेफिरू पान्या कामराप याच्यात दिसून आली. त्यानी 37 निष्पाप लोकांचा बळी घेतलाच परंतु आपल्या पत्नीला व मुलाला सुध्दा सोडले नाही व स्वतः आत्महत्या करून या भयावह घटनेवर पुर्णविराम लावला.परंतु मानवतेच्या दृष्टिकोनातून निष्पाप निरागस लोकांचे



रक्षण कसे करता येईल याकडे संयुक्त राष्ट्र संघाने, मानवाधिकार आयोगाने व जगातील संपूर्ण देशांनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे अन्यथा अनर्थ होऊ शकतो.यामुळे थायलंड सारख्या घटना रोखण्यास जगानी एका मंचावर येण्याची गरज आहे. थायलंड येथील क्रूर हत्याकांडात मृत्यू पावलेल्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.त्यांच्या परिवाराला ईश्वर शक्ती प्रदान करो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

**लेखक : रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.9921690779,**
**नागपूर.**

# गारठा

दसरा दिवाळीचे दिवस जसजसे जवळ येऊ लागतात.तसतशी हळूहळू थंडीची चाहूल जाणवू लागते. परतीच्या पावसानं काढता पाय घेतला की थंडी आपले अस्तित्व सिद्ध करायला सज्ज होते. दिवस हळूहळू लहान व्हायला लागतो. रात्र मोठी मोठी होत जाते. सूर्योदयाच्यावेळी डोंगरमाथे, शेती भातीचा परिसर, गावाचा भोवताल धुक्यानं वेढला जातो. नदीच्या वाहणाऱ्या झूळझूळ पाण्याला कमालीचा गारठा येतो. पहाटे पहाटे पेटलेल्या चुलीच्या धुरांचे लोट गावाच्या शिरावर फेर धरून घोंगावू लागतात. रात्रीला आणि पहाटेच्या वेळी गावगल्लीत जागोजागी शेकोट्या पेटलेल्या दिसतात. लहान लहान बच्चे मंडळी, म्हातारी कोतारी जुनी



जाणती माणसं शेकोटीभोवती गोलाकार बसून हूडहुडत्या थंडीत शेकायला बसतात. गप्पांचा फड रंगात येतो. थोरली माणसं चिलीम बिड्या फुकत, तंभाखू मळत, गप्पा ठोकत, गप्पांच्या मैफलीत गहिरे रंग भरतात. गायी गुरं, शेळ्या मेंढ्या रवंथ करण्यात मग्न होऊन जातात. अन एकूणच हिवाळा सुरु झाल्याची जाणीव व्हायला लागते.


हिवाळा आला की रब्बीचा हंगाम जोर धरातो.खरीपची खुडणी,पाडणी, सोंगणी, मळणी झालेली असते. घरात धनधान्याच्या राशी लागलेल्या असतात. ज्वारी, बाजरीनं कणग्या भरुन ओसंडतात. कापूसवेचणीला नुकतीच सुरुवात होते. हरभरा, गहू, जवस, सूर्यफूल पेरणीसाठी मशागतीच्या कामाला वेग येतो. रानं ओलिवली जातात. त्यात रब्बीच्या बिजांची पेर केली जाते. रात्रीच्या वेळेला. कधी दिवसा, लाईट जेंव्हा असेल तेंव्हा शेतकरी दारं धरतो. पिकांना पाणी देतो. ढेकळखाली दडून बसलेल्या किटकांना खाण्यासाठी विजेच्या तारेवर, झाडाच्या फांदिवर बसलेले काळ्या रंगाचे कोतवाल पक्षी, पांढऱ्या शुभ्र बगळ्यांच्या बकमाळा आजूबाजूला फेर धरून उडू लागतात. ते दृश्य फारच मनोहारी असते. अशावेळी भावगीतातील - "हा बगळ्यांचा हार टपोरा, उडवीत गेला आपुला तोरा, माझ्या ह्रदयी तसेच काही, लखलख होय अनावर गं, कलती होडी सावर गं" या ओळींची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

गारव्याने चांगलाच जोम धरलेला असतो. रानात धुऱ्या बंधुऱ्यावर उगवलेल्या बोरींची बोरं गाभूळतात. सीताफळं फांदीलाच आपोआप उलायला सुरुवात होते. त्यावरून ती पाडाला आली आहेत असा कयास बांधला जातो. खडकचोपड्या पिकायला सुरुवात होते. चिंचेच्या झाडांना अंबड बोटकं, चिंचा लगडतात. त्यांचा आस्वाद घेण्यासाठी वानारांची टोळी हुडहूडणाऱ्या बोचऱ्या थंडीत चिंचेच्या शेंड्यावर बसलेली दिसते. तुरीच्या पाट्यानी पिवळी फुले धारण केलेली असतात. उसाची पेरं नीबर व्हायला लागतात. त्यांच्यात हळूहळू गोडवा यायला लागतो. रानाला एक नवी खुमारी प्राप्त होते.

हिवाळ्याची, गारठ्याची लकाकी लेवून घर, अंगण, गाव, शेत शिवार वेगळाच माहोल धारण करतं. त्यावेळी सहज कवितेच्या ओळी ओठावर येऊन जातात.....

तुरीच्या पाट्यानं, पिवळाली फुले असे रूप खुले,
त्या भुईचे सीताफळं देठी, गच्च दाटलेले
गर साठलेले, आतमध्ये झुकलेली चिंच, लगडून
पाड दिवस झिम्माड, अवतरे गाभूळल्या बोरी,
हूलवती पोरी दिवस बिल्लोरी, हिवाळ्याचे

**-भानुदास धोत्रे, परभणी**
**7972625086**







श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

आधुनिक केसरी

अ) गणिताची मुलभूत संकल्पनाः अंकाची दर्शनी किंमत व स्थानिक किंमत

सारणी क्रमांक : 02




ब) गणिताची मुलभूत संकल्पना प्रश्नसंच.

1) 59876 या संख्येतील प्रत्येक अंकाची दर्शनी किंमत किती ?

2) 432014 या संख्येतील प्रत्येक अंकाची स्थानिक किंमत किती ?

क) उखाणाः

1) वल्लरी शब्दाचा समानार्थी शब्द आहे लता,
संख्येतील अंकाची स्थानिक किंमत काढताना त्या अंकापुढे जेवढे अंक आहेत, तेवढे शुन्य दिली जातात.


१७) सांगा पाहू...
जीचे समान भाग करतात
तिला भाज्य म्हणतात.
जेव्हडे भाग करायचे
तिला भाजक म्हणतात.
जेवढ्यांना समान वाटणी मिळाली.
त्याला भागाकार म्हणतात.

2) साह्याद्री शब्दाचा अर्थ आहे सह्यपर्वत, एकक स्थानाकडून जसजसे डावीकडे जातात, तसतशी अंकाची स्थानिक किंमत दहाच्या-दहापटीत जाते वाढत.

ड) कविता :क्रमांक 17

# अस्मानी व सुलतानी संकटांनी बळीराजा संकटात

## खरीपाची सोयाबीन ही संकटात उत्पादनात येणार घट

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** अस्मानी व सुलतानी संकटाने बळीराजाचे कंबरडे मोडले असून सततच्या पावसाने खरीपातील पीकांचे अतोनात नुकसानीबरोबरच सोयाबीन वर्गीय पिके पावसाच्या कचाट्यात सापडले असून सततच्या पावसामुळे शेतातच सढण्याची वेळ आली आहे. पावसामुळे पिके कोमात गेली असून कापुसावर अळीचा प्रादुर्भाव दिसत आहे.

आता तर कपाशीवर अळीचा प्रादुर्भाव झाल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे. सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे खरीपातील मका, सोयाबीन, कपाशी हे मुख्य पीक असून या सोबतच भेंडी, मिरची, टोमॅटो लागवड केली जाते. परंतु यंदा सुरुवातीपासूनच पावसाचे धुमसान चालु असल्याने पीकांची हवी तशी वाढ झालेली नाही. यास मका अपवाद असली तरी अनेक भागातील शेतात पावसाचे पाणी साचल्याने पिक पिवळी पडली असून जास्त पाण्यामुळे सोयाबीन, मका व कापूस खराब होत आहे.गुरुवार व शुक्रवार परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली दरम्यान, पाण्यामुळे सोयाबीन पिक खराब होऊ लागल्याने झाडांना नत्र , स्फुरद व पालाश या घटकांचे योग्य असे अन्न द्रव्य भेटत नसल्याने प्रतिदीन झाडांची रोग प्रतिकारक शक्ती घटू लागली आहे. तसेच कपाशीवर वेगवेगळे किटक व रोग हल्ला चढवीत असल्याने पिकांची वाताहत होत आहे. शेतकरी महागडी औषधे फवारणी करून आपले पीक वाचवण्याचा प्रयत्न करत असून,औषधी फवारणीसाठी २० लिटर पंपाच्या यंत्राने फवारणी करणारे ५० रुपये पंपाप्रमाणे शेतकऱ्यांकडून पैसे आकारत आहे. दरम्यान, सद्या टोमॅटो,भेंडी, कांदा या भाजीपाला पिकावर अळीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाला असून अळ्या शेंडा व पाने कुरतडत असुन पिके आपोआप पिवळी पडून सुकत आहे. त्यामुळे या संकटांना तोंड देता देता शेतकऱ्यांचे अक्षरशः नाकी नऊ आले असून अस्मानी व सुलतानी संकटांनी बळीराज्याचे कंबरडेच मोडले आहे. यावर्षी सतत पडणाऱ्या पावसामुळे पिकांची वाढ खाली, वर झाल्याने तसेच चार ते पाच दिवसपासून सूर्यदर्शन न झाल्याने सोयाबीन खराब होत असून उत्पादनात घट येणार आहे.



मी यावर्षी शेतात इतर पिकांना फाटा देऊन सोयाबीन लागवड केली पण सततच्या पावसाने सोयाबीन खराब झाले असून जनावरांना घालण्याची वेळ आली आहे, त्यामुळे नेमके कोणती पिके घ्यावी हा प्रश्न शेतकऱ्यांपर्यंत पडला आहे त्यामुळे केलेला खर्चही आता निघणार नसल्याने आता तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावला आहे .

**रामभाऊ वारांगणे, जेष्ठ नागरिक तथा शेतकरी, मोलखेडा ता .सोयगाव**

# कळंकी येथे आठशे जनावरांचे लंपी प्रतिबंधक लसीकरण



आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील कळंकी येथे भाजप जिल्हाउपाध्यक्ष संजय खंबायते यांच्या प्रमुख उपस्थित सुमारे आठशे जनावरांचे लंपी रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले.

आदिवासी दुर्गम डोंगराळ भागात वसलेल्या कळंकी शिवारात आदिवासी व पशुपालकांची मोठी संख्या असुन गायवर्गिय पशुधन संख्या सतराशे आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड व आमदार प्रंशात बंब यांनी तालुक्या साठी तीस हजार लंपी लसी उपलब्ध करुण दिल्या आहे. या साठी भाजप जिल्हाउपाध्यक्ष संजय खंबायते वाडी वस्ती फिरुन लसीकरण करुण घेत आहे. कळंकी येथे लसीकरण साठी त्यांनी पुढाकार घेतला होता. या प्रसंगी भाजप तालुका सरचिटणीस सुभाष काळे, तालुकाउपाध्यक्ष अरुण थोरात, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस तथा उपसरपंच हरिष थोरात, विभाग प्रमुख सुदाम पवार, पशुविकास आधिकारी श्री . गवारे , श्री बिडाईत ,सहाय्यक पशुधन विकास अधिकारी डॉ. अनिल चव्हाण, पशुधन पर्यवेक्षक डॉ. गंगाधर नरोटे, डॉ. जावेद शेख, मंगेश कुंठे, प्रेम मोटे, गंगाधर गांगुर्डे, ग्रा.पं.सदस्य रतन मधे, प्रमोद थोरात, अण्णा थोरात, लहु थोरात, ज्ञानेश्वर थोरात, दिगंबर वाणी, आकाश कदम आदी उपस्थित होते.

# प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांना संकल्प फाउंडेशनचा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील संकल्प फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा साहित्य पुरस्कार यंदा गोमंतकीय साहित्यिकव पत्रकार प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांना जाहर झाला आहे. क्षीरसागर यांच्या 'कृतज्ञ पशु आणि पक्षी आनंदते सृष्टी' या पुस्तकाला हा पुरस्कार जाहीर झाला आहे. क्षीरसागर यांच्या लेखाचे सदर मंगळवेढा येथील दामाजी एक्स्प्रेस या दैनिकात सुरू होते त्यातील निवडक लेखांचा हा संग्रह आहे. निसर्गाता ऱ्हास आणि पर्यावरणाचे संरक्षणविषयक संदेश देणारे हे लेख आहेत. त्यांचे विपुल लेखन सातत्याने गेली अनेक दशके सुरू आहे. त्यांच्या कथा, कविता, बालकथा, ललितलेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत. या वर्षी त्यांना मिळालेला हा दुसरा पुरस्कार आहे.

या आधी मुंबई येथील दत्तात्रेय कृष्ण सांडू पुरस्कार 'माणसांची हाव सांगा संपणार तरी कधी' या पुस्तकाला मिळाला आहे. हे पुस्तक देखील निसर्ग आणि पर्यावरण रक्षणावर आधारित आहे.

श्री. क्षीरसागर यांची साहित्य संपदा विपुल आहे. माणसांची खैर नाही या पुस्तकाला बेळगावच्या वाङ्मय चर्चा मंडळाचा पुरस्कार मिळाला असून हे पुस्तक धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठात बी. कॉम प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाला लागले आहे. 'गर्भावल्या संध्याकाळी', 'मातीचे डोहाळे( माती, पाऊस आणि सखी )', 'जमाना बदलल्याचं चिन्ह दुसरं काय?' 'कवितेच्या जन्मावेळी' हे कविता संग्रह तसेच 'झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता( गझलसंग्रह )' 'यथा प्रजा तथा राजा( बालकथा )' 'आजि म्या कृषक पाहिला



( कथासंग्रह )', 'सद्‌गुरू सीताराम महाराज चरित्रामृत ( ओवीबद्ध ग्रंथ' आदी पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यांना महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटकातील साहित्य पुरस्कार प्राप्त झाले आहेत. संकल्प परिवाराने या वर्षापासून राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार सुरु केले आहेत. सध्या काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. कोरोनानंतरचा पहिलाच कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत आहे.

या पुरस्कारासाठी सर्व साहित्य प्रकारात एकूण १५३ साहित्यकलाकृतींचे प्रस्ताव उपलब्ध झाले होते . लवकरच महागाव ता . गडहिंग्लज जि . कोल्हापूर येथे एका भव्य कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात करण्यात येणार आहे, अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे संस्थेचे अध्यक्ष युवराज आनंदराव सरनोबत, उपाध्यक्षा सौ . आदिती युवराज सरनोबत तसेच सचिव सौ . वैशाली जयंत मिसाळ यांनी दिली आहे .

# औरंगाबादेत रंगणार काव्य-कोजागरी






आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील महसूल प्रबोधिनी प्रशिक्षण सभागृहात यंदाची कोजागरी पौर्णिमा येत्या रविवारी( दि.०९/१० ) सायंकाळी सहा वाजता निमंत्रितांच्या काव्यप्रतिभेने रंगणार आहे. अ.भा.मराठी साहित्य संमेलनातून आपल्या दमदार सादरीकरणाने धम्माल उडवून देणारे मराठवाड्याचे सुपूत्र कविवर्य प्रभाकर साळेगावकर, कथा, कादंबरी, कविता, संशोधन आणि प्राचीन संस्कृती ते आधुनिक समीक्षेपर्यंत चौफेर लेखन आणि सादरीकरण करणारे पश्चिम महाराष्ट्रातील सिध्दहस्त साहित्यिक डॉ.संजय बोरूडे,गोड गळ्याची विदर्भकन्या अलका तालनकर यांना आपल्या प्रवाही निवेदनाने एकसंघ बांधणारे प्रसिद्ध निवेदक ,कथा-कादंबरीकार, कविवर्य श्रावण गिरी;असे एकाहून सरस एक सादरकर्ते या कोजागरीत रंग भरणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अभिसंधान प्रकाशन( अभिजित गिरी ),पूर्वी एन्टरप्रायजेस( नागनाथ बडे ), श्री नारायणा बिल्डर्स (किरण पाटील-चाटे सर ) बर्दापूरकर जोशी असोशिएटस्( व्हि.डी.जोशी ) आणि अ.भा.वारकरी महामंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष हरिदास भाऊ जोगदंड आदिंनी केले आहे.

# टिळक शिक्षण महाविद्यालयात राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दिनांक १२ आणि १३ ऑक्टोबर २०२२ रोजी स १० ते ५ या वेळेत टिळक शिक्षण महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने टिळक शिक्षण महाविद्यालय, स प महाविद्यालय आवार, पुणे ४११०३० येथे दोन दिवसांचा राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. नुकतेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षक शिक्षण संस्था आणि औद्योगिक क्षेत्र यांच्यामध्ये चांगल्या प्रकारचे संबंध असावेत अशी गरज प्रतिपादन करण्यात आली आहे, त्या अनुषगांने या परिसंवादाचे आयोजन महत्वाचे मानले जात आहे. या मध्ये चार तज्ञ व्याख्यात्यांचे मार्गदर्शन लाभणार असून सदर परिसंवाद सशुल्क आहे तरी शिक्षक आणि विद्यार्थी यांनी दिनांक १० ऑक्टोबर २०२२ पर्यंत आपला सहभाग नोंदवावा ही नम्र विनंती. अधिक माहितीसाठी ९८५०७४२३०४ या नंबर वर संपर्क साधावा.

# हिंदु जनजागृती समितीच्या द्विदशक पूर्तीनिमित्त हिंदु राष्ट्र संकल्प अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हिंदु राष्ट्र स्थापनेच्या उद्देशाने गेली 20 वर्षे अविरतपणे कार्यरत असलेल्या हिंदु जनजागृती समितीच्या स्थापनेला 26 सप्टेंबर 2022 या दिवशी अर्थात् घटस्थापनेच्या दिनी 20 वर्षे पूर्ण झाली. या विदशक-पूर्तीनिमित्त संपूर्ण देशभरात समितीच्या वतीने व्यापकस्तरावर 'हिंदु राष्ट्र संकल्प अभियान' राबवण्यात येणार आहे. या द्विदशक-पूर्ती निमित्त संपूर्ण देशभरात 31 ऑगस्टपासून समितीच्या वतीने 'हिंदु राष्ट्र संकल्प अभियान' राबविले जात असून नोव्हेंबर महिन्यापर्यंत हे अभियान असेल. संभाजीनगर या जिल्ह्यासह संपूर्ण भारतभर हे अभियान राबवले जाईल, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या वेळी पत्रकार परिषदेसाठी पू. (अधिवक्ता) सुरेश कुलकर्णी, संस्थापक सदस्य, हिंदु विधीज्ञ परिषद आणि हिंदु जनजागृती समितीच्या संभाजीनगर जिल्हा समन्वयक कु. प्रियांका लोणे हे उपस्थित होते.

हिंदु राष्ट्र संकल्प अभियानातील विविध उपक्रम !

'हिंदु राष्ट्र संकल्प अभियाना' त देशभरात 3000 हुन अधिक ठिकाणी व्याख्यान, 2000 हुन अधिक ठिकाणी फलक प्रसिद्धी तसेच हिंदू राष्ट्रासाठी प्रतिज्ञा, 1000 ठिकाणी मंदिर स्वच्छता , 250 हुन अधिक ठिकाणी ऐतिहासिक स्मारकांची स्वच्छता, 350 हुन अधिक महिला जागरणाचे उपक्रम राबविण्यात येणार आहे. याच अंतर्गत संभाजीनगर, जालना या जिल्ह्यातही 'हिंदु राष्ट्राची आवश्यकता' , 'हिंदु धर्माची महानता' , 'शौर्य जागरणाची आवश्यकता' , 'लव्ह जिहाद' , 'हलाल जिहाद' इत्यादी विषयांवरील व्याख्याने 11ठिकाणी ,हिंदु राष्ट्र जागृती करणारी फलकप्रसिद्धी 20 ठिकाणी करण्यात आली आहे. 15 मंदिरांची स्वच्छता, तसेच 7 ठिकाणी महिला संघटनाचे उपक्रम तर 61 ठिकाणी हिंदूराष्ट्रासाठी प्रतिज्ञा असे उपक्रम राबवण्यात आले आहेत आणि 31 ऑक्टोंबर पर्यंत हे उपक्रम राबविणे सुरू असणार आहेत. या उपक्रमांतून हिंदु समाजमनात हिंदु राष्ट्राचा संकल्प दृढ व्हावा आणि हिंदु समाजाने हिंदु राष्ट्रासाठी कृतीशील व्हावे, या दृष्टीने उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे.

हलाल अर्थव्यवस्था देशविरोधी ! जिल्ह्यसह राज्यभरात हलालविरोधी कृती समिती स्थापन करून 'हलाल सक्ती' ला विरोध करणार !

भारत 'सेक्युलर' देश असतांना देशात धर्माच्या नावावर समांतर अशी 'इस्लामी अर्थव्यवस्था' हलाल प्रमाणपत्राद्वारे निर्माण केली जात आहे. या हलाल अर्थव्यवस्थेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला, तसेच राष्ट्राच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. अशा हलाल अर्थव्यवस्थेला विरोध करण्यासाठी राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्यांत 'हलाल सक्तीविरोधी कृती समिती' स्थापन करण्यात येणार आहे, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्यांचे प्रवक्ते सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.




# लखमापूर शिवारात नरभक्षक बिबट्यांची अखेर शरणागती

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्यातील लखमापुर व परिसरात धुमाकूळ घालणारा नरभक्षक बिबट्या अखेर जेरबंद करण्यात वनविभागांला मोठ्या कसरतीनंतर यश मिळाले आहे.

लखमापुर येथील हनुमानवाडी शिवारात गेल्या कितेक दिवसांपासुन धुमाकूळ घालणारा बिबट्या अखेर जेरबंद करण्यात आला आहे. धीरज काळे व निवृत्ती देशमुख यांच्या शेताच्या बांधावर हा बिबट्या मोठ्या अथक प्रयत्नांनंतर जेरबंद करण्यात आला असल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. याबाबत आधिक माहिती अशी की हनुमानवाडी परिसरातील वस्तीवर राहणाऱ्या लोकांना अगदी जीव मुठीत धरून शेतीची कामे करावी लागत होती. यांला कारण फक्त धुमाकूळ घालणारा नरभक्षक बिबट्या. या बिबट्यांने अनेकांवर हल्ला करून जखमी केले होते. तसेच काहीचा प्राण ही घेतला आहे. अनेक कुत्रे या बिबट्यांने हल्ला करून संपवले आहे. गाई,वासरे,मेंढ्या, बक-या,इ. नेहमी हल्ले हा बिबट्या करीत असल्याने येथील व परिसरातील नागरिकांना त्यांने सळो की पळो करून सोडले होते. विद्यार्थी शाळेत जातांना पालकांना मोठी सुरक्षा घेऊन मुलांना शाळेत सोडावे लागत होते. तसेच मजुर वर्ग कामांवर येण्यासाठी भीतीदायक वातावरणात वावरत होते. परंतु आता हा नरभक्षक बिबट्या अखेर जेरबंद केल्याने नागरिकांनी मोकळा श्वास घेतला आहे.



या बिबट्या प्रकरणात जीवाचे रान करणाऱ्या वनविभागांला जनतेच्या रोषाला देखील मोठ्या प्रमाणावर सामोरे जावे लागत होते . त्यानंतर वनविभागांचे कर्मचारी परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून होते . यानंतर वनविभागांने पिंजरा लावून बिबट्यांला अखेर जेरबंद करण्यात वनविभागांला यश आल्याने नागरिकांमध्ये समाधानांचे वातावरण निर्माण झाले आहे . या ठिकाणी तीन बिबटे असून त्यापैकी एक जेरबंद करण्यात आला असून अजून दोन बिबटे पकडण्यासाठी वनविभागांने पिंजऱ्यांची व्यवस्था केली आहे . दरम्यान यावेळी वनविभागांच्या अधिकारी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली रामचंद्र तुंगार, वनपाल परिमंडळ अधिकारी, वनरक्षक आण्णा टेकनर, हेमराज महाले, परशराम भोये, रेश्मा पवार, विठ्ठल चौधरी, शांताराम शिससाट, बाळु भगरे आदी वनविभागांचे अधिकारी उपस्थित होते .

# पूर्णेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून शस्त्रपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**पूर्णा :** धर्म एवं हतो हन्ति,धर्मो रक्षति रक्षितः ! तस्मोधर्मो न हन्तव्यो,मानो धर्मो हतोवधीत !!

प्राचीन गौरवशाली काळापासून अधर्मावर धर्माची मात,विजयांची परंपरा आणि शक्तीची उपासाना यांचे एकत्रितपणे स्मरण करून देणारा हिंदु समाजाचा एक प्रमुख उत्सव राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रकट स्वरूपात दरवर्षी सजरा करतो या परंपरेनुसार पुर्णेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने आज रविवार दि.०९ आक्टोंबर २०२२ रोजी शहरातील श्रीराम मंदिर परिसरात विजयादशमी व शस्त्रपुजन उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दुपारच्या सुमारास पंथसंचलनाला सुरूवात होणार असून या संचलनाची समाप्ती सायं.०४-०० वाजेच्या सुमारास जुने वैभव जिनिंग परिसरातील स्वामी विवेकानंद रुग्नालय येथे होणार असून सायंकाळी ०६-०० वाजेच्या सुमारास शस्त्र पुजनाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून आयोजित विजयादशमी व शस्त्रपुजन उत्सवास प्रमुख वक्ते म्हणून संघाचे छत्रपती संभाजी महाराज नगर (औ.बाद) विभागीय प्रचारक श्रीरामजी पांडे तर प्रमुख अतिथी म्हणून हभप. ॲड.यादवरावजी भवरे यांचे मार्गदर्शन लाभणार असून या विजयादशमी व शस्त्रपुजन उत्सवास संघाच्या जास्तीतजास्त स्वयंसेवकांसह हिंदु बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुर्णा तालुका कार्यवाहक प्रविण रमेशराव अंबोरे यांनी केले आहे.

# डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे २९ ऑक्टोबरला पहिले अधिवेशन

## राज्यस्तरीय अधिवेशनाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांची राहणार उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन २९ ऑक्टोबर रोजी महाबळेश्वर भिलार येथे होणार असून या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई तर कार्याध्यक्षपदी माजी राज्यपाल सातारा जिल्ह्याचे खासदार श्रीनिवास पाटील व प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उच्च तंत्र व शिक्षण मंत्री व वस्त्रोदयोग मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांची उपस्थित राहणार आहे. या अधिवेशनासाठी राज्यभरातून संपादक पत्रकारांची उपस्थिती राहणार आहेत. डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या नेतृत्वाखाली महाबळेश्वर येथे होणाऱ्या या राज्यस्तरीय अधिवेशनाची तयारी म्हणून सातारा जिल्हा संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सभासदांची बैठक सातारा येथील शासकीय विश्रामगृहात नुकतीच पार पडली या अधिवेशनाच्या दरम्यान महाराष्ट्रातून येणाऱ्या संपादक पत्रकारांचे स्वागत व इतर नियोजनाबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.



# डॉ. लोखंडे लिखित वन पेज स्टोरीचे रविवारी प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील डॉ. विक्रम लोखंडे यांनी लिहिलेल्या वन पेज स्टोरी या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा 16 ऑक्टोबर रविवारी सकाळी 10 वाजता येथील रुक्मिणी सभागृह,एमजीएम परिसर येथे होत आहे. अध्यक्ष म्हणून जेष्ठ लेखिका व ९२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यवतमाळचे अध्यक्ष मा.डॉ. अरुणा ढेरे तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध लेखक तथा पटकथाकार अरविंद जगताप उपस्थित राहणार आहेत तर भोकरदन चे आमदार संतोष दानवे हे प्रमुख पाहुणे म्हणून हजर राहणार आहेत. डॉ. विक्रम लोखंडे हे शासकीय विद्या निकेतन औरंगाबाद चे माजी विद्यार्थी आहेत या कार्यक्रमाला सर्वांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन साकेत प्रकाशनाचे साकेत बाबा भांड व लेखक डॉ. विक्रम समाधान लोखंडे यांनी केले आहे.

# दिवंगत केंद्रीयमंत्री रामविलास पासवान यांच्या पुण्यस्मरणानिमित्त फळवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दिवंगत केंद्रीय मंत्री व लोक जनशक्ती पार्टीचे संस्थापक स्व. रामविलास पासवान यांच्या पुण्यस्मरणानिमित्त लोकजन शक्ती पार्टी उत्तर महाराष्ट्र विभागाच्या धुळे जिल्हा तर्फे मोराणे शिवारातील संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह कार्यशाळा येथे फळ वाटप करण्यात आले व स्व.रामविलास पासवान यांचे कार्य व आठवणीना उजाळा देण्यात आला. सर्वप्रथम स्व.रामविलास पासवान यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना सामूहिक अभिवादन करण्यात आले. त्यानंतर बालगृहातील अनाथ मुलींना फळ वाटप करण्यात आले. सदर हा कार्यक्रम लोक जनशक्ती पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप साळवे यांच्या संकल्पनेतून घेण्यात आला. याप्रसंगी उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप साळवे, महिला अध्यक्षा शोभाताई चव्हाण , धुळे जिल्हा महासचिव कुंदन खरात, जिल्हा उपाध्यक्ष मधुकर चव्हाण, शहराध्यक्ष प्रमोद सोनवणे, उत्तर महाराष्ट्र संघटक राज साळवे, दिपक वाघ आकाश सोनवणे,गौतम बोरसे, रमेश बागुल, सिद्धांत साळवे, सागर चव्हाण, बबलू शिंदे, सम्राट देवरे,गौतम वाघ, सूरज साळवे, तात्या चव्हाण, संजय पाटील, गोटया मराठे व महिला पुरुष मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.



# शिक्षकांची रिक्तपदे त्वरित भरण्यात यावीत: शेख अब्दुल रहीम

## हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनच्या शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट!

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनच्या शिष्टमंडळाने मुंबईला राजभवनात जाऊन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा.श्री.भगतसिंहजी कोश्यारी यांची भेट घेतली . हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनतर्फे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सरांनी परंपरेनुसार पुष्पगुच्छ न देता पुस्तक देऊन राज्यपाल महोदयांचा सत्कार केला व त्यानंतर सविस्तर चर्चा करून एक निवेदन सादर करण्यात आले.



चर्चेत सर्व प्रथम राज्यातील हजारो शिक्षकांचे पदे रिक्त आहे ती पदे त्वरित भरण्यात यावीत यावर सकारात्मक चर्चा करून 20% टक्के आणि 40 % अनुदानित शाळांना लवकरात लवकर प्रचलित नियमानुसार अनुदान देण्यात यावे अशी विनंती करण्यात आली. त्यानंतर मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी सारथी, बार्टीच्या धर्तीवर डॉ. ए.पी जे कलाम शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात यावी. शैक्षणिक वर्ष 22-23 वर्षात सर्व विद्यार्थ्यांना म्हणजे KG ते PG पर्यंत सर्व पाठ्यपुस्तके मोफत मिळावी तसेच शिक्षक बांधवांच्या सुरक्षेसाठी शिक्षक सुरक्षा ॲक्ट बनविण्यात यावा. सर्व प्रश्न आपल्या परीने सोडविण्याची विनंती करण्यात आली. या वेळी राज्यपाल महोदयांनी सविस्तर चर्चा करून मार्गदर्शन केले व लवकरात लवकर मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून याबाबत पत्र देऊन सर्व प्रश्न मार्गी लावू असे आश्वासनही दिले. हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनला आज राजभवनात राज्यपालांची भेट घेण्याकरिता दुसऱ्यांदा आमंत्रित करण्यात आले होते. हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनच्या शिष्टमंडळात संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर, संस्थापक सदस्य शाहरुख पठाण, कट्टर समर्थक सय्यद अब्दुल रहीम सर, सदस्य शेख अलीम सह आदींची उपस्थिती होती.

# स्व. नाना पालकरस्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयामध्ये प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही स्व.नाना पालकर स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मंगळवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. वर्ष २०२२-२३ हे मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. खोलेश्वर महाविद्यालय हे मागील ५१ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात विविध सामाजिक, शैक्षणिक गुणवत्तेच्या वाढीसाठी सकारात्मक परिवर्तन करण्यासाठी प्रयत्नशील आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले आहे. स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे आहेत - १) मराठवाडा विकास - सामाजिक व आर्थिक आव्हाने, २) भारतीय कुटुंब व्यवस्था - एक संस्कार केंद्र, ३) स्वागत नविन शैक्षणिक धोरणाचे, ४) देणा-याने देत जावे असे आहेत. आपला विषय मांडण्यासाठी प्रत्येक स्पर्धक विद्यार्थ्यांस ७ मिनिटांचा अवधी असणार आहे. स्पर्धेचे माध्यम मराठी असेल, पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी आपल्या वरीष्ठ महाविद्यालयातील २ विद्यार्थ्यांचा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील २ विद्यार्थ्यांचा एकच संघ स्पर्धेसाठी पाठवावा. स्पर्धेचे सांघिक शुल्क शंभर रूपये असेल, सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या संघाची नोंदणी खाली उल्लेख केलेल्या ई-मेल वर करावी. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना संलग्न असलेली वरिष्ठ महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये तसेच माध्यमिक विद्यालयांना जोडून असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल. प्रत्येक संघातील स्पर्धकांच्या गुणांची बेरीज करून संघाचे एकूण गुण मोजले जातील व अधिक गुण मिळविणाऱ्या संघाला स्मृती चषक देण्यात येईल. संयोजकांचे पत्र मिळताच चषक सुस्थितीत स्वखर्चाने परत करावा लागेल. स्पर्धेतील भाषणे ही स्मृती चषक किंवा व्यक्तिगत पारितोषिके देण्याच्या पात्रतेची झाली नाहीत असे परीक्षकांचे मत झाल्यास पारितोषिके रहित करण्याचा अधिकार संयोजकांचा राहील. प्रथम पारितोषिक - स्मृतिचिन्ह व रोख रूपये ५,५०१/- , द्वितीय पारितोषिक - स्मृतिचिन्ह व रोख रूपये ३,५०१/- , तृतीय पारितोषिक - स्मृतिचिन्ह व रोख रूपये २,५०१/- , तसेच प्रत्येकी ११,००/- रूपयांची दोन उत्तेजनार्थ पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. नोंदणी स्पर्धाप्रमुख प्रा.डॉ.दिगंबर मुडेगावकर - संपर्क क्रमांक - ७०२०५८२९९५ (मेल आयडी - digambarmudegaonkar@gmail.com) स्पर्धा सहप्रमुख प्रा.शाम बारडकर संपर्क क्रमांक - ८८३०४६०८०५ (मेल आयडी - baradkar.sham@gmail.com) यांचेकडे करावी.

# सिल्व्हर ओकवर हल्ला कुणी करायला लावला होता हे त्या कर्मचाऱ्यांना परत कामावर घेतल्याने स्पष्ट : जयंत पाटील

## चंद्रकांत पाटील यांनी मोदी - शहांची तुलना आई-वडिलांशी करणे हे हिंदू संस्कृतीत बसत नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्या एसटी कर्मचाऱ्यांनी सिल्व्हर ओकवर हल्ला केला 'त्या' एसटी कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेतले गेले याचा अर्थ सिल्व्हर ओकवर जाण्यासाठी त्यांना कुणी फुस लावली होती हे लक्षात येते असा थेट हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी केला.



जयंत पाटील यांनी माध्यमांनी विचारलेल्या वेगवेगळ्या प्रश्नाला उत्तर देताना आपले मत व्यक्त केले.

आई-वडिलांना शिव्या देणे अत्यंत चुकीचे आहे मराठी माणसे असे कधीही करत नाही चंद्रकांतदादा यांना आई-वडिलांना शिव्या द्या असे सांगणे हे योग्य आहे असे मला वाटत नाही मोदी - शहांची तुलना आई-वडिलांशी करणे हे तर अत्यंत चुकीचे आहे हे हिंदू संस्कृतीमध्ये बसत नाही असा टोलाही जयंत पाटील यांनी चंद्रकांत पाटील यांना लगावला.

रश्मी शुक्ला यांची चौकशी सुरू होती त्या प्रकरणात नेमके काय समोर आले आहे आणि क्लोजर रिपोर्टमध्ये काय लिहिले आहे हे पाहिल्याशिवाय त्यावर बोलणे उचित ठरणार नाही. जर क्लीनचीट दिली असेल तर त्यामध्ये त्याची कारणे लिहिली असतील असेही जयंत पाटील म्हणाले. आमदार वैभव नाईक यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली नाही ते निष्ठावंत आहेत. कदाचित त्यांनी साथ सोडावी यासाठी दबाव आणला जात आहे असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. निवडणूका जवळ आल्या की, अशी काही विधाने करायची आणि त्या वर्गाला चुचकारायचं अशी स्ट्रॅटेजी काही जणांची असू शकते. मी मोहन भागवत यांच्याबाबत बोलत नाहीत. मात्र मधल्या काळात ते मुस्लिम धर्मगुरूंना देखील भेटले होते असा उपरोधिक टोलाही जयंत पाटील यांनी लगावला.

उद्धव ठाकरे यांच्या सभेने खरी शिवसेना कुणाची हे स्पष्ट झाले आहे. धनुष्यबाण हे चिन्ह शिवसेनेचे म्हणजेच उद्धव ठाकरे यांचेच आहे. जर निवडणूक आयोगाने शिंदे गटाला चिन्ह दिले तर त्यांच्या कृतीबाबत आश्चर्य व्यक्त केले जाईल असेही जयंत पाटील यावेळी म्हणाले.

शिंदे गटाच्या सभेला एवढा खर्च करण्यात आला. लोकांना अक्षरशः कोंबून मुंबईला आणले त्यांना माहिती देखील नव्हती असे सांगतानाच या सर्व प्रकाराची चौकशी व्हायला हवी अशी मागणीही जयंत पाटील यांनी केली.

# शेफालीने इतिहास रचत मिळवून दिला विजय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारताच्या शेफाली वर्माने आजच्या सामन्यात इतिहास रचला आणि त्यामुळेच भारताला बांगलादेशविरुद्ध दणदणीत विजय मिळवता आला. भारताचा हा या स्पर्धेतील चौथा विजय ठरला आहे. पण भारताचा हा विजय १८ वर्षांच्या शेफालीच्या धडाकेबाज कामगिरीमुळे सर्वांच्याच लक्षात राहणार आहे.

आजच्या सामन्याला सुरुवात झाली तीच शेफालीच्या दणकेबाज फटकेबाजीने. सुरुवातीपासूनच शेफालीने बांगलादेशच्या गोलंदाजीवर जोरदार प्रहार करायला सुरुवात केली. शेफालीने या सामन्यात ४४ चेंडूंत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ५५ धावांची दमदार खेळी साकारली. शेफालीने यावेळी स्मृती मंधानाबरोबर ९६ धावांची भागीदारी रचली. शेफालीने यावेळी या अर्धशतकासह एक पराक्रम केला आहे. महिला क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वात कमी वयात एक हजार धावा करणारी ती पहिलीच खेळाडू ठरली आहे. यापूर्वी ही विक्रम स्मृतीच्या नावावर होता. स्मृतीने २१व्या वर्षा भारतासाठी खेळताना एक हजार धावा पूर्ण केल्या होत्या, पण आता १८व्या वर्षी शेफालीने एक हजार धावा पूर्ण केल्या असून आता हा विक्रम तिच्या नावावर असेल. शेफाली आणि स्मृती यांनी भारताला दमदार सुरुवात करून दिली. त्यामुळे भारताला प्रथम फलंदाजी करत असताना १५९ धावा करता आल्या. शेफालीनंतर स्मृतीने ४७ आणि जेमिमा रॉड्रीग्सने नाबाद ३५ धावांची धडाकेबाज खेळी साकारली. या पहिल्या तीन फलंदाजांनी दमदार फटकेबाजी केली आणि त्यामुळे भारताला दीडशे धावांचा टप्पा ओलांडता आला. भारताच्या १६० धावांचा पाठलाग करताना बांगलादेशची सुरुवात आश्वासक झाली नाही. बांगलादेशच्या मधल्या फळीतील फलंदाजांना यावेळी मोठी खेळी साकारता आली नाही. बांगलादेशचे पहिले तीन फलंदाज सोडले तर त्यानंतर एकाही खेळाडूला दोन अंकी धावसंख्याही उभारता आली नाही. हेच बांगलादेशच्या पराभवाचे मोठे कारण ठरले. पण त्याचबरोबर भारताच्या गोलंदाजांनी यावेळी अचूक आणि भेदक मारा केला. भारताने ठराविक फरकाने बांगलादेशच्या संघाला एकामागून एक धक्के दिले आणि त्यामुळेच त्यांच्यावर पराभवाची नामुष्की ओढवली. भारताच्या आव्हानाचा पाठलाग करताना त्यांना १०० धावा करता आल्या आणि भारतोन ५९ धावांनी दणदणीत विजय साकारला.

# विश्वशांती महाविहाराकरिता सर्वतोपरी सहकार्य : आ. मुंदडा

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** बुद्धिस्ट फाऊंडेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने बुधवार, दिनांक 5 ऑक्टोबर 2022 रोजी नियोजित 'विश्वशांती महाविहार', 'लुंबिनी पार्क', मांडवा रोड, अंबाजोगाई (जि.बीड) येथे भव्य धम्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. धम्म महोत्सवात आदरणीय भदन्त धम्मसार (किल्लारी, जि.लातूर) यांचे धम्मदेसना - धम्मप्रवचन झाले. तर उद्घाटक म्हणून ॲड. संघराज रूपवते (उच्च न्यायालय, मुंबई.) आणि समारोप सत्रात आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. धम्म महोत्सव उद्घाटन, धम्म प्रवचन, "स्वरविहार" हा बुद्ध व भीमगीतांचा प्रबोधनपर कार्यक्रम आणि समारोप अशा चार सत्रात आयोजित करण्यात आला होता. धम्म महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बुधवार, दिनांक 5 ऑक्टोबर 2022 रोजी सकाळी 10.30 ते सायंकाळी 6.30 वाजेपर्यंत नियोजित 'विश्वशांती महाविहार', 'लुंबिनी पार्क', मांडवा रोड, अंबाजोगाई (जि.बीड) येथे हा महोत्सव साजरा करण्यात आला. प्रारंभी उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अजिंक्य चांदणे, प्रा.सुकुमार कांबळे (राष्ट्रीय अध्यक्ष - डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया), माजी आमदार पृथ्विराज साठे, जेष्ठ नेते प्रा.एस.के. जोगदंड, जेष्ठ नेते ॲड.अनंतराव जगतकर, जेष्ठ नेते एस.के.चेले, विश्वास बिराजदार या मान्यवरांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. या वेळेस प्रा.सुकुमार कांबळे आणि अजिंक्य चांदणे यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात बौद्ध धम्माचा स्वीकार केला असल्याने त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. प्रा.सुकुमार कांबळे यांनीही भारत बौद्धमय करण्यासाठी धम्म स्विकारा, आत्मसात करा, कागदोपत्री बौद्ध झाले पाहिजे, आजच्या तरूणांनी बुध्द विहारात गेले पाहिजे, निर्व्यसनी राहिले पाहिजे असे विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करताना आमदार सौ.नमिताताई मुंदडा म्हणाल्या की, आपल्या सर्वांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा सार्थ अभिमान आहे, तथागत गौतम बुद्ध यांनी आपणांस मानवता, शांती, करूणा यांची शिकवण दिली. तथागत गौतम बुद्ध आणि बोधीसत्त्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून आयुष्यात वाटचाल करावी, 'विश्वशांती महाविहार' या करिता आमदार फंडातून सभागृह आणि आवश्यक ती सर्वोतोपरी मदत व सहकार्य केले जाईल असे आमदार सौ.मुंदडा म्हणाल्या. यावेळेस धम्म महोत्सवाचे आयोजना करिता पुढाकार घेणारे व्यवस्थापन समितीचे संयोजक प्रा.डी.जी.धाकडे, प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांचे आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. समारोप सत्राचे सूत्रसंचालन डॉ.राहूल धाकडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.कमलाकर कांबळे यांनी मानले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# कीटकनाशक व इतर औषधीवरील जी.एस.टी रद्द करा

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे : लासूर स्टेशन येथे टोमॅटो हबसाठी सर्वतोपरी प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथे कृषि उत्पन्न बाजार समितीत बोलताना विरोधी पक्षनेते आंबादास दानवे शेतकऱ्यांना संबोधित करताना म्हणाले कीं शेतकऱ्यांच्या पिकावरील तणनाशक, टॉनिक, व इतर औषधीवर असणारा जी.एस.टी.कर शासनाने रद्द करावे जेणेकरून शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड बसणार नाहीं व स्वस्तात औषधी मिळतील असे सांगून लासूर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समितीने गाजगाव, माळीवाडगाव, गवळीशिवरा, व इतर ठिकाणी टोमॅटोचे क्षेत्र वाढल्याने टोमॅटो हब निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत मी शासनदरबारीं लागणारी सर्वतोपारी मदत करेल असे आश्वासन देऊन बाजार समितीने सुसज्ज असे कार्यलया बांधावे असे सांगून लासूर स्टेशन बाजार समिती अख्त्यारीतील भुसार व कांदा मार्केट मधील रस्त्याचे निवेदन माजी संचालक रमेश पाटील डोणगावकर यानी दिले ते मंजूर केले जाईल व जो निधी लागेल तोही दिला जाईल असा शब्द दिला. दरम्यान यावेळी शेतकऱ्यांनी विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांना अनेक तक्रारी मांडल्या त्यात लासूर स्टेशन येथील शेतकरी अजय पाटील साखळे,किशोर कोठारी शिवाजी चव्हाण, संजय पाटील,सतीश नरोडे, दिवशी पिंपळगाव राधाकृष्ण गुजर यानी सरकारने औरंगाबाद जिल्हातील सर्व शेतकऱ्यांना विमा व ओल्या दुष्काळाचे अनुदान देण्याची मागणी करून लेखी निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक कृष्णा पाटील डोणगावकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख दिनेश मुथा, माजी सभापती रवींद्र पोळ, दादासाहेब पाटील जगताप, माजी संचालक सर्वश्री रमेश पाटील डोणगावकर, प्रकाश मुथा, वाल्मिक चव्हाण, कडुबा हिवाळे, अनिल बबलू पोळ, ग्रामपंचायत सदस्य मयुर जैस्वाल, नारायण ठोळे, योगेश मापारी, नितीन कांजुने, अमोल शिरसाठ, दिलीप पवार, संदिप आमराव, भरत पाटणी आदीसह शेतकरी बंधुची उपस्थिती होती. दरम्यान बाजार समितीचे प्रसाशक किरण चौधरी व सचिव कचरू रणयेवले यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व कृष्णा पाटील डोणगावकर यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार केलं तर आभार रवींद्र पाटील पोळ यानी मानले.



# प्रशांत किशोर यांच्याबद्दल नितीशकुमारांचा गौप्यस्फोट

आधुनिक केसरी न्यूज



**पटना :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्यावर पलटवार केला आहे. त्यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की, प्रशांत किशोर यांना आम्ही बोलावलं नव्हतं. ते स्वतःच आले होते. ते त्यांना वाटेल तसं बोलतात, आम्हाला काही देणंघेणं नाही. या लोकांचा काही ठिकाणा नाही, सध्या भाजपात गेले आहेत, त्याचप्रमाणे काम करतील.

काही दिवसांपूर्वी प्रशांत किशोर यांनी, मला नितीश कुमार यांनी घरी बोलावले होते आणि पक्षाचे नेतृत्व करण्यास सांगितले होते, मात्र मी त्याला नकार दिला. असे खळबळजनक विधान केले होते. यावर मुख्यमंत्री नितीश कुमारांनी वरील प्रतिक्रिया दिली. नितीश कुमार म्हणाले की, एक वेळ होती जेव्हा प्रशांत किशोर माझ्यासोबत होते, माझ्या घरी राहत होते. त्यांच्याबद्दल आता आम्ही काय बोलावे, त्यांना जिथे जायचे तिथे त्यांनी जावे, आम्हाला काही देणेघेणे नाही. चार-पाच वर्ष अगोदर एकदा माझ्याकडे आले होते आणि पक्षाला काँग्रेसमध्ये विलीन करावे असे सांगत होते, आम्ही काय काँग्रेसमध्ये विलीन करणरा का?. या लोकांचा काही ठिकाणा नसतो, आज भाजपासोबत आहेत कुठे केंद्रात जागा मिळावी म्हणून आम्हा सर्वांचा विरोध करत आहेत.

# बालविवाहाबाबत केंद्रीय गृहमंत्रालयाकडून धक्कादायक आकडेवारी

आधुनिक केसरी न्यूज

**झारखंड :** झारखंडमध्ये महिलांवरील अत्याचाराच्या घटना वारंवार समोर येत असताना बालविवाहाबाबत धक्कादायक माहिती पुढे आली आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या ताज्या आकडेवारी नुसार झारखंडमध्ये बालविवाहाची टक्केवारी सर्वाधिक ५.८ टक्के असल्याचे समोर आले आहे. तर १८ वर्ष पूर्ण व्हायच्या आधीच मुलींचे विवाह होण्याचे प्रमाण १.९ टक्के आहे. देशात सर्वात कमी म्हणजे शून्य बालविवाह केरळमध्ये आहे. झारखंडमध्ये होणारे बालविवाहांपैकी अर्ध्यापेक्षा जास्त बालविवाह हे ग्रामीण भागात तर उर्वरीत शहरी भागात होत असल्याचेही या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. झारखंड आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यात २१ वर्षांपूर्वी महिलांचे विवाह होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आकडेवारी नुसार ५४.०९ टक्के मुलींचे विवाह हे २१ वर्षांच्या आत होतात. झारखंडमध्ये हेच प्रमाण ५४.६ टक्के एवढे आहे. तर देशात २९.५ टक्के मुलींचे विवाह २१ वर्षांच्या आत होत आहेत.

# प्रथमेशची मृत्युशी झुंज संपली

## दहीहंडी फोडताना झाला होता जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** घाटकोपर परिसरात दहीहंडी फोडण्यासाठी रचलेले थर कोसळून गंभीर जखमी झालेला गोविंदा प्रथमेश सावंतचे शनिवारी केईएम रुग्णालयात हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. तो २० वर्षांचा होता. साधारण दीड महिन्यांहून अधिक काळ त्याची रुग्णालयात मृत्युशी झुंज सुरू होती. अखेर शनिवारी त्याची प्राणज्योत मालवली. प्रथमेशच्या मृत्युमुळे करीरोड परिसरात शोककळा पसरली. राज्य सरकारने करोनाविषयक निर्बंध हटविले असून यंदा सर्वच उत्सव निर्बंधमुक्त वातावरणात साजरे होत आहेत. यामुळे दहीहंडीच्या दिवशीही गोविंदांमध्ये प्रचंड उत्साह होता. अनेक दहीहंडी पथकांतील गोविंदांमध्ये उंच दहीहंडी फोडण्याची चुरस लागली होती. दहिकाल्याच्या दिवशी १९ ऑगस्ट रोजी करीरोड येथील साईभक्त गोविंदा पथक घाटकोपर येथे दहीहंडी फोडण्यासाठी गेले होते. घाटकोपरमध्ये दहीहंडी फोडण्यासाठी रचलेला थर कोसळला आणि थरात उभा असलेला प्रथमेश गंभीर जखमी झाला. तातडीने प्रथमेश रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या मणक्याला गंभीर दुखापत झाली होती. तेव्हापासून ते रुग्णालयात मृत्युशी झुंज देत होता. अखेर शनिवारी त्याची प्राणज्योत मालवली. रुग्णालयात दाखल असताना साईभक्त गोविंदा पथकातील काही युवक त्याची सुश्रुशा करीत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याच्यावरील उपचारासाठी पाच लाख रुपये मदत म्हणून दिले होते. तसेच माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांचे डॉक्टर प्रथमेशच्या प्रकृतीवर लक्ष ठेऊन होते.

# हक्काची जागा भाजपला सोडली, आता धनुष्यबाण कशाला हवा? शिंदे गटावर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे लेखी उत्तर सादर केले आहे. अंधेरी पोटनिवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या गटाचा उमेदवार नाही, मग धनुष्यबाण चिन्ह का मागितलं जातंय? असा सवाल ठाकरेंतर्फे विचारण्यात आला आहे. शिवसेनेच्या रमेश लटके यांच्या निधनानंतर होणाऱ्या अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून शिंदेंवर शरसंधान साधण्यात आले आहे.

हक्काची जागा भाजपला सोडली, स्वतःचा उमेदवारही रिंगणात उतरवणार नाही, मग आता धनुष्यबाण कशाला हवाय? असा सवाल ठाकरेंतर्फे विचारण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनुष्यबाण निवडणूक चिन्हावर त्वरीत सुनावणी घेण्याची विनंती आयोगाला केली होती. मात्र जोपर्यंत सर्व कागदपत्रं सादर होत नाहीत, तोपर्यंत सुनावणी घेण्याची घाई करु नये, अशी विनंती ठाकरे गटातर्फे करण्यात आली आहे. एकनाथ शिंदे पोटनिवडणुकीत आपला उमेदवार उतरवणार नाहीत, मग त्यांना चिन्हाची गरज काय? असा प्रश्न विचारण्यात आला आहे. भाजपला फायदा व्हावा म्हणून शिंदेंनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवले, असा घणाघातही ठाकरेंकडून करण्यात आला आहे.

# ठाकरे पिता-पुत्रामध्ये मतभेद; वडील शिंदे गटासोबत, तर मुलाचा उद्धव ठाकरेंना पाठिंबा!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अनेक राजकीय घडामोडींनंतर अखेर शिवसेना आणि शिंदे गट असे दोन्ही दसरा मेळावे मुंबईत पार पडले. अपेक्षेप्रमाणे दोन्ही बाजूंनी एकमेकांवर मोठ्या प्रमाणावर आरोप-प्रत्यारोप केल्याचे यावेळी दिसून आलं. मात्र, त्यासोबतच चर्चा झाली ती या मेळाव्यांना उपस्थिती लावलेल्या इतर नेतेमंडळींची. उद्धव ठाकरेंचे बंधू जयदेव ठाकरे हे शिंदे गटाच्या मेळाव्यात एकनाथ शिंदे यांच्यासह व्यासपीठावर आल्याचं पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. यावेळी जयदेव ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंना पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर आता त्यांचे पुत्र जयदीप ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंना पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात ठाकरे पिता-पुत्रांमध्ये मतभेद असल्याचे उघड झाले आहे. जयदीप ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंना पाठिंबा देत असल्याचं सांगतानाच भविष्यात जर आपल्यावर शिवसेनेने जबाबदारी दिली, तर ती पार पाडण्यासाठी निश्चितच काम करेन, असे स्पष्ट केले. आगामी काळात आणखीन एक ठाकरे राजकारणात सक्रीय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशा संकटप्रसंगी कुटुंबासमवेत असणे, हे माझे कर्तव्यच आहे, अशी भूमिका जयदीप ठाकरेंनी मांडली आहे. कुणी कुठली बाजू घ्यायची, तो त्यांचा प्रश्न आहे. प्रत्येकाचे आपापले मत असते. ते तिथे का गेले, हे त्यांनाच विचारायला हवं. मी या घराचा सर्वात मोठा नातू आहे. मला माझ्या आजोबांबद्दल, उद्धव काकांबद्दल, आदित्यबद्दल प्रचंड आदर आहे. आपल्यासमोरचं हे चित्र फार विचित्र आहे. अशा वेळी माझ्या कुटुंबासोबत असणे हे माझे कर्तव्य आहे. म्हणून मी उद्धव काकांच्या सभेला गेलो, असे जयदीप ठाकरे म्हणाले. पुढे-मागे जर मला संधी मिळाली किंवा त्यांना वाटले की माझ्यावर जबाबदारी सोपवावी, तर ती मी १०० टक्के स्वीकारेन आणि पक्षाला वाढवण्यासाठी नक्कीच मदत करेन. रश्मी काकी आणि आदित्य यांच्याशी मी बोलत असतो. उद्धव काकांनाही भेटलो. त्यांना मला व्यवस्थित भेटायचे आहेच. त्यांची वेळ घेऊन लवकरच त्यांना भेटेन, असेही जयदीप ठाकरेंनी यावेळी स्पष्ट केले. जे झाले, ते कुणालाच पटलेले नाही. ते बरोबर झालेले नाही. तेही उद्धव काकांना बरे नव्हते तेव्हा झाले. अशा वेळी सगळ्या कुटुंबीयांनी एकत्र यायला हवं. पण ते सध्या होत नाहीये. मला जे बरोबर वाटले, ते मी केले.

### राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार?

दरम्यान, १६ वर्षांपूर्वी शिवसेनेतून बाहेर पडत मनसेची स्थापना करणारे राज ठाकरे पुन्हा शिवसेनेसोबत येतील का? अशी विचारणा केली असता जयदीप ठाकरेंनी तशी इच्छा असल्याचं सांगितलं. "सगळ्या महाराष्ट्राला वाटतंय की राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यायला हवं. त्यातून आणखीन ताकद वाढेल. पण एकत्र यायचं की नाही हे त्यांच्यावर आहे", असं ते म्हणाले.

# राहुल गांधी सावरकर व आरएसएसबद्दल खरे तेच बोलले : नाना पटोले

## सावरकरांना ब्रिटिशांकडून पेन्शन कशासाठी मिळत होती, हे फडणवीसांनी स्पष्ट करावे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेस नेते खा. राहुलजी गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान कर्नाकटमध्ये एका पत्रकार परिषदेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सावरकर यांच्याविषयी जे विधान केले त्यावर भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी आकांडतांडव करण्याची काही गरज नाही. राहुलजी गांधी खरे तेच बोलले त्यात चुकीचे काय आहे? सावरकर व आरएसएसचे स्वातंत्र्य चळवळीत काडीचेही योगदान नाही. सावरकर यांना ब्रिटिशांकडून पेन्शन मिळत होती याचे अनेक दाखलेही आहेत. ही पेन्शन सावरकरांना कशासाठी मिळत होती हे फडणवीसांनी स्पष्ट करावे, असे आव्हान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिले. यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, स्वातंत्र्य लढ्यात सर्व देश काँग्रेसच्या झेंड्याखाली जात, धर्म, प्रांत विसरून एक झाला होता. या लढ्यात राष्ट्रीय



स्वयंसेवक संघ व सावरकर यांचे काहीही योगदान नाही. उलट भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सावरकर व आरएसएसची भूमिका ब्रिटिशांना साथ देणारीच होती. 'अंग्रेजो चले जाव, भारत छोडो' चळवळीत सर्व देश एकवटला असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कुठे होता? ब्रिटिश सत्तेच्या विरोधात सशस्त्र लढा देण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली असताना सावरकर यांनी मात्र ब्रिटिश सैन्यात तरुणांनी भरती व्हावे असे आवाहन करत होते. काळ्या पाण्याची शिक्षा ही एकट्या सावरकर यांनाच झाली नव्हती तर त्यांच्याबरोबर १४९ स्वातंत्र्यसैनिकांनाही झाली होती पण या शिक्षेतून सावरकर यांनाच ब्रिटिशांनी नंतर मुक्त केले, हा इतिहास आहे. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सुद्धा ११ वर्षे तुरुंगवास भोगला, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्यासह लाखो स्वातंत्र्यसैनिकांनीही तुरुंगवास भोगला, लाठ्या काठ्या झेलल्या, हजारो स्वातंत्र्यसैनिकांनी देशासाठी बलिदान दिले. भारताच्या फाळणीचे बीज सावरकरांनी मांडलेल्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतातच आहे हे 'नव इतिहासकार' फडणवीसांना माहित असेलच. अंदमानातील सेल्युलर जेलमध्ये असताना सावकर बुलबुल पक्षावर बसून भारतभ्रमण करत होते असा बनावही कर्नाटकातील भाजपच्या शासनाने शालेय पुस्तकात केला, यातून खोटी माहिती पसरवण्याचे कामच भाजपाकडून केले जात आहे हे स्पष्ट होते. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो यात्रेला केरळ, तामिळनाडू, कर्नाटकात जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने भाजपाने धास्ती घेतली आहे. त्यामुळे काहीतरी शोधून भारत जोडो यात्रा व राहुल गांधी यांच्यावर टीका करण्याचे काम भाजपा करत आहे. राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेली यात्रा भारत जोडणारीच आहे. म्हणूनच फडणवीसांच्या तोंडी 'भारत जोडो की तोडो' असे शब्द येणे आपसुकच आहे. फडणवीस यांना राहुलजी गांधी यांच्या वक्तव्याने मिरच्या झोंबण्याचे काही कारण नाही कारण राहुलजी सत्य तेच बोलले, असेही पटोले म्हणाले.